

श्रीसाईलीला
जानेवारी १९८६

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

श्री. रा. द. बन्ने

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

**वर्ष ६४ वे]** **किंमत १ रुपया** **अंक १० वा**

**दूरध्वनी ८८२२५६१**

: कार्यालय :

**''साईनिकेतन''**, प्लॉट नं ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

श्री साईबाबांच्या संदेशाचा विश्वभर प्रसार करणे
हे श्रीसाईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.



## श्रीसाईवाक्सुधा

साई आत्मबोधाची खाण ।
साई आनंद विग्रह पूर्ण ।
धरा कास तयाची तूर्ण ।
भवार्णव संपूर्ण तराया ।।३४।।
खरेंच जें अपार अनंत ।
भरलें आब्रम्हस्तंब पर्यंत ।
ऐसें जें निरंतर अभिन्न अत्यंत ।
मूर्तिमंत तें बाबा ।।३५।।
कलियुगाचा कालप्रसार ।
चार लक्ष बत्तीस हजार ।
भरतां स्थूलमानें पांच हजार ।
झाला अवतार बाबांचा ।।३६।।
येथें श्रोते आशंका घेती ।
ठावी नसतां जन्मतिथि ।
काय आधारें केले हे निश्चितीं ।।
सादर चित्तीं परिसिजे ।।३७।।
आनिर्वाण कृत संकल्पेंसी ।
होऊनी शिरडी क्षेत्र निवासी ।
कंठिलें साठ संवत्सरांसी ।
क्षेत्र संन्यासी वृत्तीने ।।३८।।
— श्रीसाईसच्चरित् अध्याय १० वा

## सुविचार

विद्या विवादाय धनंमदाय ।
शक्तिः परेषां परपीडनाय ।
खलस्य साधोर्विपरितमेंतत् ।
ज्ञानाय दानाय च रक्षणाय ।।

*

विद्या ही विवादाकरिता, धन हे उन्मत्त बनण्याकरिता, शक्ति इतरांना त्रास देण्याकरितां, हे झाले दुर्जनांचे; पण सज्जनांचे याच्या अगदी उलट असते. त्यांची विद्या ज्ञानार्थ, धन दानार्थ, आणि शक्ति इतरांच्या रक्षणार्थ असते.

*

खिस्त शताब्दी प्रमाणे सुरु होणारे नूतन वर्ष सर्व साईभक्तांना सुखाचे, समृद्धीचे व भरभराटीचे जावो.


या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# अनुक्रमणिका - जानेवारी १९८६


| लेखाचे/कवितेचे नाव | लेखक/कवी | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| संपादकीय | — | ४ |
| साईश्रद्धेचे मोल | — श्री. जगदीश देवपुरकर | ५ |
| स्वामी रामबाबा | — श्री. मु.ब. निंबाळकर | ६ |
| भक्तकैवारी - श्री बाबा | — सौ. उषा अधिकारी | ११ |
| साईगीत | — श्रीमती श्री शहाणे | १२ |
| ही चरणे फार पुरातन आहेत वरे | — प्रा. र.श्री. पुजारी | १३ |
| साईनाम मुखीं या येई | — श्री. कृ.व्यं. हवालदार | १६ |
| श्री साईनाथांचा शरणार्थी | — श्री. वि.बा. खेर | १७ |
| साई-महिमा | — कु. चित्रा बल्लाळ | २० |
| प.पू. नरसिंह स्वामीजी | — श्री. सदानंद चेंदवणकर | २१ |
| ए.आय.एस.एस. वृत्तांत | — —— | २६ |
| श्री साईबाबा संस्थान, शिष्यवृत्ती | — —— | २७ |
| शिरडीचे धन्वंतरी | — सौ. निला रसाळ | २८ |
| सर्वसामान्यांचे दैवत श्री साईबाबा | — श्री. चकोर आजगावकर | ३० |
| बाबांची शिकवण | — कु. कुन्दन वेर्णेकर | ३१ |
| साई घरा आले | — श्री. गजानन निरखे | ३३ |
| श्री साईबाबांची जीवनमूल्ये | — श्री. बा.ना. तळवाडकर | ३४ |
| ऐहिक सुखे देणारा एकमेव संत | — कु. शुभांगी वखारे | ३७ |
| बाबांचे गुरूबंधू प्रेम | — श्री. दत्ताराम घुगे | ४० |
| काशी ते शिरडी पायी यात्रा | — सौ. मिरा संजयानंद | ४२ |
| बाबांनी जीवदान दिले | — श्री. किरणकुमार नाईक | ४५ |
| साईनाथास | — सौ. नीता जाधव | ४६ |
| शाम्याच्याही अगोदर | — श्री. अनिल पंडित | ४७ |
| बाबांचे तत्वज्ञान | — श्री. मुकेश कामत | ४८ |
| संत नरहरी सोनार | — —— | ५१ |
| बाबा पाठी त्याला कशाची भीती | — कुंदा संत | ५३ |
| नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य | — श्री. चंद्रकांत पोतदार | ५५ |
| बाबा समोरचे विडीचे बंडल गायब | — श्री. रामचंद्र कोयंडे | ५६ |
| ही श्रींची साईकृपा | — श्री. सूर्यकांत वराडकर | ५८ |
| कृपावंत साई माऊली | — श्रीमती प्रमिला सप्ताळकर | ५९ |
| दिव्यत्वाची जेथ प्रचिती | — श्री. विजयकुमार फडणीस | ६० |
| ग्रंथ अभिप्राय | — साईनंद | ६१ |
| शिरडी वृत्त | — —— | ६३ |
| रेल्वे बुकिंग आऊट एजन्सी | — —— | ६३ |
| साईबाबा माझे दैवत | — श्री. बी.डि. औरवाडकर | ६४ |

# श्रीसाईबाबांचे निवास स्थान

## संपादकीय



"दया - क्षमा शांति तेथे देवाची वसती" अशा प्रकारचे फलक जुन्या जमान्यातल्या शाळांतील वर्गा-वर्गातून लटकवलेले असत. आज काळ बदलला, शिक्षक बदलले तरी या उक्तीचा अर्थ मात्र बिलकूल बदललेला नाही. पूर्वी प्रमाणे आहे तोच कायम आहे. परमेश्वराचा वास फक्त त्याच ठिकाणी होतो की जेथे प्रामाणिक भक्ती आणि अनन्य साधारण श्रद्धा आहे. भगवंताचे राहण्याचे ठिकाण सद् भक्ताचेच घरी असते. मग तो भक्त घर, छप्पर, झोपडी, बंगला अशा कोणत्याही ठिकाणी, जागी रहाणारा असो. भगवंत आपल्या भक्तात गरीब, श्रीमंत असा भेदभाव मुळीच ठेवत नाही. ज्याच्या घरी परमेश्वर भक्ती अधिक त्याच्या घरी परमेश्वराचे वास्तव्य अधिक असते पण भक्ती खरीखुरी असावयास पाहिजे, उगाच दांभिक नको. भगवंत परमात्म्याची शक्ति सर्व ठिकाणी विविध रूपाने वास करीत असते हे मात्र प्रत्येक भक्ताने लक्षात ठेवलेच पाहिजे. ख्यातनाम संत श्री सिद्धरामेश्वर हे केवळ भक्तीच्या जोरावरच रोज चंद्रावर जाऊन येत असत. तेव्हा परमेश्वर आणि भक्त यांचे भक्तीचे नाते अतूट असावे लागते. ते मनापासून अंत:करण पूर्वक असावे लागते. संत दामाजी पंतास मोक्ष मिळाला याचे कारण तो अंत:करणापासून दानशूर होता. असा हा भक्तीचा महिमा अगाध आहे.

संत तुकाराम महाराजांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास प्रेमळ आणि निर्मळ वाणी ज्याच्याकडे असते ही सुद्धा एक प्रकारची भक्तीच आहे. ईश्वराची जशी विविध रूपे आहेत तशीच भक्तीची सुद्धा विविध रूपे, प्रकार आहेत; विविध मार्ग आहेत. साधा सूईत दोरा ओवायचा असेल तर तो जर विस्कळीत असेल तर सूईच्या छिद्रातून आरपार होऊ शकणार नाही. पण जर का त्याच दोऱ्याला जिभेचा ओलावा लावून एक जीव केला तर तो सहज पार होऊ शकतो. म्हणजेच प्रेमळ वाणीने कितीही अवघड काम असले तर ते सोपे होते. म्हणून मुंगी होऊन साखर खावी असे जे संत श्रेष्ठ म्हणतात ते खरे आहे. जसे जिभेच्या ओलाव्याने सुईत दोरा आरपार केला गेला तसेच या सुई दोऱ्याने फाटके वस्त्र शिवून ते धडके करून पुन्हा अंगात घालता येते. पण हे फाटके वस्त्र अंगात घालण्यासाठी जिभेच्या ओलाव्याचा केवढा मोठा हा फायदा! म्हणून प्रत्येक भाविकाने, भक्ताने आपल्या वाणीत कोमलता, गोडवा, ओलावा आणला पाहिजे. म्हणजे वाणी, वाचा व पर्यायाने

अंत:करण मन आपोआपच प्रेमळ आणि निर्मळ बनेल यात शंकाच नाही. कुणाला ही गोष्ट शक्य होईल तर कुणाला ही गोष्ट शक्य होणार नाही पण हळूहळू हा असा वाणी निर्मळ करण्याचा यत्न प्रत्येकाने केलाच पाहिजे. कोणत्याही कठिण कामातून पार पडावयाचे असेल, कोणत्याही दिव्यातून सही सलामत सुटायचे असेल तर जिभेच्या ओलाव्यातून, वाणीच्या गोडव्यातूनच त्याला पार पडावे लागते नाहीतर पार होणे अशक्यच !

प्रत्येक भक्ताने अंत:करण पूर्वक, श्रद्धापूर्वक परमेश्वराला शरण गेल्यावर त्याच्या भक्ती भावाला पाझर नक्कीच फुटतो. लहान मूल रडू लागले व त्याची आई कुठंतरी दूरवर असेल तर त्याच्या रडण्याचा आवाज ऐकून तिचे अंत:करण हेलावते, तिच्या अंगावर शहारे येतात. तिला पाझर फुटतो. ''घार हिंडते आकाशी चित्त तिचे पिलापाशी'' असे जे संतांनी लिहून ठेवले आहे तेच खरे आहे असे म्हणावे लागेल.

म्हणून प्रत्येक भक्ताने आपल्या परमेश्वराला शरण जाऊन त्याच्या भक्तीभावात तन्मयतेने एकरूप व्हावे. तर भगवंत परमेश्वराला पाझर फुटतो व त्याचे दर्शन घडते. तुमचा आमचा सर्वांचा परमेश्वर भगवंत संत चूडामणी श्री साईबाबा आहे. तेव्हा भक्तांनो त्याला अनन्य भावे शरण जा व त्याचे दर्शन सुप्रसन्नतेने करा असेच सांगावेसे वाटते.

# साईश्रद्धेचे मोल

जेव्हा जगण्यात राम वाटत नाही
तेव्हा ओठात 'साईनाम' वसत असते
तेलाची वाट न पाहता अशा वेळी
दिव्याची वात अहोरात तेवत असते.

सगे जेव्हा बघे होतात संकट काळी
माझा साई भाई होतो अशा बिकट वेळी
मी बोलतो, मीच चालतो, मी पडतो, मी रडतो
माझ्या प्रत्येक पावलाची चाहूल घेतो साई
पडल्याचे नसते भय, अभय देते मला 'साई आई'
मी फक्त झाकून ठेवतो माझी मूठ सव्वा लाखाची
माझ्या मूठीत असते श्रद्धा, माझ्या साईलाखमोलाची

**श्री. जगदीश देवपुरकर**
मीशन कंपौंड मोगताई धुळे ४२४ ००१

# श्रेष्ठ साईभक्त स्वामी रामबाबा



– **ले. कर्नल मु. ब. निंबाळकर** (निवृत्त)
१/१४, फाईव्ह स्टार अपार्टमेंट्स
बंड गार्डन रोड, पुणे ४११ ००१.

शिरडी येथे दरवर्षी गुरूपौर्णिमेच्या उत्सवात एक उत्तुंग गोरीपान, शुभ्र दाढी असलेली व भगवी कफनी परिधान केलेली व्यक्ती दृष्टीस पडते. परंतु सर्वांनाच हे भाग्य लाभत नाही. कारण ही व्यक्ती शक्यतो भक्तांची गर्दी नसलेल्या शांतवेळी घाईघाईने समाधि मंदिरात बाबांच्या दर्शनाला जाते. तेथून गुरूस्थानला येते व लगेच आपल्या 'साईधाम' मुक्कामात निघून जाते.

परंतु ज्या भक्तांना या व्यक्तीचे दर्शन घडते ते तिच्या भारदस्त व आदरणीय व्यक्तिमत्वाने भारावून जातात व सहजपणे नतमस्तक होऊन तिच्या चरणाला स्पर्श करू पाहतात. परंतु ती व्यक्ती लगेच विरोध करते आणि भक्तांना तिला स्वत:ला नव्हे तर श्रीसाईबाबांना वंदन करावयास सांगते.

ती व्यक्ती म्हणजे मुंबई निवासी सुप्रसिद्ध स्वामी रामबाबा. त्यांना मी चार वर्षांपूर्वी असेच शिरडी येथे गुरूपौर्णिमेच्या उत्सवाचे वेळी पाहिले आणि त्यांचे विषयी माझे कुतूहल जागृत झाले. पुढच्या वर्षी योगायोगाने त्यांचा मुक्काम 'साईधाम' मध्ये असल्याचे कळल्यावरून मी तेथे त्यांच्या दर्शनाला गेलो व त्यांनीही मोठया प्रेमाने माझे स्वागत करून आशीर्वाद दिला. त्यानंतर दरवर्षी गुरूपौर्णिमेला शिरडी येथे मी त्यांचे दर्शन घेत असे. यावर्षी शिरडीनंतर ते पुण्यास येणार असल्याचे कळल्यावरून मी पुण्यास त्यांचे मुक्कामाचे ठिकाणी ता. ८ जुलै रोजी भेटण्यास गेलो व मला एकटयाला त्यांचेशी दीड तास मुक्तपणे विविध विषयांवर बोलण्याचे भाग्य लाभले. त्यावेळी मी प्रश्न विचारल्यावरून त्यांनी आपणा स्वतःविषयी थोडीफार माहिती व श्रीसाईबाबांविषयी आपले अनेक अनुभव व विचार सांगितले ते अत्यंत उब्दोधक वाटल्यावरून वाचकांसाठी खाली देत आहे :—

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वामी रामबाबा श्रीसाईबाबांचे निःसीम व एकनिष्ठ भक्त आहेत. त्यांना श्रीसाईबाबांना प्रत्यक्ष भेटण्याचे दोनदा भाग्य प्राप्त झालेले आहे. प्रथम ते २२ फेब्रुवारी १९१४ रोजी शिरडीस बाबांच्या दर्शनाला गेले. त्यांना बाबांना योगाबद्दल काही शंका विचारावयाच्या होत्या. परंतु त्यावेळी बाबांना भाकरीबरोबर कांदा खातांना पाहून त्यांना वाटले, "हा कसला घाण व वर्ज्य कांदा खाणारा योगी ? माझ्या शंका हा काय दूर करणार ?" इतक्यात बाबा ओरडून म्हणाले, "अरे नाना ! त्या कुत्र्याला हाकलून दे. स्वतःला मोठा योगी म्हणवतोय. अरे, कांदा खावयाला जोम लागतो. ज्याला असेल त्यानेच तो खावा". हे एकून रामबाबा मनात चरकले. बाबा योगीच काय पण 'योगिराज' असल्याची त्यांना खात्री पटली व त्यांचा अहंकार तेथल्या तेथेच गळाला. ते बाबाना शरण गेले आणि बाबांनीही त्यांना जवळ बसवून त्यांचे शंकासमाधान केले. (ही कथा हेमाडपंतांच्या श्रीसाईसच्चरितातील अध्याय २३ मध्ये वर्णिलेली आहे.)

यानंतर रामबाबा सन १९१८ मध्ये पुन्हा एकदा बाबांना शिरडी येथे जाऊन भेटले होते. या दोन्ही भेटींचा परिणाम म्हणजे रामबाबांची श्रीसाईबाबांविषयी अत्यंत उत्कट श्रद्धा व भक्ती होय, आणि म्हणूनच आता वयाने थकले असले तरी ते दरवर्षीच्या नियमाप्रमाणे गुरूपौर्णिमेला बाबांच्या दर्शनाला शिरडी येथे जातात. ("बाबांच्या समाधीच्या" न म्हणता "बाबांच्या दर्शनाला" असे मी मुद्दाम म्हटले आहे कारण रामबाबांची श्रीसाईबाबा 'सदा आहेतच' अशी भावना आहे.)

स्वामी रामबाबांनी सन १९१० पासून संन्यास घेतला आहे. ते आपल्या पूर्वाश्रमाबद्दल काही सांगत नाहीत. त्यामुळे त्यांच्या वयाबद्दल आपल्याला कल्पना येत नाही. बोलताना एकदा ते म्हणाले की त्यांनी सर्व भोग भोगल्यानंतर संन्यास घेतला. म्हणजे त्यावेळी (१९१० साली) त्यांचे वय किमान ४० वर्षांचे धरले तरी

आज त्यांचे वय निदान ११५ वर्षांचे तरी असले पाहिजे. परंतु तसे त्यांचे वय मुळीच दिसत नाही. डोक्याचे व दाढीचे केस पांढरे शुभ्र झालेले आहेत तेवढेच. त्यांच्या गोऱ्यापान शरीरावर एकही सुरकुती आढळत नाही. हातापायाची चामडी अगदी नितळ व मऊ दिसते. दोन वर्षांपूर्वी तर समाधि मंदिराकडे द्रुत गतीने ताठ चालत जातांना त्यांना मी पाहिलेले आहे. कदाचित योगामुळे इतक्या दीर्घ काळ शरीर सुदृढ ठेवणे शक्य आहे. अलीकडे मात्र त्यांचे शरीर थकलेले आहे व आधाराशिवाय स्वतंत्रपणे चालणे त्यांना जमत नाही. बोलणे व उत्साह मात्र पूर्वीसारखाच आहे, असो.

स्वामी रामबाबा श्रीसाईबाबांविषयी बोलताना म्हणाले— "रामला (म्हणजे रामबाबांना स्वत:ला — रामबाबा 'मी' शब्द वापरत नाहीत) साईबाबांवर प्रेम करणे म्हणजे साक्षात परमेश्वरावर प्रेम करणे होय. मग तुम्ही त्यासाठी कोणताही शब्द वापरा. आज कोटयावधी लोक या श्रेष्ठ सद्‌गुरूची, या थोर संताची, या खऱ्या फकीराची, या राज्याशिवायच्या राजाची, या मठाशिवायच्या संन्याशाची पूजा करतात. आपणाकडे मीराप्रमाणे प्रेमिकांच्या हृदयात साठणारे संगीत असते तर त्या स्वर्गीय संगीताने आपण बाबांना शोधले असते. कबीराप्रमाणे आपणाला ज्ञान असते तर बाबांच्या गूढ आयुष्यातील मोठेपणा जगाला उकलून सांगितला असता. गुरू गोविंदसिंग प्रमाणे आपणाकडे जर अतुल धैर्यबळ व निर्भीड प्रेम असते तर आपले शीर त्यांना अर्पण केले असते. सेंट फ्रान्सिसचे ईश्वराबद्दलचे व प्राण्याबद्दलचे प्रेम असते तर दलितांची सेवा हीच बाबांची पूजा मानली असती. मित्रानों! श्रीसाईबाबांची कृपा असली तर राबिया मातेप्रमाणे आपणाला प्रेमाने धुंद होता येते आणि मग पूजा करण्यासारखे काहीच उरत नाही.

श्रीसाईबाबांच्या मानवजातीला दिलेल्या देणगीबद्दल स्वामी रामबाबा म्हणतात:—

"बाबांचा अनुग्रह आणि आशीर्वाद अमोलिक आहे— आणि दुर्जन किंवा सज्जन यांचेवर सारखाच असतो. जगाच्या इतिहासातील आजच्या अत्यंत खडतर काळात इतर सर्व काही उपाय निकामे पडतील. परंतु बाबांची एकटी कृपाच सर्व मानवजातीला प्रेमाने एकत्र आणण्यास समर्थ आहे, आणि हे तुम्ही शिरडीस जाऊन पाहू शकता. मित्रांनो! प्रेम आणि सत्य यांचा विजय होण्याचा दिवस फार दूर नाही. निसर्गातील प्रत्येक वस्तुतून परमेश्वराचे आपल्या प्राण्यांविषयी अगाध प्रेम दिसून येते आणि त्याने सर्व मानवजातीला एकमेकांवर प्रेम करण्याची व एकत्र कुटुंबाप्रमाणे राहण्याची शक्ती दिलेली आहे. —श्रीसाईबाबांचे हेच मुख्य तत्त्वज्ञान आहे, नव्हे मानवजातीला अमोलिक देणगी आहे.

परंतु सर्वांबद्दल प्रेम व आदर असूनही रामला खेदाने म्हणावे लागते की आमची मातृभूमीच नव्हे तर सर्व जगच सध्या एका शोचनीय कालमानातून जात

आहे, कारण या काळातील महान महान म्हणविण्याऱ्या व्यक्ती देखील मानवजातीला दुभंगणाऱ्या अडगळी दूर करण्याकरिता आपले प्राण पणास लावण्यास तयार नाहीत. आजचे बहुतेक राष्ट्रीय आणि धार्मिक नेते सत्तेने व सत्तेसाठी दृष्टांध झालेले आहेत."

धर्माबद्दल रामबाबांचे विचार खालील प्रमाणे आहेत :—

"खरे सांगावयाचे म्हणजे धर्म हा कधीच एकाकी किंवा दुसऱ्यापासून अगदी अलिप्त राहू शकत नाही. एका व्यक्तीचे सुख दुसऱ्या अनेक व्यक्तींच्या सुखावर अवलंबून असते. म्हणून खरा धर्म कधी अगदी पुराणमतवादी बनू शकत नाही तसाच अगदी सुधारमतवादी पण बनू शकत नाही. रामच्या मते सर्वत्र प्रेम, सर्वत्र सत्य व सर्वत्र ईश्वर पाहणारा माणूसच श्रेष्ठ होय".

श्रीसाईबाबांच्या उपदेश करण्याच्या पद्धतीबद्दल रामबाबा म्हणतात :—

"सिद्ध पुरूष कोणा एका विवक्षित वर्गाचा किंवा राष्ट्राचा नसतो. त्याचे सर्वांवरच अमर्याद प्रेम असते. त्यामुळे तो मानवाचे एकमेकाचे मतभेद दूर करून त्यांना एकत्र आणण्यास समर्थ असतो. अशा सिद्धपुरुषाला प्रवचने देण्याची किंवा एकादे जुने किंवा नवे तत्त्वज्ञान प्रतिपादन करण्याची जरूरी नसते. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे शिरडीचे श्रीसाईबाबा. त्यांनी कोणतेही तत्वज्ञान लोकांना सांगितले नाही व अगदी लीनपणे आयुष्य कंठले. परंतु तेच आयुष्य एकाद्या ज्ञानी माणसालाही शहाणपणाने लाजविणारे होते. न बोलताच ते भक्तांचे प्रेम स्वीकारतात व न बोलताच त्यांना न मानणाऱ्या लोकांवर ते प्रेम करतात". (मुद्दाम वर्तमान काळ वापरला आहे. कारण रामबाबा श्रीसाईबाबा सदासर्वदा 'आहेतच' असे मानतात.)

आचार विचारांविषयी रामबाबा म्हणतात :—

"जे काही चांगले किंवा वाईट विचार आपण दुसऱ्या व्यक्तीबद्दल मनात आणतो व वातावरणात त्या व्यक्तीच्या आयुष्यात सोडतो तेच परत फलरूपाने आपल्या आयुष्यात येतात. तेव्हा माणसाने दुसऱ्या व्यक्तीबद्दल तो अपकर्ता असला तरी नेहमी उदात्त, प्रेमळ व नम्रच विचार मनात आणावे म्हणजे तसलेच विचार सर्व बाजूंनी आपल्या आयुष्यात येतील. मित्रानों! आपण सर्व मिळून सर्व मानवजात म्हणजे आपल्या सर्व आत्म्यांचा संकलित परमात्माच आहे असे समजून तिची सेवा करू या"

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे रामबाबा हे श्रीसाईबाबांचे निःसीम व एकनिष्ठ भक्त आहेत. इतर काही साईबाबांचे महान भक्त म्हणविणाऱ्याप्रमाणे श्रीसाईबाबांचे नावावर आपला स्वतःचा मोठेपणा मिरवायची किंवा नाव कमवायची त्यांना हांव नाही. ते स्वतःला बाबांचे अत्यंत नम्र सेवक मानतात व

म्हणून त्यांना कोणी वाकून नमस्कार करण्यास आल्यास त्यांना ते आपल्या पायांना हात लावून नमस्कार करू देत नाहीत. एकाद्या खऱ्या शिष्याप्रमाणे त्यांनी श्रीसाईबाबांची शिकवणूक तंतोतंत आत्मसात केलेली आहे. उदा. साईबाबांनी आपल्या भक्तांना देहभाव व अहंकार सोडून द्यावयाचा वारंवार उपदेश केला. त्याशिवाय अध्यात्मात उन्नतीच नाही असे त्यांचे सांगणे होते :

**भ्रमामुळें वाढला श्रम । देहाभिमानादि संभ्रम ।**
**मृगजलासम "मी मम" । जाणूनि निर्मम होई का ।।१२६।।**

**अध्याय - १७**

**एवढेच या कथेचे सार । वृत्ति जों तों निरहंकार ।**
**तों तों परमार्थीलाहे अधिकार । सहज भवपार होईल ।।१८३।।**

**अध्याय - ५१**

म्हणून रामबाबांनी 'मी' हा शब्द कायमचा टाकला आहे. ते स्वत:बद्दल बोलताना नेहमी 'राम'हा शब्द वापरतात. तसेच साईबाबा आपल्या भक्तांना नेहमी सांगत असत की ते सर्वांच्या हृदयात आहेत :

**पाही भूतमात्री जो मज । तोचि माझिया प्रीतिचा समज ।**
**तरी तूं भेदबुद्धीतें त्यज । ऐसीच भज मजलागीं ।।१३०।।**

**— अध्याय - ९**

म्हणूनच की काय रामबाबा कोणाला काही सांगताना अगर लिहीताना Dear self or selves (निजआत्म्यांनो) असे संबोधितात. (म्हणजे ऐकणारे व रामबाबा यांचा आत्मा एकच आहे.)

एकूण स्वामी रामबाबा म्हणजे चालती बोलती साईबाबांची शिकवणूकच आहे. आणि म्हणून वर जे काही मी त्यांचे तोंडून ऐकले ती साईबाबांचीच प्रेरणित वचने आहे असे मी मानतो. असो, अशा या थोर साईभक्ताला व संताला माझे शतश: प्रणाम.

। ॐ साईराम ।

# भक्तकैवारी - श्रीबाबा

**सौ. उषा अधिकारी**
सावित्री सदन, बंदर रोड,
रत्नागिरी

श्रीसाईबाबांचे भक्तमंडळ खूप मोठे होते. त्यात सुशिक्षितांचा भरणा खूपच होता. या मंडळीनी बाबांची नीट पारख करूनच ते भक्त बनले होते. यात सॉलिसिटर होते. तसे डॉक्टर, वकील, जज्ज, मॅजिस्ट्रेटही होते. श्री. माधवराव देशपांडे यांचे चुलते शंकर देशपांडे हे ऑनररी मॅजिस्ट्रेट होते. पुढे मागे पट्टेवाला घेऊन रुबाबात चालण्याची त्यांना सवय. ते मॅजिस्ट्रेट होते तसेच निमोण गावचे वतनदारही होते. त्यांचे शिरडीत काही कारणाने आगमन झाले, आणि आपण मॅजिस्ट्रेट आहोत हे ते विसरले. श्रीबाबांच्या परमपावन दर्शनाने त्यांचे चित्त संसारातून उडाले. आपल्या वतन गावचा त्याग करून ते कायमचे शिरडीत रहायला आले. श्रीबाबा हा चालता बोलता परमेश्वर आहे. हे अनेक अनुभवांनी त्यांच्या प्रत्ययाला आल्याने देह विकल झाला तरी ते जमेल तशी पहाटेपासून रात्रीपर्यंत श्रीबाबांची सेवा करीत. त्यांचे कुटुंबही परम भाविक असल्याने पतीच्या खांद्याला खांदा लावून श्रीबाबांची सेवा करीत असे. ताई फक्त स्नान व स्वयंपाक करण्यासाठी आणि रात्री निद्रा घेण्यासाठी आपल्या घरी जात असत. बाकी सर्व वेळ त्यांचा श्रीबाबांच्या सेवेत जाई. या सेवेत जराही खंड पडलेला उभयतांना खपत नसे. एखादे वेळी हातून सेवा कमी पडली तर त्यांना दुःख वाटे. दोघे पती-पत्नी संसारातून विरक्त झाल्यासारखीच वागत असत. त्यांचे देशपांडे हे नांव पुसले जाऊन नानासाहेब निमोणकर हे नाव रूढ झाले. त्यांच्या सेवेने प्रसन्न होऊन श्रीबाबा त्यांना 'म्हाताऱ्या' अशी हाक मारत. श्रीबाबांच्या या हाकेने नानासाहेबांना मूठभर मांस चढे आणि ते अधिकाधिक श्रीबाबांची सेवा करू लागत. शिरडीत येणाऱ्या भाविकांची पण ते सेवा करीत.

हे वृद्ध जोडपे शिरडीत राही, आणि त्यांचा एकुलता एक मुलगा बेलापुरास असे. एकदा तो आजारी असल्याचे पत्र आले. नानासाहेब पूर्ण विरक्तीला पोचले असल्याने त्यांचेवर काहीच परिणाम झाला नाही. पण निमोणकर ताईंचे मातृहृदय कळवळले. त्या पतीला म्हणाल्या, "अहो, मी बाळाला जाऊन पाहून येते". यावर नानासाहेब म्हणाले, "तू त्याची काळजी का करतेस? आपले सर्वस्व असणारे श्रीसाईबाबा त्याची निश्चितच काळजी घेतील". पतीच्या बोलण्यावर ताई निरुत्तर झाल्या. पण क्षणभराने म्हणाल्या, "अहो माझा जीव रहात नाही. मी येते हो जाऊन!" नानासाहेब म्हणाले, "जायचे तर जा. पण उद्या लगेच परत ये. इथे श्रीबाबांच्या सेवेत कमतरता येता नये." ताई म्हणाल्या, "असं काय करता?

बाळला बरं वाटल की मी लगेच परतेन. शिवाय पोळ्यांची अवस आलीच आहे. ती झाली की येईन मी परत." नानासाहेबांनी आपले म्हणणे सोडले नाही. शिरडीत त्यावेळी अशी प्रथा होती की, कोणीही बाहेरगावी, लग्न, मुंजी समारंभ वगैरेला जाण्यासाठी श्रीबाबांची द्वारकामाईत जाऊन आज्ञा घेत. सायंकाळी ताई द्वारकामाईत गेल्या. आणि श्रीबाबांचे पादसंवाहन करू लागल्या तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, "आये, बाळाला बरं नाही म्हणून बेलापुराला जातीस ना? जा पण काळजी करू नको. तुझा बाळ आता बरा आहे. मी असताना काळजी कसली? जातीस तर जा आणि चांगली चार दिवस राहून पोळ्यांची अवस करून ये". श्रीबाबांचा मस्तकावरील कृपाहस्त आणि हे अभयसूचक शब्द ऐकून ताईंचे अंग अंग मोहरले. श्रीबाबांच्या पायावर त्यांच्या डोळ्यातून मुक्त अश्रूधारा वाहू लागल्या. त्यांनी अत्यंत भक्तीभावाने श्रीबाबांना नमस्कार केला. जवळच नानासाहेब उभे होते. पण ते काय बोलणार? बाबांच्या पुढे बोलण्याची त्यांची काय प्राज्ञा होती? श्रीबाबांच्या कृपेने ताई निमोणकरांची मनीषा पूर्ण झाली हे काय सांगायला हवे?

# साईगीत

शिरडीश्वर तू साई दयाधन भक्त मीच तू माझे जीवन ।।धृ।।
सांजसकाळी स्मरता तुजला
तुझाच जीवा ध्यास लागला
साईमय हे अवघे जीवन ।।१।।
तुज आठविता सरते चिंता
तुझ्या सारखे दैवत असता
अवघे जीवन होईल पावन ।।२।।
कितीक तरले तुझ्या दर्शने
किती उद्धरले तसे स्पर्शने
आज विसरले माझे मी पण ।।३।।
तुझ्या दर्शने पाप पळते
तुझ्या कृपेने पुण्य लाभते
असे तुझे रे पावन दर्शन ।।४।।

**श्रीमती श्री शहाणे**
लक्ष्मी - निवास रा. ग. गडकरी पथ,
सी. के. पी. हॉलजवळ डोंबिवली पूर्व -

# ही चरणे फार पुरातन आहेत बरे!

प्रा. र. श्री. पुजारी
रमानिवास, ९९२ सदाशिव पेठ,
पुणे - ३०.

मंदिरात मूर्ती असते. तिची प्राणप्रतिष्ठा केलेली असते. पूजोपचारांमुळे ती सजीव भासते. उपासनेमुळे ती डोलू लागते. तरीही भक्तांचे समाधान होत नाही. मूर्तीच्या अगदी जवळ जावे, तिच्या चरणांस घट्ट मिठी मारावी असे त्यांना वाटते.

पण ते शक्य नसते. याच कारणासाठी त्या मूर्तीच्या पादुका एका संगमरवरी पाषाणावर कोरून बाहेर ठेवलेल्या असतात. भक्तांना त्यांच्यावर केव्हाही आणि कितीही वेळा माथा टेकविता यावा यासाठी ही योजना असते. जणू मूर्ती आत असली तरी पाऊले मात्र बाहेर असतात.

मूर्तीच्या अवयवांमध्ये मूर्तीचे रूप सामावलेले असते. मुखावर करूणाभाव किंवा बालभाव असतो. त्यामुळे मूर्ती सजीव वाटते. तिला प्रेमाने आलिंगन द्यावेसे वाटते. तसे पादुकांमध्ये काय आहे? पाच पाच बोटे असलेली ती केवळ दोन पदचिन्हे! त्यांना पाहून मन उचंबळणे शक्य नाही. याचे कारण त्यांच्यावर कोणताच भाव लिहिलेला नसतो. कसलेही कृपाचिन्ह त्यांच्यावर कोरलेले नसते. तरीसुद्धा या पादुकांचे माहात्म्य एवढे कशासाठी ? लोक या पादुकांवर गंधफूल वाहातात ते कां? केवळ दुधाची तहान ताकावर असा तर हा न्याय नव्हे!

इतिहासाचे अभ्यासक याचे कारण काही वेगळे सांगतील. धर्मवेडे लोक मूर्तीचे भंजन करू लागले तेव्हा पादुका कोरून त्या पुढे करण्याची क्लुप्ती भक्तांना सुचली असे संशोधन ते करतील. पादुकांवरून त्या दैवतामागील धर्म, पंथ ओळखता येणार नाही असे ते म्हणतील. फार काय, या पादुका एका अनामिक सत्पुरुषाच्या आहेत असाही युक्तिवाद लढविता येईल असे ते सांगतील. वर, धर्म-पंथ विरहित निरपेक्ष असे हे (लोकशाहीस अनुकूल) दैवत झाले याची प्रौढीही मनी बाळगतील!

प्रत्यक्षात पाहाता पादुका म्हणजे त्या त्या दैवताचे पाय. मुखाच्या मानाने पायास महत्त्व कमी. त्यामुळे मुखवटा त्या स्थानी ठेवण्याऐवजी पादुका म्हणजे पाय त्या जागी कोरून ठेवणे हा काय प्रकार म्हणावा!

श्री अक्कलकोट स्वामी आणि श्रीसाईनाथ यांच्या चरित्रातील काही गोष्टींवरून या प्रकरणाचा काही उलगडा होणे शक्य आहे.

श्री अक्कलकोटस्वामींनी बाबा सबनीस नावाच्या एका शरणागताच्या मस्तकावर लाथ मारली. म्हणाले, "तू बडा कसाई है।"

हुमणाबादेस मृत्युशय्येवरील वृद्ध आईस अक्कलकोटी टाकून माणिकनगरी गुरुदर्शनार्थ आपण आलो या अपराधाबद्दल श्रीस्वामींनी आपल्या मस्तकावर लाथ मारली हे जेव्हा बाबा सबनिसांच्या ध्यानी आले तेव्हा त्यांनी श्रीस्वामींची क्षमा मागितली. त्यावर क्षमा करून श्रीस्वामी म्हणाले, "जा. गाईला चारा घाला." याचा अर्थ "जा आईची सेवा कर."

ही आज्ञा शिरसावंद्य मानल्यानंतर श्रीस्वामी म्हणाले, "हम भी अक्कलकोट आयेंगे". श्रीस्वामी त्यानंतर हुमणाबादेहून अक्कलकोटास आले. अक्कलकोटास समाधीपर्यंत म्हणजे पूर्ण बावीस वर्षे ते राहिले. त्यामुळेच लोक त्यांना अक्कलकोटस्वामी असे म्हणू लागले.

श्रीस्वामीनी आपल्या पायाने एका भक्ताच्या मस्तकास लाथ मारली याचा अर्थ काय? हा पराकोटीचा अपमान की दीक्षा? महाभारतात दुर्योधनाने भीमाच्या मस्तकात लाथ मारली त्यामुळे मोठेच रणकंदन मानले. ज्याच्यावर मुकुट ठेवावयाचा ते मस्तक म्हणजे तर पराक्रमाचे शिखरच. त्याच्यावर प्रहार केल्यामुळे जीवनमंदिरच तत्वतः उध्वस्त झाले! पण येथे झाले ते कल्याणप्रदच. लाथेमुळेच तर श्रीस्वामी अक्कलकोटास आले. हजारों जडजीवांचा त्यांनी उद्धार केला. अक्कलकोट हे गाव एक तीर्थक्षेत्र बनवून टाकले!

श्रीस्वामीनी सबनिसांना लाथ मारली; तर आपल्या सेवेत असलेल्या मैंदरगीच्या एका मुसलमान पोलिस जमादाराकडे रागारागाने आपल्या पायातील जोडा फेकला. फेकून मारला. ही आपणास गावी जाण्याची आज्ञा झाली असे समजून त्या सेवकाने तो जोडा हृदयाशी धरला. आपणास शाश्वतचे पद जे श्रीचरण ते लाभले या भावनेने तो मैंदरगीकडे पळत सुटला. तेथे त्याच्या कुटुंबीयानी काफिर म्हणून त्याची घरातून हकालपट्टी केल्यानंतर गावाबाहेरील एका पडक्या घराच्या ओसरीस तो राहिला. तेथे त्याने त्या जोडयाची प्रतिष्ठापना केली. आर्त, पीडित भक्तांना त्या जोडयाच्या तळाशी चिकटलेली माती तो औषध अंगारा किंवा प्रसाद म्हणून देऊ लागला. त्यामुळे शेकडो लोक त्रिविध तापांमधून मुक्त झाले. पुढे तर त्या मुसलमानाने त्या जोडयापुढे जमलेल्या दहा हजार रुपयांचे एक दत्तमंदिर बांधले. एक ब्राम्हण पुजारी पूजेअर्चेसाठी तेथे नेमला. या सर्व गोष्टी श्रीस्वामींची आज्ञा घेतल्यानंतर त्याने केल्या. त्यामुळे तो सामान्य जमादार संतपदास चढला. लोक त्याला 'महाराज पीरसाहेब' म्हणू लागले.

श्रीस्वामी नेहमी एक चरण घोळून घोळून म्हणत, "गुरुचरणाची माती । तीच माझी भागीरथी". तेवढा चरण या अडाणी जमादाराने ध्यानात ठेवला. आपल्या जीवनात मुरविला. त्यामुळेच तो पुढे अधिकारवाणीने सांगू लागला, "मुलांनो! शेवटी तुम्हाला एकच सांगतो. हा धर्म, तो धर्म, ही जात, ती जात —हे सर्व खोटे

आहे. खरे आहे ते एकच - ते म्हणजे श्रीगुरूंचे पदकमल. मग श्रीगुरूंना तुम्ही अल्ला म्हणा की दत्तात्रेय म्हणा; विठ्ठल म्हणा की रामचंद्र म्हणा.

परमार्थाच्या मार्गावरील सत्य एकच आणि ते म्हणजे श्रीगुरूंचे पदकमल हा शोध येथे महत्त्वाचा आहे. याचे कारण असे की चेहरे भिन्न भिन्न असू शकतील; पण पाय मात्र एकच आहेत. वृक्ष भिन्न भिन्न असू शकतील, पण वृक्षमूळ मात्र एकच आहे. ते मूळ एकदा घट्ट धरले की संपूर्ण वृक्षच हाती आला! मग त्या वृक्षाची फळे वेगळी मागण्याचे कारणच उरले नाही.

श्रीस्वामी मूळचे कोण, कोठील इत्यादी गोष्टी फार गूढ होत्या. त्यातून धीर धरून एकाने त्यांना प्रश्न केला. तेव्हा श्रीस्वामी एवढेच म्हणाले, ''दत्तनगर.. मूळ पुरुष, वडाचे झाड, मूळ मूळ मूळ--''

याचा अर्थ असा की आम्ही मूळ परब्रम्ह असून योगमायेमुळे आमचा विस्तार वटवृक्षाप्रमाणे आहे. मूळ कोणते आणि झाड कोणते हा फरकही आता उरला नाही. तथापि या वृक्षाचे मूळ म्हणजे ही आमची चरणे. ती मात्र फार पुरातन आहेत. त्यांचा थांग तुम्हास लागणार नाही. म्हणून या वृक्षाकडे पाहून भांबावून न जाण्याचा मार्ग तुम्हास सांगतो. त्रिवार सांगतो. हे मूळ म्हणजेच गुरुपादुका हे ध्यानी धरा.

अक्कलकोटच्या सपटणेकर वकिलानी हे मूळ धरून ठेवण्याचे नाकारले. म्हणून श्रीबाबांनी त्यांच्यावर प्रेमाचा कोप केला. शिरडीस आणवून त्यांच्या मानी, अहंकारी डोक्यातील धूळ झाडण्यासाठी त्यांना जणू लाथ मारली. रोषामुळे रडविले. अखेर या शरणागतावर कृपेचा वर्षाव करता करता श्रीबाबा एवढेच म्हणाले, ''अरे, ही चरणे फार पुरातन आहेत बरे! फार पुरातन --''

ही पुरातन चरणे म्हणजे श्रीपादुका. खडावा, जोडे, यांना चिकटलेले धूलिकण म्हणजे सकल तीर्थे. म्हणून आद्यगुरु श्रीशंकरही या गुरुचरणांचे महात्म्य गातात. ही चरणे हृदयाशी, मस्तकाशी धरण्यास सांगतात.

श्रीअक्कलकोटस्वामींच्या चरित्रात एक मनोज्ञ प्रसंग आढळतो. दादा नावाच्या एका मुलास श्रीस्वामींना दीक्षा द्यावयाची असते. पण त्याच्या आईचा या गोष्टीस तीव्र विरोध होतो. पण विश्वचालक श्रीस्वामी तो विरोध काय जुमानणार! ते भुजंग नावाच्या एका भक्तास म्हणाले, ''फिरंगी! वाघाचे कातडयावर त्यास उभा कर. त्याचे गळयात माळ घाल. हे खेटर घेऊन त्याचे डोकीवर ठेव''.

असे म्हणून पायातील जोडे श्रीस्वामींनी फेकले. ते भुजंगाने दादाच्या मस्तकावर ठेवले. त्याच क्षणी दादाची बुद्धी फिरली. तीव्र वैराग्य प्राप्त होऊन प्रपंचासक्त आईसच तो काही गोष्टी सुनावू लागला. म्हणाला, ''मला एकटयास

सहा वर्षांचा कोकणात टाकून आलीस तेव्हा नाही काही मनास वाटले! आता मी साफ तुझा नाही. महाराज माझे व मी महाराजांचा."

हाच छोटा दादा पुढे 'सच्चिदानंद स्वामीकुमार' या नावाने मोठा अधिकारी पुरुष झाला. आपल्या वडील भावाची म्हणजे 'स्वामीसुत' यांची झोळी प्रसादाची गादी मुंबईस जाऊन त्याने पुढे चालविली.

गुरुपादुका हा गुरुसंप्रदायातील महान् वारसा. त्यांचे पूजन हा भक्ताने घेतलेला वसा. तो उतूनमातून त्याला टाकता येण्यासारखा नाही. कारण हे स्वसंवेद्य असे आदिबीज आहे. त्याला थेंब थेंब जल सबंध आयुष्यभर घालीत राहिल्यामुळेच ज्ञान, भक्ती, कर्म यांची मधुर फळे जीवनवृक्षास येतील. हेच जीवनाचे खरे सार्थक.

# साई नाम मुखीं या येई

साई नाम मुखीं या येई
आनंदाला नकळत आणिक अफाट भरती येई ।।धृ.।।
प्रसन्न मूर्ती भरता नयनीं
तेज फांकते अंत:करणी
मार्ग उजळती निर्भय सुंदर
सुखद सदा पायीं ।।१।।

या साईच्या लीला स्मरता
जीवन सुफलित भाग्य बरसता
या जन्माच्या सार्थकतेला
दिव्य पूर्णता येई ।।२।।

जुळती हे कर झुकतो माथा
ओठीं येते साई गाथा
अणू अणूतून दडला साई
अशी प्रचीती येई ।।३।।

**श्री. कृ. व्यं. हवालदार**
गंगाधर निवास
जयचामराज नगर, हुबळी

# श्री साईनाथांचा 'शरणार्थी १

**लेखक : ब्रम्हीभूत स्वामी साईशरणानंद**
अनुवादक : वि. बा. खेर

राधाकृष्णआईची माझी पूर्वजन्माची काही ओळख असावी. कारण प्रथम दिवसापासूनच तिने माझे लाड केले.

एक दिवस ती मला म्हणाला, ''वामन्या, ही तुझी कफनी फार मळली आहे. ती मी धुवून देते. तू तोपर्यंत स्नान कर''.

मी म्हणालो, ''कफनी डबल मांदरपाटाची जाडी आहे. ती धुतली जाईल परंतु सुकेल कशी ? आरतीचा समय होत आला आहे''.

ती म्हणाली, ''तू काही काळजी करू नकोस.'' असे म्हणून ती कफनी घेऊन गेली आणि माझे स्नान होऊन मी अंग पुसत होतो इतक्यात तिने कफनी स्वच्छ धुवून सुकवून आणली व म्हणाली, ''वामन्या, ही तुझी कफनी घाल.'' फक्त दहा पंधरा मिनिटात हे सर्व तिने कसे केले असेल ते आश्चर्यच होय. आपल्या सिद्धीचा प्रताप अशा रीतीने तिने मला दाखविला असे मी समजलो व अजून पण तसेच मानतो.

१९१६ साली चावडीत आरती चालू होती तेव्हा राधाकृष्णआईपासून मी थोडा दूर कोठीत उभा होतो. तेव्हा तिने स्वतःच्या हातात राधाकृष्णाची मूर्ति घेऊन असा अग्नि प्रदिप्त केला की मूर्ति लाल लाल झाली व मी जरी सहा हात तिच्यापासून दूर होतो तरी माझ्या शरीराला ज्वालेची झळ लागली.

बाबांच्या सूचनेनुसार मी राधाकृष्णआईकडे जाण्याचे सुरू केले होते म्हणून तेथे मला सेवेची संधी मिळाली. सुरवातीला सकाळी राधाकृष्णआईने दाखविल्याप्रमाणे बाबांच्या उपाहाराची चांदीची भांडी मातीने साफ न करता बाहेरून ताजे शेण आणून मी स्वच्छ करी. बाबा लेंडीवर गेल्यानंतर तिने येण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे बाबा लेंडीवर जाण्यासाठी सडकेवर आले की मी तेथे जाई. पुष्कळ वेळा तिच्या खोलीचे दार उशीरा उघडे. तेव्हा मी उशीरा जाई, परंतु सेवेत अंतर पडू दिले नाही. अनेकदा, कुठल्याही कारणाने किंवा कारणाशिवाय ती मला शिव्यांची लाखोली वाही. परंतु मी मनाचा पक्का निश्चय केला होता की बाबांनी मला तेथे सेवेसाठी पाठविले आहे. त्याअर्थी सर्व सहन करावे पण सेवेत खंड पडू देऊ नये. तो माझा निश्चय बाबांनी पक्का करून टिकविला.

नंतर कित्येक वेळा बाबा लेंडीहून परतल्यावर त्यांची बैठक गादी तक्क्या नीट नेटकी करण्यात मी मदत करी. तरी सुद्धा राधाकृष्णआई एकदा माझ्याशी भांडली.

तेव्हा दोन तीन दिवस ही सेवा बंद पडली. मध्यंतरी कोणीतरी बाबांना रेशमाचे हिरव्या रंगाचे झेंडे दांडयांसह भेट दिले होते. साठेसाहेबांच्या वाडया समोरून बाबांच्या लेंडीला जाण्याच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंस थोडया थोडया अंतरावर खड्डे खोदून त्यात हे झेंडे रोवण्याची प्रथा राधाकृष्णाआईने सुरू केली व दुसऱ्या तिसऱ्या दिवसापासून ही कामगिरी माझ्यावर सोंपविली व ती मी कित्येक दिवस यथायोग्य संभाळली. पुढे ही जबाबदारी शिरावर घेतल्यावर सकाळच्या न्याहरी नंतरच्या बैठकीला हजर राहण्याच्या आड येऊ लागल्यामुळे मला आतून असंतोष असे. म्हणून एक दिवस मी हे काम तसेच सोडून बाबांच्या बैठकीस उपस्थित राहिलो. तेव्हा बाबा माझ्याशी बोलले तर नाहीच परंतु बैठकीतून मला उठविले. त्यावरून मी समजलो की रस्त्याच्या दोन्ही बाजूंचे ध्वजारोपण बाबांच्या संमतीनेच राधाकृष्णआईने सुरवात केले असून, ही सेवा सोडून दरबारातील उपस्थिती अधिक महत्वाची समजण्यात माझी चूक होती. म्हणून लगेच प्रथेप्रमाणे मी ध्वज रोवले व नंतर सकाळच्या बैठकीस जाण्याचे कधी पण मनात आणले नाही.

काही दिवसांनी बाबांच्या सकाळच्या फेरीनंतर, तात्या कोते पाटील बाबांकडे येऊन जाण्याच्या अगोदर की नंतर ते मला आता आठवत नाही, गुगुळाचा धुनीत धूप करण्याचे कार्य राधाकृष्णआईने मला दिले होते ते मी करीत असे. परंतु काही कारणाने माझ्याबरोबर भांडून, मला पाठविण्याचे बंद करून दुसऱ्याकडून धुप करण्याचे राधाकृष्णआईने सुरू केले. दोन दिवसानंतर बाबांनी रागावून त्या दुसऱ्या माणसास धूप करण्यास मनाई केली. ताबडतोब त्याच संध्याकाळी राधाकृष्णआईने ही गोष्ट मला सांगितली व सेवा तुझ्याकडून काढून घेण्यात आपली चूक झाली असे कबूल करून मला धूप करण्यासाठी पाठविले, व अशा रीतीने ही माझी सेवा चालू राहिली.

वरील नित्य सेवेशिवाय सणासुणाच्या दिवशी मशीद लिंपण्याचे किंवा धुण्याचे काम चाले. तसेच प्रत्येक सणाच्या दिवशी आवाराची मातीची भिंत व त्यातील झरोके यांची दुरुस्ती तसेच त्यांना शेणाने सारविण्याचे काम चाले, ते पण सर्वांबरोबर किंवा राधाकृष्णआई व मी, बाबा चावडीत गेले असल्यास, त्या रात्री करत असू. चावडीपासून पादुकास्थाना पर्यंतच्या पथावर दोन तारेच्या जाळीच्या कमानी उभारल्या होत्या व त्यावर वेली चढविण्याचे कामास दोन्ही बाजूस खड्डे खोदून राधाकृष्णआईने माझ्यासह सुरवात केली होती.

काही जागी चुना लावण्यात येई. अशा एका प्रसंगी दुपारी बाबा लेंडीवर गेले असता हे काम करण्याचे राधाकृष्णआईने नक्की केले. त्यासाठी सभामंडपात सध्या शिला आहे. तेथे चुन्याचे पींप व बोळा ठेवले होते. राधाकृष्णआईची पींपाकडे पाठ होती व पींप माझ्या समोर होते. एक दोन मुलं चुना बोळ्याने घेऊन चुन्याची नासाडी करत होते, परंतु मी शून्य मनस्कपणे बघत होतो.

राधाकृष्णआईची तिकडे नजर जाताच व मी निश्चेष्ट उभा असलेला पाहून राधाकृष्णआईने रागाने मला दोन चापटया मारल्या व म्हणाली, ''काय दिसत नाही तुला काय नासाडी करून राहिली आहेत ही पोरं'' ? मला मारल्याबद्दल तिला नंतर पश्चाताप झाला असावा. कारण मी मुक्कामावर गेल्यावर लगेच तेथे येऊन तिने माझे समाधान केले.

संध्याकाळी दिसायला मोठी पण वजनाने हलकी अशी घागरीने राधाकृष्णआई पाणी भरत असे व त्या कामासाठी एक दोन दिवस मला बरोबर घेतले. ज्या विहिरीला मोट होती त्या विहिरीतून पाणी काढून घागर आणि एक बादली ती भरे आणि मी घागर व ती बादली घेई. माझ्या घरचे कोणी शिरडीला आल्यास ही सेवा राधाकृष्णआई माझ्याकडून करून घेत नसे. तरीसुद्धा एकदा तिचे न ऐकून मी घागर आणली. त्यावेळी तिने घागरीतील पाणी ओतून टाकले व बाबांनी सुद्धा आपल्या कुटुंबातील माणसासमक्ष केलेल्या अशा सेवेबद्दल नाराजी व्यक्त केली.

कित्येक वेळा मध्यरात्री किंवा सर्व निद्रिस्त झाल्यावर राधाकृष्णआई एकटी जाई व पाणी भरून आणी. हे मी एका मध्यरात्री उठलो तेव्हा प्रत्यक्ष पाहिले. त्यावेळी तिच्या बरोबर जाऊन मदत करण्यासाठी तयारी करता तिने चक्क नाही म्हटले, व मध्यरात्री ही सेवा मला करू दिली नाही. वापरलेल्या मेणबत्तीचं ओघळून गेलेलं मेण परत वितळवून साचात घालून मेणबत्तीचे काम पण मी काही दिवस केले. एकदा कागदाचे लहान लहान सुंदर तुकडे पॅकिंगमधून आले होते त्याची फुलं बनवून हार करण्याचे कार्य तिने माझ्यावर सोपविले. ते मी फुरसतीप्रमाणे माझ्या खोलीत बसून करत असे. असे हार राधाकृष्णआई खुबीने चावडीच्या मंचावरील किनारीवर लटकावी. घोडयासाठी बाजरी सडण्याचे काम सुद्धा मी अनेकदा तिच्या सांगण्यावरून तास तास बसून केले होते. शिवाय अकरा महिने शिरडीत राहून मुंबईला परतल्यावर मे महिन्यात शिरडीला पुन: जाण्याचे झाले त्यावेळी वाळयांच्या पड्यांचे काम चालू होते ते पण राधाकृष्णआईने मला शिकविले व ते सुद्धा मी पुष्कळ प्रमाणात केले. सुतारकाम पण राधाकृष्णआई करी त्यात रांधा मारण्यात मी मदत करी. एकादे काम जर मला येत नसले तर ते मला आग्रहपूर्वक जवळ बसवून राधाकृष्णआई शिकवी.

सेवा करताना थोडी मोडतोड पण माझ्या हातून झाली होती. मशीदीची किंवा चावडीची हंडी माझ्या हातून एकदा फुटली. तसेच राधाकृष्णआईच्या कपाटाची साफसुफी करताना एक काचेची बरणी किंवा झाकण माझ्या हातून फुटले. नवीन बरणी आपण आणून द्यावी या हेतूने मी ती बरणी लपवून ठेवली. वामनराव नार्वेकरांना नवी हंडी व बरणी माझ्या खर्चाने आणण्यासाठी विनंती केली ते त्यांनं

राधाकृष्णआईला सांगितले. राधाकृष्णआईने तसे करण्यास मनाई केल्याने मी गप्प बसलो.

दरम्यान एक दिवस दुपार नंतर भोजनाची वेळ होताच ती म्हणाली, ''येथे माझा एक 'आणा' होता तो तू चोरलास''. मी म्हणालो, ''मी तुझा आणा पाहिला नाही परंतु तुला तसं वाटत असल्यास हा आणा घे. असे म्हणून मी तिला एक आणा दिला. त्यामुळे ते प्रकरण लांबले नाही*.

* हया रूपकाचा अर्थ स्वत: मेहनत करून ''ज्ञानाची चोरी'' केली असा होतो हे पुढे लेखकाला विषद झाले त्याची हकीकत पुढे येईल.

# साई-महिमा

देवातूनी देवा, साई देवा
कशी करू मी तुझी सेवा ।
जेव्हा घडते तुझे दर्शन
विसरून जाते देह-भान ।।१।।

जेव्हा येते मी शिर्डीस
लागते मला तुझी आस ।
असे वाटते बसावे चरणी
उठूच नये कुठल्याच कारणी ।।२।।

तुजकडे आहे श्रद्धेची तिजोरी
म्हणतोस भक्ता धरा सबूरी ।
सर्व काही मिळेल तुमच्या पदरी
श्रद्धा सबूरी सोडू नका परी ।। ३।।

तुजकडे आहे दयेचा सागर
म्हणूनच भरतो भक्तांची घागर ।
येतात भक्त शिर्डीच्या मार्गात
तु नेतोस त्यांना सुखाच्या स्वर्गात ।।४।।

**कु. चित्रा उद्धव बल्लाळ**
G/23 कुमार सोसायटी
नेहरू रोड, सांताक्रुझ (पूर्व)
मुंबई ४०० ०५५.

# दक्षिण भारतात श्रीसाईभक्तिचा प्रसार करणारे प. पू. श्री. नरसिंह स्वामीजी

**श्री. सदानंद चेंदवणकर**
कार्यकारी संपादक "श्रीसाईलीला"
श्री साईबाबा संस्थान, शिरडी.



प. पू. नरसिंह स्वामीजी

सडपातळ अंगकाठी, मध्यम बांधा, धड उंच नाही की ठेंगूही नाही. भव्य भाल प्रदेश त्यावर केशरी गंधाचा टिळा, पांढरी शुभ्र दाढी, शोधक वेधक नेत्र, अंगावर लांब पांढरा झब्बा, कमरेभोवती गुंडाळलेली व चांगली लांब पायापर्यंत आलेली पांढरी धोती, खांदयाला अडकवलेली कापडाची पिशवी आणि त्या पिशवीत बघावे तर काय? शिरडी-द्वारकामाईतील धुनीतील उदीच्या बारीक बारीक कित्येक पुडया, स्वत: तयार केलेली श्री साई अष्टोत्तरशत नामावली पुस्तिकेच्या प्रती आणि श्री साईबाबाची कार्ड साईजची छायाचित्रे हातात बाबांची शिळेवर आरूढ असलेल्या छायाचित्राची तसबिर. अशा थाटात ही वयोवृद्ध व्यक्ती झपाझप पावले टाकीत असे. रस्त्यात अधून मधून थांबे, ओळखी देखीची मंडळी त्यांना लवून नमस्कार करीत. क्षणभर ही व्यक्ती थांबून त्यांची आपुलकीने विचारपूस करी. दु:खी आजारी असलेल्या व्यक्तीच्या घरी ही व्यक्ती अवश्य जाई. त्या व्यक्तीस धीर देत असे आणि निरोप घेताना उदीची पुडी, बाबांचे चित्र हमखास देत असे आणि "बाबा परिपूर्ण प्रसाद सिद्धी रस्तू" म्हणून शुभाशिर्वाद देत असे.

दक्षिण भारतात या वंदनीय विभूतीला मोठा मान दिला जात असे. या थोर व्यक्तीचे नाव आहे. प. पू. श्री. नरसिह स्वामीजी. दक्षिणेत श्री साईबाबांचा प्रसार, प्रचार, बाबांची मंदिरे, बाबांच्या विषयीचे सर्व प्रकारचे साहित्य इत्यादी बद्दल जर हिरीरिने व तळमळीने कुणी कष्ट घेतले असतील तर ते श्री. नरसिह स्वामीनींच. आपल्या हयातीत त्यांनी मद्रास येथे "ऑल इंडिया साई समाज"या संस्थेची स्थापना केली व आजही ही संस्था चांगली नाव रूपाला आलेली संस्था म्हणून ओळखली जात असून श्री. स्वामीजींचे ध्येय समोर ठेऊन कार्य करीत आहे. दरवर्षी या संस्थेतर्फे अखिल भारतीय पातळीवर साईभक्तांचा मेळावा भरविला जातो, व देशातले बहुसंख्य सुशिक्षित, सुसंस्कृत साईभक्त या निमित्याने गोळा होतात. दोन दिवस हे अधिवेशन भरविले जाते.

प. पू. नरसिह स्वामीजींचा जन्म २९ ऑगस्ट १८७४ रोजी दक्षिण भारतातील कोईमतूर जिल्हयातील भवानी या शहरात झाला. या शहराला हे नाव तेथील नदीवरून पडले आहे. त्यांचे वडील बी. वेंकटगिरी अय्यर हे तेथील एक सुखवस्तू गृहस्थ होते. नरसिहाच्या मातोश्रींचे नाव अंगाचीयामल अय्यर. हे अय्यर कुटूंब सनातनी व मोठे धार्मिक वृत्तीचे होते.

नरसिहाच्या लहानपणीच या अय्यर कुटूंबाने भवानी शहर सोडले व ते सालेम येथील लक्ष्मीनारायणाच्या मंदिरा जवळ राहिले. त्यांचे तेथले घर हे सालेम मधील चांगले मोठे भव्य असे ओळखले जात होते. बी. वेंकटगिरी सालेमला आल्यावर वकीलीचा व्यवसाय करू लागले, व आपल्या या व्यवसायात ते चांगल्या प्रकारे ओळखले जाऊ लागले.

छोटया नरसिहाचे प्राथमिक व दुय्यम शिक्षण सालेम येथे झाले. शिक्षण घेत असताना ते नियमितपणे शाळेत जात व दिलेला अभ्यास पूर्ण करीत असत. विद्यार्जनात त्यांचे लक्ष होते. सालेम येथूनच मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी मद्रासच्या ख्रिश्चन कॉलेजात पुढील अभ्यासासाठी प्रवेश केला व बी.ए. पदवी घेऊन ते पदवीधर झाले. पुढे बी.एल. या वकीलीच्या पदवी परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी मद्रासच्या लॉ कॉलेजात प्रवेश केला व तेथून ते वकीलीची परीक्षा पण उत्तीर्ण झाले.

बी.ए.बी.एल. वकील झालेले तरुण नरसिहजी १८९५ साली सालेमला परतले, व तिथे त्यांनी वकीलीच्या व्यवसायास आपल्या वडीलांचा आदर्श समोर ठेवून सुरुवात केली. आपला कज्जा-खटला चालविताना ते अतिशय शांत असत व प्रसंगी गंभीर होत. यामुळे त्यांना यश मिळत असे.

सालेम गाव थिरुमतीमुथ्रन ओढयाच्या काठावर वसलेले आहे. तेथल्या नसटमपट्टी तलावातील पाण्याचा पुरवठा येथे केला जातो. याच पाण्यावर येथले बाग-बगिचे,

व छोटे मोठे उद्योग, व्यवसाय चालतात. तेथल्या सर्विशय टेकडीच्या ऊतारावर कॉफीची लागवड होते. पण या शहरात सारखा प्लेगचा प्रादुर्भाव होत असे. येथल्या नगरपालिकेला चांगल्या प्रशासकाची गरज होती ती नरसिंहजींनी भागविली. ते सालेम नगरपालीकेचे अध्यक्ष निवडून आले. तसेच सालेम कोऑपरेटिव्ह बँक व सालेम लिटरसी सोसायटी या संस्थांशी त्यांचा घनिष्ट संबंध आला. बँकेचेही ते अध्यक्ष झाले. त्यावेळी सालेम मध्ये जस्टिस सुंदरम चेट्टीयर, चक्रवर्ति रोजगोपाला चारियर व श्री. मुथ्थुकृष्ण अय्यर या तीन कार्यकर्त्या व्यक्ती होत्या. सालेममध्ये श्री. नरसिंहजीचा विवाह सौ. सीता लक्ष्मी यांचे बरोबर झाला. तिच्या पासून त्यांना अपत्य संपदा पण लाभली.

सालेम मधे जनतेने केलेल्या तक्रारीची चौकशी ते तातडीने करीत व प्रजेला समाधानकारक उत्तरे देत यामुळे ते तिथे खूपच लौकीकाला व आदराला पात्र झाले. यामुळेच की काय सालेम, कोईमतूर व निलगिरी मधून ते मद्रास विधीमंडळावर निवडून गेले. प्रादेशिक भाषेत मद्रास विधीमंडळात बोलणारे ते पहिलेच लोकप्रतिनिधी होत. आपल्या भाषणातून ते इंग्रजी व संस्कृत साहित्यातील उतारेच्या उतारे संदर्भा दाखल देत असत. लिटरसी सोसायटीत ते एक उत्कृष्ट टेनिस व बिलीयर्ड खेळाडू म्हणून गाजले होते.

श्री. नरसिंहजी संबंध दिवसभर कुठेही व कसल्याही कामात असोत पण सायंकाळी ठीक सहाच्या ठोक्याला ते आपल्या निवासस्थानी परतून पुजा-पाठ करीत असत. त्यांचा हा नियमितपणा अगदी वाखाणण्याजोगा होता. राजकारणात ते लो. टिळकांनाच मानीत. १९१४ साली ते लेजिसलेटिव्ह कोन्सीलमध्ये बहुमताने निवडून आले व १९२० सालपर्यंत ते सभासद होते. ॲनी बेझंट यांनी सुरु केलेल्या होम रुल चळवळीत ते एक क्रियाशील कार्यकर्ते होते. १९१७ साली लीगतर्फे ब्रिटनमध्ये पाठविलेल्या त्रिसदस्यामध्ये त्यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. सर जॉन जोसेफ हे मदुराईचे सभासद व श्री. मंजिरी रामा अय्यर हे आणखीन दोन सदस्य त्यांचे बरोबर होते. या तिघांना भारताची बाजू मांडण्यासाठी ब्रिटनमध्ये पाठविण्यात आलेले होते. परंतु या त्रिसदस्यांना ब्रिटीश वार कॅबिनेटने जिब्राल्टर येथे १५ दिवस अडकवून ठेवून नंतर भारतात परत पाठविले. या अपमानामुळे १९२० साली त्यांनी निवडणूकीचे वेळी असहकार दाखविला. १९२५ सालपर्यंत नरसिंहजी लोकप्रियतेच्या, प्रसिद्धीच्या सर्वोच्च पदापर्यंत पोचलेले होते. त्यांची वकील म्हणून ही कामगिरी गौरविली गेली होती. पण याच सुमारास त्यांचेवर दुर्दैवी कौटुंबिक आपत्ती कोसळली व त्यामुळे त्यांनी आपल्या व्यवसायाला व सार्वजनिक सेवेला अगदी कायमचा रामराम ठोकला.

ती घटना अशी की, त्यांची दोन लहान मुले जयराम व सावित्री ही खेळता खेळता त्यांच्याच आवारातील विहिरीत अचानकपणे पाय घसरून पडली व ती

पाण्यात बुडाली. या आघातामुळे ते दु:खी कष्टी झाले. या दु:खद स्थितीतून त्यांनी आपल्या आणखीन दोन कन्यका राजलक्ष्मी व शारदाम्बल यांना चांगले शिक्षण देऊन, त्यांचे विवाह करून देऊन त्यांना मार्गाला लावले.

आपल्या सर्व समाजकार्याला रामराम ठोकल्यावर नरसिंहजींनी आपल्यावर अशा प्रकारची दुर्दैवी आपत्ती आणणाऱ्या भगवंताचा शोध घेण्यात आपल्या उर्वरित आयुष्याचा कालखंड घालविला. १९२५ साली त्यांनी वकीलीची सनद सरकारला परत केली. सालेम येथील आपल्या निवास स्थानालगतच्या लक्ष्मी नारायण मंदिराचे कामकाज पूर्ण करून ज्येष्ठ आचार्यांचा आशिर्वाद घेऊन ते घराबाहेर पडले. प्रथम ते अरुणाचलमच्या रमण महर्षिंच्या आश्रमात आले. तेथून भारतातील तीर्थक्षेत्रांना व परमपवित्र स्थळांना भेटी देत देत नगर जिल्हयातील साकोरीस श्री. उपासनींकडे आले. मेहेरबाबांच्या भेटीचाही त्यांना लाभ झाला. उपासनींनी त्यांना भक्तिमार्गाचाच अवलंब करण्याचा आदेश देऊन जप, भजन, पारायण इ. बद्दल सदुपदेश केला. १९२५ ते ३० साल पर्यंत नरसिंहजीनी असा काळ घालविला. पुढे हुबळी, पंढरपूर केडगाव असाही प्रवास त्यांनी केला. नंतर स्वामीजींनी श्री उपासनीचे मार्गदर्शक श्री साईनाथ महाराज यांचा प्रचार, प्रसार व सेवा करण्याचे व्रत जे घेतले व ते अगदी हयात भर पाळले.

श्री. नरसिंहजींनी श्री साईबाबांच्या बद्दलची सर्वती बारीक सारीक माहिती मिळवून बाबांच्या चरित्राचे चार खंड इंग्रजीत लिहिले. या कामी त्यांना इंदूरचे श्री. रेगे व श्री. अवस्थी यांचे भरपूर सहाय्य झाले. त्यांच्या त्या चरित्राचे तामिळी, कन्नडी, व मल्याळम भाषेत अनुवाद झाले आणि त्यामुळे दक्षिणेत त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. दक्षिणेत श्री साईबाबांचा असा प्रचार-प्रसार श्री. नरसिंहजीनीच केला व त्यांच्या त्या भरीव कार्यामुळे ते "नरसिंह स्वामीजी" म्हणून ओळखले जाऊ लागले. साईबाबांच्या चरित्राप्रमाणेच रमण महर्षि यांचे चरित्रही त्यांनी लिहिले. स्वामीजींच्या इंग्रजी साई चरित्रामुळे ऑर्थर ओसबोर्न सारखे पाश्चात्यही प्रभावीत झाले. १९३६ साली स्वामीजी प्रथमच शिरडीला गेले व श्री साई समाधी पुढे नतमस्तक झाले. अनेक श्रेष्ठ साईभक्तांशी त्यांचा परिचय झाला. पुढे स्वामीजींनी 'साई स्तोत्रम' लिहिले. अबदुल बाबांची व त्यांची गाठभेट झाली. बाबांचे अनेक जागृत अनुभव त्यांना येऊ लागले. त्यांना दिव्य संदेश त्यांचेकडून मिळत गेले. बाबांचे व त्यांचे गूढ संभाषण चाले. अशाप्रकारे साईसेवेला वाहून घेतलेल्या स्वामीजींनी १९३९ साली मद्रास-मैलापूर येथे 'ऑल इंडिया साई समाज' या नावाची साई भक्तीचा प्रसार प्रचार करणारी संस्था स्थापन केली. "हू इज साईबाबा' हे त्यांचे १ ले प्रकाशन १९३९ साली भक्तांसमोर आले त्याची त्यावेळी किमत होती अवघी एक आणा. सर्वांनाच ते खरेदी करता आले म्हणून ते खूपच लोकप्रिय झाले होते. 'वंडरस सेंट' हे त्यांचे दुसरे लोकप्रिय पुस्तक होय.

'श्रीसाईचरित्र नाटकम'हे सात अंकी नाटक पण त्यांनी लिहिले. १९४० साली ''साईसुधा' नावाचे मासिक त्यांनी सुरू केले ते आजतागायत चालू आहे. १९४६ साली ऑल इंडिया साई समाजा तर्फे पहिला मेळावा मद्रास येथे भरविला गेला त्यावेळी देशातले २०० हून अधिक साईभक्त चार दिवसाच्या समारंभास हजर होते. यंदा २२ वे अधिवेशन भरविले गेले. समाजातर्फे मंदिर, शाळा, दवाखाना, छापखाना, वाचनालय इ. उपक्रम राबविले जातात. १९४५ च्या जानेवारीत नरसिंह स्वामीजींनी 'ग्लिमसेस ऑफ साईबाबा'हा ग्रंथ लिहून पूर्ण केला व तो पुस्तक रूपाने प्रसिद्ध पण झाला. त्यांनी लिहिलेले चार खंड श्रेष्ठ दर्जाचे म्हणून समजले जातात. त्यांचा 'चार्टर्स ॲण्ड सेईंग' हा ग्रंथ १९५३ साली पूर्ण झाला. म्हैसूरचे महाराजांनी ९ सप्टेंबर १९५३ रोजी मद्रास साईमंदिराला भेट देऊन ५००० रु. ची देणगी दिली. या निधीतून या ग्रंथाची छपाई करण्यात आली होती.

अक्टोबर १९५३ मध्ये श्री नरसिंहस्वामीजींना एक अपघात झाला. आपल्या स्नानगृहात पाय सरकून ते पडले व त्यामुळे त्यांच्या मांडीचे हाड मोडले. आठ आठवडे तेथल्या जनरल हॉस्पीटलमधे त्यांना ठेवण्यात आले होते. या अपघातामुळे त्यांची प्रकृती अधून मधून नरमगरम असे. १२ सप्टेंबर १९५६ रोजी त्यांचा ८३ वा वाढदिवस समाजातर्फे साजरा करण्यात आला. ८ अक्टोबर १९५६ रोजी त्यांची प्रकृती अचानक बिघडली. अपचन व ताप यामुळे ते आपल्या बिछान्यावरून हलूच शकले नाहीत. त्यांच्या पायाला सूज आली. संवेदना त्यांना होईनाशी झाली आणि १९ अक्टोबर १९५६ रोजी पहाटे ३ वाजून ४५ मिनिटांनी स्वामीजी श्री साई चरणी विलीन झाले.

श्री. नरसिंह स्वामीजींच्या हयातीतच श्री. के. राधाकृष्णन उर्फ साईपादानंद राधाकृष्ण स्वामीजींची समाजाच्या कार्यकारी पदावर नेमणूक करण्यात आली होती. स्वामीजींनी आपल्या अगदी तोडीच्याच कार्यकर्त्याची योजना आपल्या पदावर केलेली होती. श्री राधाकृष्ण स्वामीजींनी पण श्री साईबाबा प्रचार प्रसाराचे भरघोस कार्य आपल्या गुरुजींप्रमाणेच केले पण त्यांचे सुद्धा १९८० चे मकर संक्रांतीला स्वर्गारोहण झाले. त्यांनी बंगलोर येथे 'श्री साई स्पिरीच्युअल सेंटर'या नावाची संस्था स्थापन केली. ही संस्थाही भरीव कार्य करीत आहे. आज मद्रास व बंगलोर येथे 'ऑल इंडिया साई समाज' व 'साई स्पिरीच्युअल सेंटर'या संस्था एकच संस्था म्हणून ओळखल्या जातात. मद्रास येथे समाजाच्या जागेत नरसिंह स्वामीजींची एक खोली असून तिथे त्यांच्या सहवासातील वस्तू काळजीपूर्वक जतन करून ठेवलेल्या आहेत. तर बंगलोर येथल्या सेंटरमध्ये 'हंसनिकेतन' नावाची राधाकृष्ण स्वामीजींची पण एक खोली असून तिथेही त्यांच्या सहवासातील वस्तू ठेवलेल्या आहेत.

या दोन्ही श्रेष्ठ संतांना कोटी कोटी प्रणाम.

# ऑल इंडिया साई समाजाचे यशस्वी अधिवेशन

प. पू. नरसिंह स्वामीजींनी मद्रास येथे स्थापन केलेल्या ऑड इंडिया साई समाजातर्फे २२ वे साई भक्तांचे अधिवेशन बंगलोर येथे २३ व २४ नव्हें १९८५ या दोन दिवशी यशस्वीपणे पार पडले. प. पू. राधाकृष्ण स्वामीजींनी बंगलोर येथे स्थापन केलेल्या श्री साई स्पिरीच्युअल सेंटरच्या नव्या भव्य विस्तारीत मंदिराचे वास्तूत यंदा अधिवेशन सेंटरचे वतीने भरविण्यात आलेले होते.

संमेलनाचे सुरवातीला श्री साईबाबांच्या भव्य प्रतिमेची श्री राम मंदिरापासून तो एन.आर. कॉलनीतील श्री साईबाबा मंदिरापर्यंत प्रचंड मिरवणूक वाजत गाजत काढण्यात आली. नंतर प्रतिमेपुढे दिप आराधना करण्यात आली. त्यानंतर श्रीमती सरोजा श्रीधर यांनी स्वागतपर पद्य गायिले. नंतर श्री साई स्पिरीच्युअल सेंटरचे अध्यक्ष श्री. एस.पी. नांनजुंडा मुदलियार यांनी सर्वांचे स्वागत केले. नंतर स्वामी विवेकानंद आश्रमाचे स्वामी श्री दयात्मानंद यांनी सुंदर उपदेशपर भाषण केले. व भक्तिमार्ग म्हणजे काय ते समजावून सांगितले. त्यांचेनंतर श्री वरदादेशिकार, डॉ. पै, श्री. रघुराम इ. ची भाषणे झाली. या अधिवेशन प्रसंगी कर्नाटक राज्याचे माजी शिक्षण मंत्री श्री अे.आर. बद्रीनारायण अध्यक्ष होते.

दुपारच्या अधिवेशनात देशातील काकीनाडा, दावणगेरी, बंगलोर, कोईमतूर इ. निरनिराळ्या श्री साईमंदिरांची, श्री साई संस्थांची माहिनी त्या त्या संस्थाच्या अधिकारी मंडळींनी कथन केली.

दिनांक २४ रोजीच्या कार्यक्रम प्रसंगी ऑल इंडिया साईसमाजाचे अध्यक्ष श्री. टी. केशवराव अध्यक्ष स्थानी होते. यावेळी भक्तांनी आपले श्री साईबाबांचे विषयीचे आलेले अनुभव कथन केले. कर्नाटक राज्याचे माजी मुख्य सचिव व बंगलोरच्या भारतीय विद्याभवनाचे अध्यक्ष डॉ. जी.व्ही. के राव यांनी श्रीसाईबाबा व ऐतिहासिक परंपरा या विषयावर भाषण केले. त्यांचे नंतर श्री. एम. रंगाचारी यांनी भाषण केले. दुपारी आपापले साई अनुभव व भक्ती या बद्दलचे विचार भक्तांनी दिले. शेवटी मद्रास येथील समाजाचे चिटणीस श्री मुथ्थू वेंकटरामन यांनी आभार प्रदर्शन केले. या अधिवेशनाची एक रंगीत फिल्म घेण्यात आली.

या अधिवेशन सोहळ्यास देशातील सुमारे २०० प्रतिनिधी हजर होते. दोन्ही दिवस भक्तांची निवास, भोजन, चहापान इ. ची सुंदर व्यवस्था सेंटरने चांगली ठेवली होती. दोन्ही दिवशी सायंकाळी व्ही.डी. ओवर श्री बाबांचे विषयीचे रंगीत चित्रपट दाखविण्यात आले. मुंबई महाराष्ट्रातून सुमारे १५ प्रतिनिधी या अधिवेशनास हजर होते. अधिवेशन प्रसंगी १०० पानांची एक सुरेख स्मरणिका

ही प्रकाशित करण्यात आली. त्यात विविध मान्यवर भक्तांचे वाचनीय व संग्राह्य लेख समाविष्ट करण्यात आलेले आहेत. अधिवेशनास थोरामोठ्यांचे संदेशही बरेच आले होते. सर्वांतर्फे आभारप्रदर्शन स्पिरीच्युअल सेंटरचे उपाध्यक्ष श्री. आर. शेषाद्री यांनी केले. श्रीसाईलीलाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर या अधिवेशनास उपस्थित होते. ९७ वर्षांच्या मुदलियार घराण्यातील वयोवृद्ध तपस्वी माताजी यांनीही अधिवेशन प्रसंगी भक्तांना दर्शन दिले.

# श्री साईबाबा संस्थान, शिष्यवृत्ती

श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांचेकडून सन १९८५ करिता गरीब व हुशार अशा पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करावयाचे आहे.

तरी इ. १० वी (नवीन एस.एस.सी.) वा त्यापुढील कोणत्याही महाविद्यालयीन तसेच कोर्सेसच्या परिक्षेत शेकडा ६० टक्के किंवा त्याहून जास्त. गुणसंख्या असणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक संस्थेमार्फत संस्थानचे ठराविक नमुन्यातील अर्ज पाठवावेत.

अर्जाची प्रत श्री साईबाबा संस्थान, शिरडी ता. कोपरगाव जिल्हा अहमदनगर यांचेकडे मोफत मिळतील. पोष्टाने पाहिजे असल्यास स्वतःचा पत्ता असलेले ५० पैशाचे तिकीट लावलेले पाकिट अथवा ५५ पैशाची पोष्टाची तिकीटे पाठविल्य मिळतील.

छापील अर्ज मागविण्याची अंतिम मुदत १५.१.१९८६ स्विकारण्याची अंतिम मुदत ३१.१.१९८६ अशी आहे.

मुदतीनंतर आलेल्या किंवा अपुरी माहिती असलेल्या तसेच होत नसलेल्या अपात्र अर्जाचा विचार केला जाणार नाही पत्रव्यवहारही केला जाणार नाही.

# शिरडीचे धन्वंतरी - श्रीसाईबाबा

**सौ. निला अनिल रसाळ**
२०९३, बेलबाग,
रत्नागिरी

बहुदा प्रत्येक माणसाला आपत्तीच्यावेळी परमेश्वराची आठवण होते. दारी सुख पाणी भरत असतां आनंदाच्या भरात डोळयांवर संपत्तीचा गर्व चढलेला असतो आणि आपण थोडया बेफिकीरीने वागतो. साधुसंत म्हणजे आपल्या बहुमूल्य वेळेचा अपव्यय करणारे भ्रमिष्ट लोक असे गृहित धरून शक्यतो त्यांना टाळण्याचा प्रयत्न प्रत्येकजण करीत असतो. आपत्ती कोसळल्या, असहय रोगाने देह पिडीत झाल्यावर मात्र देवाची प्रकर्षाने आठवण होते. साधुसंतांचे पाय धरण्याची ओढ लागते. संसारात विरक्तपणा आल्यामुळे संत समागमाची इच्छा झालेले आणि परमेश्वराला खऱ्या निःसीम भक्तीने आळविणारे फारच थोडे आढळतात.

साईबाबांच्या बाबतीतही तसेच घडले. बाबांचा किर्ती परिमल जसजसा वाढला तसतसे त्यांच्या दर्शनासाठी लांबलांबचे लोक येऊ लागले. त्यापैकी बरेच लोक रोगाने त्रस्त झाल्याने बाबांच्या कृपेने गुण मिळावा याच आशेने येत होते. बाबांचे वैद्यकीय ज्ञान परमोच्य कोटीला पोहोचलेले होते. किंबहूना या भूतलावर प्रतिधन्वंतरीच मनुष्यरुपाने जन्माला आले होते. हजारो लोकांनी आपली व्यथा नाहीशी करून घेऊन प्रत्यक्ष अनुभव घेतला.

गावातील एखादा मनुष्य आजारी पडला तर बाबा स्वतः त्याच्या घरी जाऊन औषधोपचार करीत आणि स्वतः अंगमेहनतीने त्या आजारी माणसाची सेवा-सुश्रुषा करीत. बाबांना आयुर्वेदाचे तसेच निरनिराळया औषधी वनस्पतींचे व भस्मांचे चांगले ज्ञान असावे हे प्रत्यक्ष पुराव्यानिशी सिद्ध होते. एक निःस्वार्थी, मोफत औषध देणारा हकीम म्हणून त्यांचे नाव आजुबाजूच्या खेडयात पसरू लागले आणि लोकांच्या झुंडीच्या झुंडी शिरडीकडे धावू लागल्या. बाबांचे औषधोपचारही भिन्न भिन्न तऱ्हेचे आणि चमत्कारीक असत. बाबांच्या रोगी भक्ताना आलेले नुसते अनुभव जरी एकत्र करण्याचा कुणी प्रयत्न केल्यास अत्यंत आश्चर्यकारक आणि बाबांच्या बुद्धीमत्तेची साक्ष पटविणारा एक ग्रंथच तयार होईल. म्हणून बऱ्याच भक्तांना आलेले अनुभव विविध प्रकारचे अनुभव साईलीलामध्ये देण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

शिरडी गावात त्यावेळी कोणी वैद्य अगर डॉक्टर नव्हता. एकदा बाबांकडे एक रोगी आला. त्याचे डोळे लाल व सुजलेले होते. त्याला पहाताचक्षणी बाबांनी

थोडे बिब्बे दगडावर ठेचून त्याचे दोन गोळे केले व ते त्याच्या दोन्ही डोळ्यात कोंबून डोळे फडक्याने घट्ट बांधून ठेवले. काही वेळानें डोळ्यावरील बांधलेले फडके सोडून त्यावर पाण्याची सतत धार धरली. चमत्कार असा झाला की त्याच्या डोळ्यावरील सुज संपूर्ण ओसरलीच व डोळेही स्वच्छ झाले. बाबांची औषध पद्धती अशी चमत्कारीक होती. डोळ्यासारख्या नाजुक अवयवात बिब्बे घालण्याचा धाडसी प्रयोग सत्पुरुष बाबांशिवाय कुठलाही हकीम करू शकेल काय? बाबांची औषधोयोजना ही केवळ भक्तांच्या मनाचे समाधान करण्याकरीता निमित्तमात्र केलेली उपाययोजना असें. बाबांच्या मुखावरील तेज आणि बाबांची वाणीच इतकी विलक्षण प्रभावी होती की तिचे सामर्थ्य मानवी मनाला कधीही आकलन करता येणार नाही.

एखाद्याला काही अपाय झाला तर त्यावर उपाय म्हणून बाबा असे चमत्कारीक इलाज करीत की बघणाऱ्यांची मति गुंग होत असे. बाबांची इच्छा शक्ती देखील पूर्णत्वाला पोहोचलेली होती. कारण काही असाध्य रोग बाबांनी आपल्या तिक्ष्ण नजरेच्या एकाग्रतेने बरे केलेले आहेत. भक्तांची साईबाबांवरील श्रद्धाच कित्येकदा उपयोगी पडे. साईबाबांनी पायाखालची माती जरी उचलून दिली तरी तिचे सुवर्णभस्मांत रूपांतर होऊन अचूक गुण येत असे. साप-विंचू चावून विषबाधा झालेल्या पुष्कळ भक्तांना बाबांनी नुसत्या मंत्राने अथवा मातीच्या फुंकरीने बरे करून दाखविले. एखाद्या जादुगाराप्रमाणे बाबा अशाप्रसंगी विस्मयकारक प्रयोग करून दाखवित आणि भक्तांच्या वेदना नाहीशा करीत. एखाद्या भक्ताला स्वप्नात दृष्टांत देऊन औषधयोजना सांगितल्याची उदाहरणे खुप आहेत.

भूतलावर होऊन गेलेले सर्व संत त्या त्या वेळी विशेष प्रसिद्धी पावले, पण नंतर त्यांच्या पश्चात् लोकांना त्यांची विस्मृती होत गेली. साईबाबांच्या अवतारकार्यात विलोभनीय दृश्य पहावयास मिळते. ते हे की, बाबा भूतलांवर आपले लोक जागृतीचे कार्य करीत असताना जितके लोक त्यांच्या दर्शनाला जात होते त्याच्या लाखो पटीने अधिक भक्त आज शिरडीला आकर्षिले जात आहेत. बाबांनी आपल्या कार्याची मुहूर्तमेढ भक्तांच्या अंतःकरणात इतकी घट्ट आणि खोल रोवून ठेविली आहे की खरा श्रद्धाळू भक्त आपल्या कर्तव्यापासून तिळभरही पदच्युत होणार नाही. बाबा भक्तांना प्रसाद म्हणून उदी देऊ लागले. त्यांच्या उदीतही इतके सामर्थ्य होते की तिच्यापासून भक्तांचे सर्व रोग बरे होऊ लागले आणि त्यांच्या मनोकामना पुर्ण होऊ लागल्या. म्हणून बाबांनी सांगितले आहे. देवावर पूर्ण श्रद्धा ठेवा म्हणजे सबुरीने तुम्हाला फळ निश्चितच मिळेल. हाच तो श्रद्धा-सबुरीचा अर्थ.

।। श्री साई समर्थ ।।

# सर्वसामान्यांचे दैवत - श्रीसाईबाबा

**श्री. चकोर आजगावकर** एम.ए.
(उपसचिव अर्थखाते महाराष्ट्र शासन)
वाय ११/१७० सरकारी वसाहत, वांद्रे
(पूर्व) मुंबई ४०० ०५१.

*** श्रीसाईबाबा हे तुमचे आमचे संत**

श्रीसाईबाबा हे सर्वांचे संत आहेत. सामान्य माणसाचे देव आहेत. रंजल्यागांजल्याचे सहजगम्य असे पालनकर्ते व तारणहार आहेत. ते सहाय्यक, मित्र, गुरु, मार्गदर्शक व कैवारी आहेत. असार संसारात प्राप्त झालेला हा चिंतामणी आहे. ती तुमची आमची कामधेनू आहे. हा सर्वांचा कल्पवृक्ष आहे! म्हणूनच इतर संतापेक्षा वा इतर देवतापेक्षा श्रीसाईबाबा हे आमचे जवळचे दैवत आहे. जिवाचे जिवलग, महोदार दातार आहेत.

*** ज्ञानी व जिज्ञासू योग्यासाठी बाबा नाहीत**

श्री बाबा हे मुख्यत: संसारी साधकांसाठी, अर्थार्थी आर्त भक्तासाठी आहेत. त्यांच्या सुखदु:खावर फुंकर घालून त्यांना सन्मार्गाकडे वळविण्यासाठी आहेत. योगी, ज्ञानी, जिज्ञासू जनांवरही त्यांची कृपा होत असली तरी त्यांच्या कार्याची दिशा अशा साधक सिद्धीसाठी नाही. जे ज्ञानी व कैवल्यमार्गी आहेत, त्यांच्यामार्गात बाबा स्वत:चे आविष्करण (projection) करीत नाही. त्यांनी आपल्या गुरुशी एकनिष्ट राहून आपल्या नियत मार्गाने पुढे जावे असे बाबांचे सांगणे आहे. तसे अनुभव त्यांनी घोलप शास्त्री, स्वामीसमर्थ इत्यादीच्या भक्तांना दिलेले सर्वांना स्मरत असतीलच. रामभक्त, शिवभक्तांना त्यांच्या दैवताचे दर्शन देऊन बाबांनी त्यांची तीही भक्ती दृढ केली आहे. त्यांना साईभक्ती वा स्वत:चे अनुसरण बाबांनी सांगण्याचे कटाक्षाने टाळले आहेत. जे नामस्मरण करीत आहेत, वेदांतपाठ करीत आहेत, योगज्ञानात्मक साधना करीत आहेत. त्यांना बाबांनी आशिर्वाद देऊन त्यांची श्रद्धा सबुरी बळकट केली आहे. मात्र बाबा तुम्हा आम्हा साध्यासुध्या प्रपंचरत व मायाशक्तीने वेढलेल्या सामान्य भक्तांचे गुरु व दैवत आहेत. आमच्या सारख्या सामन्यांचा बाबांनी सदैव स्वीकार केला आहे.

*** परब्रम्हमूर्ती साई**

श्रीबाबा हे स्वत:च सिद्धपुरुष आहेत, परब्रम्हाशी ते एकरूप आहेत. परब्रम्हाच्या मायाशक्तीला सहज हाताळून त्यांनी अद्‌भूत चमत्कारांचे दर्शन घडविले आहे. सर्वसाधारण प्रापंचिक वा संसारी इसमास ज्ञान योगात्मक त्यागमय

साधना कठीण असल्याने त्यांचे गुरुत्व व मार्गदर्शकत्व बाबांनी स्वत:वर घेतलेले आहे. ते गीतेचे कृष्ण आहेत. ज्यांना ध्यानयोग व ज्ञानसाधनेचे दुष्कर मार्ग जमत नाहीत, त्यांच्यासाठी ते स्वत:च गुरु बनले आहेत. "**माझ्यावर श्रद्धा ठेवा, माझ्याचरणी कर्मे अर्पणकर, माझ्यावर मनबुद्धी एकाग्र कर, विकार माझ्या पायी समर्पण कर, माझे रुप व नाम स्मर, मी तुला भवाच्या पैलपार नेईन, जन्म मृत्यूच्या चक्रापलीकडे नेईन, मी तुम्हाला मोक्ष देईन, मी तुमचा योगक्षेम वाहीन, तुमची अल्पसाधना पुढील जन्मात मी तशीच चालू ठेवावयास सहाय्य करीन**" हे **साईकृष्णाच्या** गीतेतील प्रकट आश्वासन आहे:

*** श्रीबाबा हेच सामान्याचे गुरु :**

श्रीबाबा हेच तुमचे आमचे गुरु, त्यांच्या चरणी सर्वस्वसमर्पण करणे, त्यांच्या नामरुपात निमग्न होणे व मानवतावादी सेवामय कर्मे आचरणे हाच बाबा कथित धर्म आम्ही आचरला पाहिजे. नाथ पंथातील शिकवण व आदर्श हाच आहे. गुरुच्या मूर्तीचे ध्यान करावे, गुरुच्या पदाचे पूजन करावे, गुरुवाक्याचे चिंतन करायचे आणि गुरुकृपेद्वारे मोक्ष मिळवायचा हेच साईभक्तांचे साधन होय.

**ध्यान मूलं गुरोर्मूर्ति । पूजामूलं गुरो:पदम् ।।**
**पंचमूलं गुरोर्वाक्यं । मोक्षमूलं गुरु:कृपो ।।**

# साईबाबांची शिकवण म्हणजे दिव्य ज्ञान।

**कु. कुन्दन म. येर्जेकर** ए.एम्.
सावन्त चाळ, कायकिणी रोड,
कारवार.

आधुनिक काळात ज्यांना संतचूडामणि हे नामाभिधान देता येईल असे शिरडीचे श्री साईबाबा हेच होत. अशा हया संताची शिकवण अद्यापही प्रेरक अंशीच आहे. श्री साईबाबा सांगत की? संसारात कसे वागावे, तर वृक्ष जसा फळे आली की नमतो तसे, संपत्ती आली तरी गर्व न धरता नम्र व्हावे. गोरगरीबाशी प्रेमाने बोलावे. त्यांना तुच्छ लेखू नये. परमेश्वरावर नितांत श्रद्धा ठेवा. परमेश्वराची भक्ती श्रद्धेने करा आणि तुम्हाला त्याचे फळ चांगलेच मिळणार.

जीवन सुख दु:खाने भरलेले आहे. जीवनात येणाऱ्या वादळ वाऱ्याला दु:खाला टाकण्यासाठी, त्यावर एक उपाय म्हणजे ''भक्ती मार्ग''हा एकच मार्ग सोपा व सरळ आहे. दु:ख आले तर घाबरू नका. कमळ फुलाची निर्मिती चिखलातूनच केली आहे.

साईबाबांचे नाम स्मरण करण्यास ज्यांना ज्यांना सुसंधी मिळाली ते लोक भाग्यवान..... यात तर शंकाच नाही. सत्याचे, माणुसकीचे शांततेचे, समानतेचे अमृत अखिल जगाला पाहणारे श्री साईबाबा हे एक दैवत आहे.

**जरी हे शरीर गेलो मी टाकून ।।**
**तरी मी धावेन भक्तां साठी ।।**

श्री साईचे शरीर गेले, त्यांचा आत्मा विश्व चैतन्यात विलिन झाला, पण त्यांचे दिव्यत्व मागे पुढे राहिले. तेच दिव्यत्व तीच दैवी शक्ती आजही भक्तांच्या हाकेला धावून जात आहे. त्यांना आधार देत आहे, आणि साक्षात्कार घडवित आहे. आत्मा अमर आहे. हे त्यांनी सिद्ध करून दाखविले आहे. तेव्हा ते आता आपल्यात नाहीत असे कोणीही म्हणू शकणार नाही. सात समुद्राच्या बाहेर जरी असेल तरी ते अद्याप भक्तांच्या हाकेसाठी जागृत आहेत. असा हा महान शक्तीशाली तपस्वी आज सर्वां समोर सर्वांची संकटे उचलण्यास झोळी पसरून उभा आहे हे सर्वांना माहित आहे.

**साईबाबा पिता ।**
**साईबाबा माता ।**
**साईबाबा मोक्षदाता ।**

या वर्णनाला पात्र असलेले आपले सद्‌गुरु आपले परमदैवत म्हणजे श्री साईबाबा ज्यांचे नुसते नाव उच्चारले मूर्ती पाहिली की अंगावर रोमांच उठावेत. खरोखर आपले दैव थोर म्हणूनच बाबांसारखे रत्न आपल्याला भक्ती करण्यास लाभले. आपणाला त्यांच्या नुसत्या फोटो दर्शनाने इतका आनंद होतो, समाधान लाभते. तसेच शांती पण मिळते. मलाहि ह्याच क्षणी जावे असे वाटते पण साईबाबांकडे जायला जमत नाही. पण माझे मन विचलित होते. कधी एकदा शिरडी पाहिन म्हणून. माझा दयाधन गुरु श्री साईबाबा माझ्या हृदय मंदिरात केव्हाच विराजमान झालेला आहे. त्यांच्या छबीची मी मनोभावे पुजा करते. माझ्या घरीच माझी पुजा व नाम स्मरण मान्य होते आणि रोज मला आशिर्वाद मिळतो. श्री साईबाबाच्या वचनांची प्रचिती आली. श्रद्धा आणि सबुरी असल्यावर बाबा आपल्या पासून केव्हांही दूर नाहीत. साईबाबा असाच कृपाकटाक्ष सदैव तुमच्या सर्व लेकरावर ठेवा. हीच साई चरणी प्रार्थना. अशा माझ्या अनंतकोटी ब्रम्हांड नायक साईबाबांना शतश: प्रणाम.

# ''साई घरा आले''

श्री. गजानन कृष्ण निरखे
२० नंदलालपुरा इंदौर ४५२ ००४

सौभाग्यवतीची खूपच प्रबल इच्छा होती कि, इंदूरास सम्मेलनास आलेल्या साईभक्तांचे पाय, आपले घरास लागावे, आणि अल्पस्वल्प सेवा आपले हातून घडावी.

मी म्हटले, ''तुझी पुण्याई व माझे सेवा व्रत जर का साईंनी मान्य केले, तर साईबंधुच काय, प्रत्यक्ष साईबाबा सुद्धा आपले घरी येतील. काय वाटत तुला?'' मी ब्बाई काय सांगणार? मग मी म्हणते, बोलवाच त्या सर्व साईबंधू भगिनींना, आणि साई मंदीरात जाऊन त्या दयाळू साईबाबालाही आवाज द्या. प्रार्थना करा!'' हे तिचे उत्तर! अन् कायहो, सम्मेलनास डॉ. अण्णासाहेब दाभोलकर आलेत ना? मग त्यांनाही परिवारासह आमंत्रण द्यावे. कुणी सांगावे, त्यांनी लहानपणी साईबाबांस पाहिले, बोलले, त्या रूपाने तरी बाबा आपले घरी येतील!

साईबंधू भगिनींने आनंदाने येण्याचे कबूल केले तोच समोर दाभोलकरांच्या सूनबाई दिसल्या. भीत भीत त्यांनाही म्हटले, वहिनी, सम्मेलन संपले आता उद्या आपण मुंबईला परत जाणार. मग त्यापूर्वी हया सेवकाचे घरी ती. अण्णांचे आगमन व्हावे, त्यांचे पाय लागावे अशी आम्हा उभयतांची इच्छा आहे.

अहो बापू, अस कां म्हणता? तुम्ही आम्हाला घेण्यास स्वतः विमानतळावर आलात, आमची येथील सारी सोय केलीत मग आम्ही तुम्हाला कसे विसरणार? उद्या मुंबईला जाणेचे पूर्वी आम्ही तुमचे घरी येऊन पुढे मुंबईस जाऊ. धन्यवाद वहिनी! आम्ही वाट पाहू! जरूर यावे.

दुसरा दिवस, एका आनंदी वातावरणाने सुरु झाला. घरांत सर्वांची धावपळ, साईबंधू घरी येणार नव्हे, आमचे साईबाबाही....! सकाळचे अकरा वाजले व जिन्यावर पावले वाजली. ''साईनाथ महाराज की जय''हया जय घोषांत १०/१२ साई बंधू, भगिनी माडीत येते झाले. थोडी वाट बघितली आणखी कुणी येते का? डॉ. अण्णा येतात का?... :अस्तु येतील... भरवसा. भोजनोत्तर साईगुणगाण साई विचारांचे आदान प्रदान व साई भगिनी सौभाग्यवतीच्या कक्षेत घरगुती वातावरणात रमून गेल्या. पण मी ? माझे सारे ध्यान, लक्ष आत बाहेर जिन्याकडे काहीतरी धुंडत होते, पहात होते, एका बंधूने तर आवाज देऊन विचारले सुद्धा, बापू ? असे काही धूंडत आहांत का ? कुणाची वाट पहात आहां का ? कुणी आणखी येणार ?

तसं काही नाही ते आपले दाभोलकर सो. चे चिरंजीव विमानावर जाण्यापूर्वी येणार होते. पण आता तर साडे चार होत आले. विसरले बहुधा! जमले नसेल, अन् माझे साईबाबा ते पण.....!

आणि तुम्हाला सांगतो, दाराशी मोटार उभी राहिल्याचा आवाज, अन कोण उतरतय, दाभोलकर परिवार? हे काय? अन् वहिनी? एरोड्रोम वरून परत येत आहां का ? त्याचं काय झालं बापू, त्या बोलत्या झाल्या. बापू, आम्ही तुम्हांला न भेटता जाणार होतो ना? साईबाबा तुमचे कनवाळू. आम्हाला परत आणलं बघा! अहो विमान तळावर विमानच नाही आले. फ्लाईटच कँसल झाली. मी आमचे मिस्टरांना, हयाना म्हटले, बापूंची भेट टाळत होतो ना ? साईबाबा त्यांचे पाठीशी आहेत. आता तरी चला त्यांचे घरी भेटू या. त्यांना अन् बापू असे आम्ही तुमचे कडे आलोय नव्हे बाबांनी खेचून आणलयं! अण्णा म्हणाले, आज आपण बापूकडेच विश्रांति घेऊ. साईबाबांचीच तशी इच्छा दिसते. हा प्रकार पाहणारे सारेच साईबंधु भगिनी आश्चर्याने चकित झाले. अन् माझ्या, आमच्या घरांत एकदम चैतन्य आले. पुन्हा पाने मांडली गेली. अण्णांनी थोडा फार प्रसाद घेतला आणि त्याच माध्यमे जणू माझे घरांत "साईवास" झाला होता. सौभाग्यवतीच्या भाविक पुण्याईचा विजय झाला होता. माझ्या सेवा व्रताची अशा प्रकारे सांगता झाली होती. मन अधांतरी साईबाबांस धुंडण्यात समरस होऊन गेले होते. अशी ही भाविक हो. सत्यप्रतिज्ञ हकिगत माझा साईने माझेसाठी घडविले व श्रद्धा-सबुरीचे फळ चाखताना सहज उद्‌गार निघाले माझे "साई घरां आले".

# श्रीसाईबाबांची जीवनमूल्ये

**श्री. बा.ना. तळवाडकर**
रावळगांव ४२३१०८
जि. नासिक (महाराष्ट्र)

मौजे शिरडी ता. कोपरगाव जि. नगर हया गावाचा अमूलाग्र काया पालट श्रीसाईबाबांच्या वास्तव्यामुळे झाला. संतांच्या चरणधुलीचा हा प्रताप आहे. सर्व भारतातून सर्व धर्मांची व जातीची माणसं शिरडीला येतात. श्रीसाईबाबांचे पुण्यक्षेत्रात वाहतात. सारे मनस्ताप येथे घालवितात व नव्या मनाने आपापल्या गावी परत जातात. आतां काही सामयिक यात्रा अशा राहिल्याच नाहीत. वर्षभर रोज हया संतग्रामी अेक दिवाळी दसऱ्याचाच आनंद पाहायला मिळतो. श्रीसाईबाबांची जीवनमूल्यें इथे हया गावांत रुजलीत. त्या जीवन तत्वांच्या

सत्वलहरी येथील अवकाशात विलीन होऊन ही भूमी सगुणनिर्गुण रूपाने भारावून गेली आहे. त्या सूप्त तेजोलहरी अनेकांना येथे आकर्षून घेतात. चुंबकीय प्रेमलहरी श्रीसाईबाबांसारख्या चंदनाप्रमाणे झिजलेल्या थोर विभूतीच्या आसमंतातून निघतात आणि मानवी मनाला संमोहित करतात.

### तेजात्मसातीकरण

कडूनिबाच्या झाडाखाली गुरुस्थान आहे हे निश्चित करून श्रीसाईबाबांनी ज्ञानतेज आत्मसात केले. गुरुकृपेचे माधुर्य अेका फांदीच्या गोड पानांमुळे प्रकट झाले हे आश्चर्यच होय.

### उन्मार्गगामिनीचे मतपरिवर्तन

साईशिष्य काशीरामास एका कोल्हाटणीने रामोशांच्या तावडीतून वाचवून द्वारकामाअीत आणण्याचे सतकृत्य केले. तिचे मतपरिवर्तन करून तमाशातून अध्यात्मिक लावण्या १ दिवस शिरडीत ती म्हणू लागली. आपणासारिखे करिती तात्काळ नाही काळवेळ तया लागी! इतका अधिकार साअीबाबांना लाभलेला होता.

### मोलकरणीमुखातून उपनिषद

संतकवि दासगणूंना गर्व झाला होता. श्रीसाईबाबांनी काकासाहेब दीक्षित ह्यांचे कडील एका मोलकरणीच्या मुखांतून उपनिषदाचा संस्कृत भाग त्यांना स्पष्टपणे ऐकवून त्यांचा गर्व कमी केला. रेडयामुखी वेद बोलविणाऱ्या ज्ञानेशाची किमया त्यांनी साधली. राधाकृष्णमाअी नांवाची योगिनी साईबाबांच्या आंघोळीचे पाणी मशिदीच्या पायरीवर सांडायचे त्या पाण्यात ती गडबडा लोळायची. संताची बोधधुळी लागो हया देहकुळी ते असच असतं.

### मंगलदृष्टी !

दादा पंडीत नावाच्या एका भटाभिक्षुकाने श्रीसाईबाबांच्या कपाळी गंध लावला साईनाथ शांत बसले. भेदभाव वृत्ती जेथे नाही तेथे साई बाबांची दृष्टी मंगल दिसून येते. अमंगळ भेदाभेद दृष्टी त्यांनी टाकून वैष्णवी वृत्ती धारण केली होती हे सिद्ध होते.

### कटोरीत टाकले

पाथरी येथील एका यजुर्वेदीय ब्राम्हण दांपत्याकडे १ फकीर आले. त्यांनी शिधा वगैरे नको म्हणून सांगितले. फकिराच्या इच्छेप्रमाणे हया दांपत्याने फकिराच्या कटोरीत आपल्या ज्येष्ठ मुलाला भिक्षा म्हणून टाकले असे श्रीयाळ चांगुणे सारखे उदाहरण क्वचितच आढळते.

### बालक्रीडा

साईबाबा बालकांत खेळत हसत त्यांना पैसे देत. पाटया, फळे लहान मुलांना-वाटीत रहायचे. मांडीवर बालकांना घेत. मुलांमध्ये नाचत असत. सर्व धर्मीयांची मुले ते सारखीच मानीत. प्राणीमात्र समान आहेत. सर्वांना समानतेने वागवण्याचा 'कृण्वन्तो विश्वमार्यम!' हा श्रीकृष्ण संदेश त्यांनी स्वतःचे आचरणाने दाखवून दिला. गोदातटाक उद्धरला गेला.

### बायजाची ममता

एक साईसेवक तात्या नावाचा होता. त्याच्या आईचे नाव बायजा होते. ती रोज जंगलांत साईबाबांना कालवण भाकरी नेऊन द्यायची. तिने मुलाप्रमाणे त्यांना ममता दिली.

### लक्ष्मीचे ९ रुपये

बहिरोबाच्या बोकरेगांवी दाभाडे पाटील रहात. त्यांना १ मुलगी लक्ष्मी नावाची होती. तिचा विवाह शिरडीच्या तुकाराम शिद्यांशी झाला. तिला साई बाबांनी बंदे ९ रुपये अहेर दिला. लक्ष्मीचे घर व ९ रुपये नवविधाभक्तीचे प्रतीकच आहे.

### रामजन्मोत्सवारंभ

श्रीसाईबाबांनी शिरडीत रामजन्मोत्सव सुरु केला. रामजन्मोत्सवात भगिनी रामाचे पाळणे म्हणू लागल्या. "रामरहीमको अेक मानो" ह्याप्रमाणे शिरडीत मशिदीचा उरूस संदल तसा मंदिरात कीर्तन भजन अशा उपक्रमांनी हिंदुमुस्लीमांचे दोघांचे श्रद्धास्थान शिरडी होअू लागले. अशा काही जीवनमूल्यांना अर्थही आहेच.

### कुत्र्यांना भाकरी! आणखी बरेचसे!

श्रीसाईबाबा कुत्र्यांना भाकरी खाअू घालीत. आंधळ्या पांगळ्यांना जेवण घालीत. गोडभात, पुलाव, कणकेचे पाणगे, गुळपीठाचे मुटकळे दगडविटांच्या चुलीवर मोठा हंडा ठेवून शिजवीत व गोरगरीबांना दुपारी वाटत असत. अनेक रोग्यांना औषधे देत. अनेकांना आशिर्वाद देअून संततीचा लाभ दिला. अनेकांच्या भूतबाधा घालविल्यात. कॉलरासाथ नदीत पीठ टाकून बंद करण्याचा चमत्कार केला. कीर्तनकारांना आश्रय देत. लावण्यावाल्यांना बिदागी देत. खूप जोराची पर्जन्यवृष्टी व वादळ शिरडीत झाले असता 'बंद कर वादळ पाऊस' असे म्हणून बाबांनी लोकांना चकीत केले. आळशांना उद्योगास लावले. ५ घरी भिक्षा मागून खायचे धुनीपुढे चिलीम ओढीत बसायचे. पट्का, कफनी, घाटी पोषाख तर मातीची

भांडी जेवायला. म्हाळसापती सोनाराने साईबाबांची आमरण सेवा केली. काशीराम शिंपी हा निस्सीम भक्त होता. १ चिलीम, १ सुई, १ दोराभेंडोळे, १ टमरेल, १ माठ, १ परळ, १ जाते, १ उखळ व १ चूल अशा ९ वस्तुंचा त्यांचा फकिरी प्रपंच १ जुन्या पडक्या मशिदीच्या भिंतीजवळ उभा राहिला. त्या शिरडीत आज नवखंड पृथ्वीचे सारे वैभव लोळण घेत आहे. मशिदीचे नाव द्वारका! कृष्णाची झाली आहे वैभवशाली अशी लखलखीत चकचकीत! ९४ वर्षाचे मार्तंड राव नागरे (म्हाळसापती सोनाराचे सुपुत्र) ही सर्व स्थित्यंतरे पाहून चकीत झालेत. किंबहुना सारे जगच चकीत होत आहे. उपासनीबाबांनी 'श्रीसाईबाबा महिम्नस्तोत्रात साईबाबांचा गुरुमहिमा भावपूर्ण रीतीने लिहिला आहे. साकुरीला दत्तमंदिर आहे. साकुरीत शिष्य शिरडीत गुरु अशी २ महान संतांची ही शिरडी साकुरी गांवे फळीवर झोपणाऱ्यांची पणतीच्या उजेडात राहणाऱ्याची, मलीन चिंध्या वापरणाऱ्यांची, उदीवाटणाऱ्यांची स्वर्गीय वैकुंठनगरी व लक्ष्मीचे मंदिर झालेली आहेत. अशी श्रीसाईबाबांची जीवनमूल्ये लोखंडाचं सोनं करणाऱ्या परीसाच्या मोलाची आहेत.

**झिजल्यावाचुनी कीर्ती कैसी । मान्यता नव्हे फुकाची । श्रीसाईसमर्थ ।।**

# 'ऐहिक सुखे देणारा एकमेव संत'

**कु. शुभांगी मधुकर वखारे**
४४, जाधव कॉलनी वखारेवाडी,
बेलवली, कुळगाव स्टे. बदलापूर.

माझ्या लहानपणा पासूनच मला परमपूज्य श्रीसाईबाबांच्या भक्तीचा छंद लागला. वडील साईभक्त असल्यामुळे त्यांनी शिरडीहून साईबाबांचे एक मोठे छायचित्र आणून त्यास सुंदर फ्रेम करून देवघरात सुशोभित करून पूजेसाठी ठेवले आहे. एरवी मी पूजाअर्चा करीत नसे. परंतु साईबाबांचे छायाचित्र घरात लावल्यापासून त्यास दररोज पुष्पे, हार घालणे, गोपीचंदनाचा टिळा लावणे,

उदबत्ती लावणे व संध्याकाळी न विसरता दीपारती करणे हा माझ्या आवडीचा आपोआपच छंद झाला. त्यामुळे सर्व दिवस अगदी प्रसन्न वाटते. काय गंमत असेल ती असो पण परमपूज्य बाबांनी मला स्वप्नात दोन वेळा दर्शन दिले. माझ्या मस्तकावरून हात फिरवून तुझे कल्याण होईल असा शुभाशीर्वाद दिला. वार्षिक परीक्षा झाल्यानंतर एकदा मी अशीच विमनस्क व निराश होऊन परीक्षेतील यशापयशाबद्दल विचार करीत होते. परीक्षेचे पेपर विशेषत: गणिताचा पेपर कठीण गेला असल्यामुळे मी काळजीत होते. आणि नापास होईन की काय अशी विवंचना करीत असे. भाविकतेने बाबांना आळवित होते की बाबा मला परीक्षेत पास होऊ दे मी अधिक श्रद्धेने, निष्ठेने आपली पूजाअर्चा करीन, आणि आश्चर्य म्हणजे त्या रात्रीच स्वप्नात येऊन बाबा मला म्हणाले, "बेटा तू घाबरू नकोस". सकाळी उठल्यानंतर मी आईवडीलांना माझे स्वप्न सांगितले. त्यांना खूप आनंद झाला. त्या महान कनवाळू भक्तांच्या सदैव पाठीशी असणाऱ्या प. पू. बाबांनी मला अभय दिले. तो आनंद मी शब्दात वर्णन करू शकत नाही. वडील म्हणाले, तू दररोज बाबांची पूजाअर्चा करतेस त्याचा हा प्रसाद बाबांनी तुला दिला. अशीच तू अधिक श्रद्धेने, निष्ठेने पूजा, भक्ती कर बाबा सदैव तुझ्या पाठीशी असतील या बद्दल खात्री ठेव. थोडया दिवसांनी परीक्षेचा निकाल लागला आणि मी उत्तीर्ण झालेले पाहून मनोभावे बाबांच्या तसबिरीपुढे उभे राहिले. डोळ्यात आनंदाश्रू, मनात दृढभक्तिने बाबांना वंदन केले. बाबांनीच ही किमया केली. हा अनुभव मी कधीही विसरू शकत नाही. बाबांनी अभय दिल्यानंतर मी जोरात अभ्यासाला सुरवात केली. गणिताचा क्लास सुरु केला, व या वर्षी मी वर्गात तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. याचे श्रेय मी बाबांना देऊन अधिक श्रद्धेने त्यांची भक्ति करते. मी स्वार्थासाठी हे करते अशी कुणी समजूत करून घेईल. पण मनुष्यप्राणी हा मूळातच स्वार्थी आहे. चांगले झाल्यास मी केले व वाईट झाले तर ते प्रारब्धावर ढकलून देण्याची माणसाची प्रवृत्ती असते. परंतु साईबाबांची शिकवणच आपण विसरतो.

कोणतीही गोष्ट निस्वार्थ बुद्धीने, तळमळीने, श्रद्धेने केल्यास यश हमखास मिळतेच. हे शाश्वत सत्य आहे. यंदा कदाचित मला अभ्यासात अपयश आलेच तर त्याबद्दल मी स्वत: जबाबदार असेन. ती माझीच चूक असेल. व त्यामुळे पूज्य बाबांवरील माझी श्रद्धा तिळमात्रही कमी होणार नाही. बाबांच्या भक्तीमुळे एक वेगळेच सुख, मानसिक समाधान मिळते. त्याचे वर्णन शब्दातीत आहे. असा अनुभव भक्ताला वारंवार येतो. त्याचे आकलन होणे न होणे त्या त्या भक्तांच्या श्रद्धेवर अवलंबून असेल. खरे भाग्यवान भक्त तेच की जे अविरतपणे, सश्रद्धतेने नि:स्वार्थ बुद्धीने आपल्या दैवताची भक्ती करतात. परमपूज्य साईबाबांच्या भक्तीमुळे भक्ताचे कल्याणच होईल. वाईट कधीही होणार नाही हे बाबांनी सांगितले आहे, व त्याची प्रचिती अनेक भक्तांना आपल्या दैनंदिन जीवनात येत असते. हेच श्रद्धेचे फळ आहे. म्हणूनच बाबांनी सांगितले आहे की, जो जो मज भजे

जैशा जैशा भावे । तैसा तैसा पावे मी ही त्यासी ।। एका साक्षात्कारी, देवतुल्य महान संताचे हे वचन आहे. ते कदापि असत्य नाही. या वचनावर ज्याची ठाम निष्ठा आहे, त्यालाच या वचनाची प्रचिति येईल व सदैव येत राहिल.

परमपूज्य बाबांनी आपल्या निष्ठावंत भक्तांना ऐहिक सुखा बरोबरच आध्यात्मिक उन्नतीचे दान भरभरून दिले आहे. भक्तांच्या ऐहिक सुखाचे लाड पुरविणारा एकमेव संत म्हणजे परमपूज्य साईबाबा. आपण कोणत्याही शहरात, गावात, खेडयात जा. तेथे 'साईप्रसाद', 'साईनिकेतन', 'साईकृपा', 'साईधाम', 'साईनिवास'या नावाची निवासस्थाने हमखास आढळतील. हे कशाचे द्योतक आहे कोटयावधी साईभक्त या पृथ्वीतलावर सर्वत्र विखुरले आहेत. कारण त्यांना या साक्षात्कारी संताची प्रचिती आली आहे. साईबाबांनी त्यांच्या मनोकामना पूर्ण केल्या आहेत. या व्यवहारी जगात स्वार्थी मनुष्य चमत्काराशिवाय नमस्कार करीत नाही. आपल्या पदरी काही देणगी, प्रसाद पडल्याशिवाय देवापुढे मान वाकवित नाही. हे साईबाबांनी चांगले ओळखले होते. म्हणून बाबांनी या स्वार्थी मानवाला कुठल्या ना कुठल्या स्वरूपात चमत्कार दाखवले, व त्यास भक्तीमार्गास लावले. दगडाला श्रद्धेने शेंदूर फासला की देवत्व येते तसाच प्रकार बाबांनी आपल्या भक्तांच्या बाबतीत केला. कुठेतरी माणसाने श्रद्धा ठेवायला हवी. तुमचे आराध्य दैवत कोणतेही असो. परंतु मनोभावे तुम्ही त्या दैवताला शरण जा. त्याचे चिंतन करा. अडलेल्या नडलेल्यांना मदतीचा हात पुढे करा. गरीबांची टिंगल करू नका. तुम्हाला भिकाऱ्यास काही देता येत नसेल तर देऊ नका पण त्याची अवहेलना, उपहास करू नका ही माणुसकीची शिकवण बाबांनी दिली. माणसांना खऱ्या अर्थाने माणसात आणले. आधी केले मग सांगितले ही विचारसरणी बाबांनी स्वत: अंगिकारली व आपल्या शिष्यांना सूचकतेने अंगिकारायला लावली. धन्य ते संतश्रेष्ठ साईबाबा! या महा संतापुढे कुणीही आदराने नतमस्तक व्हावे. माणुसकी, भूतदया, प्रेम, आपुलकी, व्यथितांबद्दल सहानुभूति, गरिबाविषयी कणव हाच खरा धर्म आहे आणि हे आचरण करणाराच परमेश्वराप्रत पोहोचू शकतो हे बाबांनी भक्तांना सांगितले. प. पू. बाबांची ही महान तत्त्वे सर्व धर्मातील लोकांना मान्य आहेत. म्हणूनच, साईबाबा सर्व धर्माच्या लोकांना वंदनिय, प्रिय आहेत. सर्व धर्मियांचे दैवत ते आहेत हा एक चमत्कार नाही काय? शतकानुशतके असा चमत्कार घडला नाही व यापुढे घडेलसे वाटत नाही. ही किमया फक्त साईबाबांनी केली. म्हणून ते संतांमध्ये श्रेष्ठत्वाच्या उच्चपदावर विराजमान झाले आहेत. सर्वसाक्षी परमेश्वररूप आहेत. माझे सर्व मानवजातीस नम्र आवाहन आहे की या अनंतकोटी ब्रम्हांड नायक राजाधिराज योगिराज परब्रम्ह सच्चिदानंद सद्गुरु साईबाबांचे अन्तकरणपूर्वक स्मरण करा व आपली जीवननौका सुखरूपपणे आनंदाने पैलतिरी न्या. संकटकाली परमपूज्य बाबा पाठीशी असतील याची खात्री बाळगा.

# श्रीसाईबाबांचे गुरुबंधू प्रेम

**श्री. दत्ताराम पुंजाजी धुगे**
विशेष कार्यकारी दंडाधिकारी
३/३७ रमेशचंद्र चिमणलाल चाळ
ताडदेव मुंबई ४०० ०३४.

श्रीदत्तदिगंबराच्या कर्नाटक मधील गाणगापूर उगमस्थानाकडून निघालेले जनसेवेसाठी योगपुरुष गजानन महाराज शेगावला गेले. त्यांनी आपले बसण्याचे ठिकाण वडाचा वृक्ष शोधला तर कोपरगाव तालुक्यात शिरडी या खेडेगावी फकिरी रुपात साईबाबांनी लिंबाच्या वृक्षाखाली आपल्या गुरुंचे चिंतन केले तर अक्कलकोट गावी अक्कलकोट स्वामीजी उकिरडयावर राहिले. अशा या विष्णुदेवतेच्या अवतारी पुरुषांनी आपापल्या शक्तीच्या सामर्थ्यावर मनोभावे सेवा केली. अर्थातच त्यांच्या भाविकांची मनोभावे सेवा केली. अर्थातच त्यांच्या भक्तांचा जणू जनसागरच होता. या तीन सत्वपुरुषांचे गुरु म्हणून श्रीपाद वल्लभ दत्तदिगंबर आहेत. शेगावचे गजानन महाराज आपल्या भक्ताला "जा देव तुझे भले करो" असे सांगून आपली उदी देत. तर अक्कलकोट स्वामी सुद्धा ईश्वर तुझे भले करो असे सांगून उदी देऊन आशिर्वाद देत. त्याप्रमाणे शिरडीचे सद्‌गुरु साईबाबा आपल्या भाविकांना धुनीतील उदी देऊन "अल्ला मालीक भला करेगा" हे सांगत असे हे तीन गुरुबंधू कधी एकत्र आले याबाबत कुणालाच कल्पना नाही परंतु त्यांची बंधूत्वतेची मने एकरुप झाल्यासारखी मला वाटतात. कारण शेगाव अक्कलकोट वरून शिरडीला येण्याऱ्या भक्तांना बाबा नेहमी म्हणत. तुम्ही माझ्याकडे कशाला आलात तुमच्याकडे माझे गुरुबंधु सेवेसाठी आहेत तर तुम्ही त्यांच्याकडेच जा. काहीवेळेला तर साईबाबा शेगाववरून अथवा अक्कलकोट वरून येणाऱ्या भक्ताकडे आपल्या बंधुच्या प्रकृतीबाबत गप्पागोष्टी करीत असत.

या तीन सत्वपुरुषांनी कधीही आपल्या भक्तांना गुरु म्हणून मानू दिले नाही. किंवा या भावनेने त्यांच्याकडे पाहिले सुद्धा नाही. साईबाबा तर भक्तांना सांगत "मैं अल्ला मालीक का बंदा गुलाम हूँ। आपल्या सेवेसाठी आलेला हा परमेश्वराचा सेवक आहे. हे भक्तांना माहिती करून जनसेवा ही परमेश्वराची सेवा हे पटवून श्रद्धा आणि सबुरीची शिकवण दिली. साईबाबा हे दुर्बलांचे रक्षक, अंध अपंगांचे आधार, गोरगरिबांचे वाली होते. बाबांनी कित्येक रोग्यांचे मोठमोठे आजार दूर केले. काहीवेळेला तर त्यांनी प्लेगसारखा आजार आपल्या भक्ताला बरे करण्यासाठी स्वत: वर घेतला. बाबांनी आपले आयुष्य लोकांसाठी चंदनासारखे झिजवले.

स
आपल
आबा
आपल

त
अर्था
खड्डा
आप
गुरुभ
आप

आप
दिले

सद्
सम
ओर
द्वा
म
मंग
त्य
मा
जा
अ
आ
धू
सु
शि
अ

अ
गु

# काशी ते शिरडी पायी यात्रा

सौ. मीरा संजयानंद
बद्रीनाथ हिमालय

आम्ही बनारसला असताना श्री साईबाबांनी आम्हांला काशी ते शिरडी तुम्ही पायी यात्रा करा ही आज्ञा दिली, व सोबत तीन अटी पाळायला सांगितल्या. हया घोर कलियुगात पैशावाचून सर्वांचे अडते. तिथे आम्हांला श्री बाबांनी पैशाला स्पर्श करायचा नाही अशी पहिली अट सांगितली. दुसरी अट ''कुणाकडे मागायचे नाही. तिसरी अट हॉटेलांत खायचे नाही. अशा त्या अटी पाळीत आम्ही छिंदवाडा (मध्यप्रदेश) येथे आलो. आता या छिंदवाडा शहरात आमची कोणाशी ओळख नाही कि परिचय नाही. मंदिर कुठे आहे, ते पण माहीत नाही. किंवा कोणीच सांगेना शोध करता करता एक सत्यसाई बाबांचा भक्त भेटला. त्याने आम्हांला एका शिरडीसाईबाबांच्या भक्ताच्या घरी नेले. त्या ठिकाणी शिरडी साईबाबांचा दरबार भरला होता. हॉल चांगला मोठा होता. समोर श्री साईबाबांची लहान मूर्ती व एक खूप मोठा फोटो होता. आजूबाजूला, सत्यसाईबाबा, ताजुद्दीनबाबा, दादाजी धुनीवाले (खांडवा) आणि इतर मोठे संत त्यांचे मोठमोठे फोटो लावले होते. एका ठिकानी धूनी कुंड होते. प्रवेश दारापासून धूनि कुंडापर्यंत मधला रस्ता मोकळा होता. रस्त्याच्या एका बाजुला स्त्रिया, दुसऱ्या बाजुला पुरुष बसले होते. धूनि कुंडाच्या समोर तीन पुरुष व स्त्री बसली होती. त्यांनी सर्वांनी श्रीबाबांच्या सारखी डोक्याला कफनी बांधली होती. त्यांच्या पुढे कॅरम बोर्डासारखा तक बोर्ड होता. व त्याच्या चारी बाजुला ए, बी, सी, डी, ची २६ अक्षरे लिहीली होती. मध्ये बदामाच्या आकाराची एक लहान तबकडी होती. त्याला ते लोक ''प्लॅन्चेट'' म्हणत होते. आम्ही प्रवेश दारा जवळच बसलो होतो व हा सर्व तमाशा पहात होतो. तेव्हढयांत आमच्या नावाचा पुकारा झाला. ''काशीसे शिरडी पैदल जाने वाले सामने आओ. श्रीसाईबाबा बुला रहे हैं।'' आणि आमची नांवे घेऊन आम्हांला पुढे बोलविले. आम्ही पुढे जाऊन धुनिकुंडा शेजारी बसलो. पुरुष व्यक्ति नाव डॉ. शामता प्रसाद वर्मा, डॉ. मिश्रा, तिसरी व्यक्ती ही मुसलमान असून तिचे नाव मज्जिद चाचा होते व ते छिंदवाडयाचे तहसिलदार होते. ते एक हिंदु धर्माचे प्रवचनकार होते. रामनवमी किंवा दसऱ्याला त्यांचे रामायण, गीता या विषयांवर सुंदर प्रवचन व्हायचे. हिंदू प्रवचनकार देखिल त्यांच्या पुढे फिका पडायचा. आम्ही हा सर्व तमाशा पहात होतो. इतक्यात त्या प्लँचेटवरची ती प्लेट हलू लागली व पुढे पुढे सरकू लागली व थोडया वेळांत आम्हाला सांगण्यात आले की, ''बाबा म्हणतात तुम्ही काही दिवस येथे थांबा.'' व डॉ. वर्माकडे तुमची रहायची व्यवस्था केली आहे. डॉ. वर्माने आम्हांला आपल्या पांढऱ्या सफेद अँम्बेसडर मधून घरी नेले. तो फार मोठा बंगला होता. एक मोठा भजन हॉल सजविलेला होता. आम्ही डॉ. कडे

राहिलो. त्या काळातील हा अनुभव आहे. ज्या मज्जिदचाचांवर उल्लेख आला आहे. त्यांच्या घरचा हा अनुभव आहे.

महिना भरचे रोजे चालू होते. ईद जवळ येऊ लागली. तसे मज्जिद चाचा आम्हाला म्हणाले की, ''ईदच्या दिवशी माझ्या घरी साईबाबांचे भजन करा. आम्ही सर्वांना विचारले तर कोणी साईभक्त हो म्हणेना. कारण मज्जिद चाचांचे घर मुसलमान मोहल्लात भर वस्तीत होते. चारी बाजुला फक्त मुसलमानच रहात होते. मुख्य रस्त्याला जोडून लहान गल्लीत त्यांचे घर होते. म्हणून कोणी हिंदू तयार होईना. मज्जिद चाचाने हट्ट धरला कि ''ईदचे भजन आमच्याच घरी होईल''. साई भक्तांमध्ये सर्व व्यक्ति प्रतिष्ठित होत्या. १) डि.पी. सिन्हा, जिल्हा शिक्षणाधिकारी, २) डॉ. वर्मा ३) डॉ. मिश्रा, ४) रेल्वे टि. टि. ई. सक्सेना. छिद्दन बाबू आणि इतरहि सर्व मंडळी मागे पुढे करू लागली.

शेवटी हो नाही करता भजन ठरले. ईद आली, आम्ही सर्व मंडळी संध्याकाळी सात वाजता मज्जिद चाचांच्या घरी गेलो. इतर सर्व मंडळी नेहमी जाणारी येणारी असल्याने त्यांचे काही महत्व व आश्चर्य मुसलमानांना नव्हते. परंतु आम्हा दोघांना हिंदु साधू वेषांत मज्जिद चाचाकडे गेलेले पाहिल्यावर मुसलमान लोकांत कुजबुज सुरु झाली. आम्ही मज्जिद चाचांच्या पुजेच्या खोलीत गेलो. आणि काय बघतो कि ''त्यांच्या पूजा गृहांत सिंह वाहिनी जगदंबेची ३ फूट उंचीची मूर्ति होती व हिंदू सर्व देवता विराजमान होत्या. खाली एका मोठ्या चौरंगावर रामायण, गीता व कुराण शरीफ ठेवले होते.'' धूप उदबत्ती, लोभान जळत होते. तेव्हा मज्जिद चाचा आम्हाला म्हणाले कि ''हे माझे पुजागृह आहे. मी माझा रिकामा वेळ येथे बसून काढतो. जगदंबे मातेचा मला साक्षात्कार पण झाला आहे. तेव्हा तुम्ही आता येथे भजन करा.'' आम्ही सर्व मंडळी बसलो. हार्मोनियम ढोलक सर्व सामान आले. लाऊडस्पिकर, माईक वगैरे लावून झाले. आम्ही साईबाबांची भजने, कव्वाली म्हणायला सुरुवात केली. लाऊडस्पिकरवर आवाज अैकून मुसलमान लोक हळूहळू मज्जिद चाचांच्या घरा जवळ बाहेर उभे राहीले. घरात यावयाची त्यांची हिंमत नव्हती. कारण मज्जिद चाचा तहसिलदार होते. आम्ही रात्री दहा वाजता शेजारती करून भजन संपविले. बाहेर जोराचा गोंगाट चालू होता. मुसलमान लोक ओरडत होते. आमच्या नांवाने ते आम्हांला बोलवित होते. तेव्हढयात एका मुलाने आम्हांला सांगितले कि ''बाहेर मुसलमान लोक काठया घेऊन तुम्हांला मारण्यासाठी गोळा झाले आहेत.'' तुम्ही ईदच्या दिवशी हिंदू भजन त्यांच्या गल्लीत केले म्हणून ते तुमच्यावर चिडले आहेत. हे अैकून क्षणभर आमचे धाबे दणाणले व इतर भजन मंडळी खूप घाबरली व आम्हाला डॉ. वर्मा म्हणाले कि ''स्वामीजी आप तो अब पिटे जाओगे। लेकिन हमारीभी हड्डी पसली नहीं बचेंगी। इसिलिये घर चलनेके लिये पहले आप दरवाजेके बाहर निकलो. फिर हम

सब आपके पिछे निकलेंगे।"

मी त्यांना सांगितले कि भजन मज्जिद चाचाने रखा था। पहले उन्हें बाहर भेजो मैं बाहर निकला तो डंडे पहले मुझपर ही बरसेंगे। पहला डंडा मज्जिद चाचा पर ही बरसने दो। भजन उन्होंने रखा था। हमने तो मना किया था।

आता बाहेरचे दृष्य बघून मज्जिद चाचा पण हबकले होते. त्यांच्या कल्पनेबाहेर मुसलमान लोक चिडले होते. आम्ही पण मनातुन घाबरलो. काय करावे ? कसे यांच्या तावडीतून कसे सुटावे यांचा विचार करू लागलो. शेवटी पुन्हा एकदा मंदिरात जाऊन बाबांची प्रार्थना केली, व उदी कपाळाला लावून बाहेर आलो.

इकडे आमच्या मोटारीचा ड्राईव्हर हा मुख्य रस्त्यावर मोटारीतच बसला होता. त्याने हा सर्व प्रकार ओळखला व मोटारीचे दार उघडून मोटारीत बसायची तो वाट पहात होता. आम्ही दरवाज्यांत आलो. बाहेर चिक्कार गर्दी होती. त्यांच्या हातांत काठ्या होत्या. त्यांना ओलांडून जाणे शक्य नव्हते. दुसरे दार पण नव्हते. आम्ही साईराम म्हटले व दोघे जण पायऱ्या उतरून मुसलमान लोकांच्या गर्दीतून जाऊ लागलो. त्यांनी आम्हाला वाट दिली. आम्ही रस्त्यावर येऊन पटकन गाडीत बसलो, व गाडी रस्त्यावरून भरधांव सुटली. आम्ही घरी पोहोंचलो आमच्या मागे सर्व मंडळी पण आपापल्या गाडीत निघून गेली.

पुष्कळ वेळ झाला आम्ही बाहेर येत नाही असे पाहून मुसलमान लोकांनी मज्जिद चाचाला बाहेर बोलाविले व आमच्या विषयी विचारून सांगितले कि "उन दोनों को बाहर भेज दो. हम उनको छोडेंगे नहीं. तेव्हा मज्जिद चाचा त्यांना म्हणाले कि "वो दोनों अपने घर पहुँच गये है। उनको फोन भी आ गया है।" त्यावर मुसलमानांनी विश्वास ठेवला नाही. ते म्हणाले बाहर जाने का एक ही रास्ता है। जायेंगे तो किस रास्तेसे? क्या आसमानसे उडकर गये? मज्जिद चाचा म्हणाले कि आप लोगोंनेही तो उन्हें रास्ता दिया था । क्या आपको वे दोनो दिखाई नहीं दिये? त्या लोकांना विश्वास बसला नाही. ते म्हणाले, "उन्हें घरमें छुपा दिया है। मज्जिद चाचा त्यांना म्हणाले कि आप मेरा घर बडे शौकसे देख सकते हैं।

आणि मुसलमानांनी त्यांचे ३ मंजिल घर शोधले. परंतु आम्ही त्यांना मिळालो नाही. ते फार निराश झाले. तेव्हा मज्जिद चाचा त्यांना म्हणाले कि अल्ला के बंदो का रक्षक अल्लाही होता है। आप उनको बुरी नियतसे मारने पर तुले थे। अल्लाकी मेहरबानी से वह घर पहुँच गये। और आप अपने बुरे कारनामों में कामयाब नहीं हुअे। इतके अैकून ते मुसलमान खाली माना घालून आपापल्या घरी निघून गेले. व ही गोष्ट आम्हाला मज्जिद चाचांनी दुसऱ्या दिवशी सांगितली. ही गुरु कृपा आहे हे फक्त जाणणारा पाहिजे.

# बाबांनी जीवदान दिले

श्री. किरणकुमार मनोहर नाईक
बंगला नं. २२ जेधेनगर
बिबवेवाडी पुणे ४११ ०३७.

हा लेख लिहिण्यापूर्वी माझे सद्‌गुरुराय बाबा याचे चरणी विनम्र नमस्कार.

ज्या संकटातून बाबांनी मला वाचविले त्याबाबत पुढे लिहितो. परंतु तत्पूर्वी थोडेसे बाबांविषयी लिहीत आहे. खंडोबाच्या देवळापाशी चांदभाईच्या भाच्याच्या लग्नाच्या वरातीबरोबर बाबा शिरडीस आले. म्हाळसापतींनी त्यांना पाहिल्या बरोबर ''आवो साईबाबा''या शब्दांनी स्वागत केले. त्याचवेळी शिरडीचे व पर्यायाने भारताचे भाग्य उदयास आले. कारण पृथ्वीतलावर अशा प्रकारचे दैवत सापडणे विरळेच बाबांनी त्यांचे हयातीत कित्येक भक्तांची संकटे दूर करून कल्याण केले व आज सुद्धा देहधारी नसताना भक्तांच्या हाकेला ते त्वरीत धावून येतात. सर्व धर्मात दैवते प्रसन्न होण्यासाठी जाचक स्वरूपाची बंधने पाळली जातात. कडक उपास, वेळ प्रसंगी मुक्याप्राण्यांचे बलीदान, ठराविक पद्धतीचीच पूजा अर्चा, विशिष्ट प्रकारचेच नैवेद्य असे अनेक प्रकार करावे लागतात. परंतु साईमहाराजांना कोणत्याच प्रकारचे उपासतापास अथवा कसलेच बंधन आवश्यक नसते. साईमहाराजांना आवश्यक असते फक्त ''श्रद्धा.'' महाराजांकडे श्रद्धेने येणाऱ्या सर्वच भक्तांचे अति उच्च प्रतीचे हीत झाले आहे. महाराजांचा अवतार लोकांच्या उद्धारासाठी होता.

तेव्हा वाचकहो शिरडीस बाबांचे दर्शासाठी जाताना आपल्या मनोकामना अथवा संकटे बाबांपुढे विशद करता संपूर्णपणे त्यांना शरण जाऊन ''सद्‌गुरु'' म्हणून संबोधून संपूर्णपणे श्रद्धा टाका.

बाबांची समाधी व बाबांनी हयातीत पेटवून ठेवलेली धुनीमाई आज पृथ्वीतलावर सर्वश्रेष्ठ आहे. धुनीमाईतील ''उदी'' सर्व प्राणीमात्रांना संजीवनीच आहे. वर्षापूर्वी मी मुंबईस माझे बहीणीचे लग्नानिमीत्त गेलो असता काही कारणाने ग्रँटरोड ते बांद्रे दरम्यान लोकलने प्रवास करावा लागला. ग्रँटरोड येथे लोकलमध्ये चढल्यावर गाडी सुरु होताच भान हरपून मला अस्वस्थ वाटू लागले. सुरवातीस थोडेसे अस्वस्थ वाटल्यावर अस्वस्थतेचे प्रमाण फारच वाटू लागले. क्षणातच मला काहीतरी होऊन जागीच बेशुद्ध पडेन असे मला वाटू लागले. गाडी ''महालक्ष्मी'' स्टेशनवर आल्यावर कसाबसा धीर करून मी उतरलो व स्टेशनच्या बाहेर येताक्षणीच दारातच टॅक्सी उभी होती त्या टॅक्सीत बसून टॅक्सी ड्रायव्हरला टॅक्सीचा वेग जोरात घेण्यास सांगितले कारण बांद्रे येथे जाण्यास फारच वेळ लागणार होता. टॅक्सीत सारखा बाबांचा धावा करीत होतो व या संकटातून

सहीसलामत बाहेर पडण्यास विनवित होतो. बहीणीचे घरी आल्यावर थोडासा आराम केला व काही क्षणातच पूर्ववत मला बरे वाटले.

केवढी ही बाबांची अगाध लीला.

●

# साईनाथास

माथ्यावरती ओझे दिलेस
पाऊले जड झालीत रे ।।
गात्रे गात्रे विकल जाहली
नेत्र लागले पैलतीरी रे ।।
पाहुण्यापरी जगात आले
आपुल्या घरी कधी जाणे रे ।।
जाणे येणे तूची जाणे
आपण रंगभूमीचे बाहुले रे ।।
कर्तव्याचे ओझे घेवून
इथे तिथे मी फिरते रे ।।
आयुष्याला नसेच दोरी
पतंगापरी भिरभिरते रे ।।
गर गर गर चक्र काळाचे
आपणा भोवती वेढले रे ।।
काळ चालता पुढे पुढे अन्
आपण आपणातच गुंतलो रे ।।
सोडवू जाता गुंता गुंत
अधिकच पक्क्या गाठी होती रे ।।
मी पणाची पांघरून शाल
अभिमानाचे कोंब फुलले रे ।।
कोश फोडूनी जो बाहेर येतो
तोची एकात्मा मुक्तची रे ।।
होता मुक्त रहातो फकत
साईनाथ आपुल्या जवळी रे ।।

**सौ. नीता उल्हास जाधव**
६२९, सरेकर आळी
महाड, रायगड

# शाम्याच्याही अगोदर

**श्री. अनिल पंडित**
३६ नंदनवन कॉलनी,
माणिक बाग रोड,
इन्दौर (म. प्र.)

"शाम्याच्या ही अगोदर येतो" हया वाक्याची प्रचिती मला माझ्या रोजच्या जीवनात येत असते. माझी फिरतीची नोकरी असते, ज्या बस मध्ये मी प्रवास करीत असतो, त्या बसमध्ये श्री साईनाथांचा फोटो लावलेला असतो. कधी-कधी एस.टी. मध्ये जागा न मिळाल्यानें किंवा काही कारणाने एस.टी. निघून गेल्याने इतर गावी कंपनीच्या कामासाठी ट्रकने पण जावे लागत असे. त्या ट्रक मध्ये पण बाबांचा आशिर्वादाचा स्टीकर लागलेला असतो, व त्यावर "अल्ला सबका मालिक है" असे लिहिलेले दिसल्यावर कंठ दाटून येतो.

बऱ्याच वेळा मेटाडोरने पण प्रवास करावा लागतो त्यांत ड्राइव्हरच्या समोरच्या बाजूला बाबांची सुंदरशी मूर्ती ठेवलेली दिसते. तेव्हा डोळयातून अश्रु येण्यास वेळ लागत नाही.

कित्येक वेळा अनोळखी व्यक्तिशी बोलतांना त्याच्या हाताच्या बोटामध्ये बाबांची आंगठी पाहण्यास मिळते तर कधी-कधी जवळच्या मित्राच्या गळ्यात बाबांचे पांढरे चकचकित लॉकेट दिसते, तेव्हा अंतरभाव दाटून न आल्यास आश्चर्यच.

कंपनीच्या कामानिमित्य डॉक्टरच्या क्लिनीक मधे बऱ्याच वेळा जाण्याचा प्रसंग येतो तेव्हा समोरच बाबांचा फ्रेम केलेला व पुष्पहाराने वेष्टीलेला आशिर्वाद फोटो दिसतो व मस्तक बाबांपुढे नम्रतेने झुकते.

बऱ्याच वेळा एस.टी. कंडक्टरला पैसे देताना त्याच्या बॅगवर बाबांचा पेंट केलेला फोटो दृष्टीस पडतो व त्यावर "अगर आप मेरी ओर देखेंगे मैं आपकी और देखूंगा।" ही ओळ नजरेच पडते, व यात्रा सफल होणार ह्याची मनोमन साक्ष पटते.

श्री. हेमाडपंतानी श्री साई सच्चरित्रांत वर्णन केलेल्या गोष्टींचा अनुभव माझ्या रोजच्या जीवनात मला पाहण्यास मिळतो, व "जेथे तू जातो तेथे मी तुझा सांगाती" ह्याचा अनुभव येतो. श्री दाभोलकर उर्फ हेमाडपंतानी श्री साई सच्चरित्रात वर्णन केलेली घटना अशा प्रकारे आहे.

एकदा माधवराव देशपांडे उर्फ शामा ह्यांना गया, काशीयात्रा करण्याची इच्छा झाली. त्या प्रमाणे माधवराव बाबांची परवानगी मागण्यास गेल्यावर बाबा

माधवरावांना म्हणाले कि, तुझा तीर्थ यात्रा करण्याचा विचार फार चांगला आहे, माझा तुझ्या ह्या यात्रेला पूर्ण आशिर्वाद आहे.

जातोस तर जा पण एक गोष्ट लक्षात ठेव कि, शामा मी तुझ्याही अगोदर येईन, आणि खरोखर बाबांनी माधवरावांना दिलेला आपला शब्द अक्षरशः पाळला. तो असा कि, जेव्हा माधवराव गयेला पोहचले तेव्हा एका गयावळाच्या घरात माधवरावांनी प्रवेश करता क्षणी त्याच्या खोलीत माधवरावांना बाबांचा फ्रेम केलेला फोटो दिसला जो कि, माधवरावांनी त्या गयावळाला काही वर्षापूर्वी तो गयावळ शिरडीत बाबांच्या भेटीसाठी आला असतांना पूजे करीता दिला होता व बाबांची भेट घडवून दिली होती. ह्या गोष्टीचे माधवरावांना त्यावेळेस विस्मरण झाले व बाबा आपल्याही आधी येथे येऊन पोहचले हे प्रत्यक्ष पाहून अक्षरशः ढसा ढसा रडू लागले.

श्री साई भक्तांनो मला देखील माधवरावांप्रमाणे माझ्या रोजच्या जीवनांत पावलो पावली बाबांची प्रचिती अनुभवास येते व बाबांच्या अस्तित्वाचा आनंद लुटण्यास मिळतो.

माझ्या प्रमाणे इतर साईभक्तास देखील हा आनंद मिळावा ही श्री साईनाथांच्या चरणी प्रार्थना करीत आहे.

शेवटी हेच म्हणावेसे वाटते कि, "बाबा घडो तुझे नामस्मरण व्हावी न इतर आठवण दिसो,तुझे रूप निरंतर इतर काहीही ना दिसो".

# साईबाबांचे सरळ - सोपे तत्त्वज्ञान

**श्री. मुकेश म. कामत**
कामत निवास वाडगांव फाटा
ता. अलिबाग - रायगड

महाराष्ट्रामध्ये संताची पुजा सतत होत आली आहे. महाराष्ट्र ही जशी प्रतापी शूर वीरांची भूमी आहे तशीच ती संताची भूमी आहे. या भूमीचे पावित्र्य आणि मांगल्य शूर, प्रतापी, वीर पुरुषानी मनगटाच्या जोरावर, तलवारीच्या खणखणाटाने जसे लढाया जिंकुन राखले आहे तसेच ते नाना प्रांतात जन्म घेतलेल्या नाना धर्माच्या जातींच्या व पंथाच्या संत महंतानी देखील आपल्या अमृततुल्य वाणीतून बाहेर पडलेल्या विचारधनाने राखले आहे.

नदीचे मूळ व ऋषीचे कुळ विचारू नये असे म्हणतात. साईबाबांच्या विषयी असेच म्हटले पाहिजे. कारण साईबाबा यांच्या जाती धर्माविषयी लोकांत वाद आहे. कुणी त्यांना हिंदु मानतात तर कुणी त्यांना मुस्लीम मानतात. पण एक मात्र निर्विवाद आहे की, श्री साईबाबा हे थोर संत होऊन गेले आहेत.

दुष्काळी अहमदनगर जिल्हयातील शिरडी सारख्या लहानशा गावात साईबाबांनी अलौकिक कार्य केले. वास्तविक शिरडीचा भाग हा वैराण भाग पण साईबाबांनी आपल्या जिवीत कार्याने या भागाचे नंदनवनच बनविले. शिरडी येथे साईबाबा कुठून आणि केव्हा आले हे कळायला मार्ग नाही पण या भागात येऊन त्यांनी आपले वास्तव्य केले व

**'जे का रंजले, गांजले, त्याशी म्हणे जो आपुले ।**
**तोची साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा' ।।**

या संत तुकाराम महाराजांच्या उक्तीला ते सार्थ ठरले!

शिरडीतील गरीब, दुबळ्या जनतेला साईबाबांनी आपल्या अमूल्य अमुल्य वाणीचे संजीवन दिले. स्वच्छतेची शिकवण दिली. श्रमाचे धडे दिले. सकाळी उठावे, अवती भोवतीचा परिसर हातात केरसुणी घेऊन स्वच्छ करावा, ईश्वराचे मनोभावे स्मरण करावे, भजन करावे, नंतर भिक्षा मागावी, भिक्षेत जे दाणे मिळतील ते स्वतः दळावेत, त्यांची खिचडी स्वतःच तयार करावी आणि स्वतः खाता खाता प्रसाद म्हणून इतरानाही वाटावी. असा साईबाबांचा दिनक्रम होता. बाबांच्या या दिनक्रमाचा भोळ्याभाबडया गरीब जनतेवर मोठा प्रभाव पडला व सारी जनता बाबांच्या या दिनक्रमाचे अनुकरण करू लागली. लोकांची घरेदारे, अवती भवतीचा परिसर इतकेच काय पण संबंध शिरडी देखील स्वच्छतेचे माहेरघर बनली. लोकाना नकळतच श्रमाची शिकवण मिळाली. स्वावलंबनाची शिकवण मिळाली. बाबांनी अनेक ठिकाणी झाडे लावली. स्वतःच्या वास्तव्याच्या ठिकाणी झाडे सुंदरशी बाग निर्माण केली. लोकांनी सुद्धा आपल्या घराभवती बागा निर्माण केल्या. त्यामुळे शिरडीतील रोगराई दूर पळाली. लोकांच्या स्वकष्टाने दुष्काळही हटला.

साईबाबांनी गरीब-श्रीमंत यांना जवळ केले. कुणी मोठा नाही, कुणी छोटा नाही. सारी ईश्वराची लेकरे आहोत, सर्वांनी प्रेमाने सहकार्याने वागले पाहिजे अशी शिकवण दिली. जातीजमातीतील वैरभाव सर्व धर्माच्या, पंथाच्या जातीच्या लोकांना जवळ करून त्यांनी नष्ट केला. वर्णभेद आणि वर्गभेद यामुळे मिटले गेले. सर्वात समभाव आपोआपच निर्माण झाला. समतेची महान शिकवण मानवतेची सेवा करता करताच साईबाबा देऊन गेले.

आपल्या दरबाराजवळ साईबाबांनी तुळस व सबजा शेजारी शेजारी लावला. ते मंदिरात जात व मशिदीतही जात. त्यांच्या या कृतीने धार्मिक एकता निर्माण झाली. राम-रहिम जवळ आले. एक उदाहरण देतो—

शिरडी येथील साईबाबांच्या समाधीपाशी कडुलिंबाचे एक झाड आहे. त्या झाडाचा पाला साखरेसारखा गोड लागतो. त्याचा रस दुधासारखा निघतो. आपल्या समदृष्टीने साईबाबांनी त्या झाडाच्या प्रतीकाने समाजातील कटुता घालवून समाजात साखरेसारखा गोडवा निर्माण करता येतो हे दाखवून पटवून दिले.

पशुपक्ष्यांशी व प्राणीमात्रांशी बाबा एकरूप झाले होते. जनावरावर प्रेम करा, दया करा, त्यांची सेवा करा. असे बाबा नेहमीच सांगत असत. कुत्री, मांजरे, गाईवासरे यांच्या विषयी बाबांना अतिशय प्रेम वाटे. त्यांच्या संगतीत ते नेहमीच रमत असत. याला कारण त्यांच्या मानसिक शक्तीचा विकास! ज्यांच्या मानसिक शक्तीचा विकास होतो तीच माणसे समाज कल्याण साधू शकतात.

'जो माझ्याकडे ज्या दृष्टीकोनातून पाहील त्याला तसे फळ मिळेल.' असे बाबांनी एके ठिकाणी म्हटले आहे. याचा अर्थ असा नव्हे की, लोकांनी विभूतीपुजक बनुन बाबांच्या भजनी लागावे. याचा अर्थ अगदी सोपा आहे आणि तो असा की— तुम्ही कुणाकडेही सद्‌भावनेने पहा. सद्‌विचाराने जा. तुमचे भले होईल. 'जशी दृष्टी तशी सृष्टी' या म्हणीप्रमाणे शुद्धाचरणाने स्वत:चे हित ज्याला त्याला करून घेता येते.

गरीब-श्रीमंत यांनी भेदाभेद विसरून एकत्र यावे. ब्राम्हण-शुद्र यांनी एकाच पंक्तीला बसावे. स्वकष्टाने मिळवावे. स्वत:बरोबर त्याचा इतरांनाही लाभ घेऊ द्यावा. प्राणीमात्रावर दया करावी. प्रेम करावे. स्वच्छतेचे व्रत घ्यावे. वृक्षवेली लावाव्यात, वाढवाव्यात. धर्मभेद, पंथभेद न मानता साऱ्यांनी समतेने वागावे. मानवाने मानवाची सेवा करावी. विभुतीपूजा करू नये. अशी अगदी साधी, सोपी व सरळ शिकवण साईबाबांनी आपल्या वागणुकीने लोकांना दिली आहे.

'साईबाबा' या शब्दात स + आई असे शब्द आहेत. आईसह आलेले बाबा ते साईबाबा! साईबाबांनी मातृपितृ प्रेमानेच साऱ्याना जवळ केले. त्यांच्या समस्या सोडविल्या. त्यांना दिलासा दिला. दिव्य प्रेम, शक्ती, अथांग करूणा त्यांनी महाराष्ट्र भूमीत साकार केली. श्रद्धा आणि सबुरीच्या मार्गांनी त्यांनी साऱ्यांच्या जीवनाला स्पर्श केला म्हणूनच—

**शिरडीमें संत साईनाथ की होती है आरती ।**
**गाते है सब भारती । हिंदु-मुसलमान-पारशी ।।**

सर्व जातीचे, धर्माचे पंथाचे लोक एक दिलाने भक्ती भावाने साईबाबांची शिकवण आचरणात आणुन त्यांची आरती सतत गात रहाणार आहेत.
श्रीसाईबाबांना माझे कोटी कोटी प्रणाम !
श्रीसाई समर्थ ! श्री साई समर्थ !

## छोट्या साईभक्तांसाठी

# एक श्रेष्ठ संत – श्री नरहरी सोनार

श्री. संत नरहरी महाराज हे संत नामदेव, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, गोरा कुंभार याच श्रेणीतील विठ्ठलाचे परमभक्त होऊन गेले. श्री नरहरी महाराज यांचा जन्मच मुळी श्री क्षेत्र पंढरपूर येथे झाला.

नरहरी महाराजांचे वडिल त्यांच्या लहानपणीच स्वर्गवासी झाल्यामुळे अुदरनिर्वाहाची जबाबदारी बालवयातच त्यांच्यावर पडली. त्यांनी वडिलोपार्जीत सोनार कामाचा धंदा पुढे चालविला. त्यांचे धंद्यातले कसब लोकविलक्षण होते. त्यावेळी त्यांच्या सोनार कामाबद्दल अितकी प्रसिद्धी होती की सर्व पंढरपूरातच नव्हे पण आजूबाजूला ५० कोस अंतरांत त्यांच्या सारखा कसबी कारागीर नव्हता. अितका नांवाजलेला कलाकार असूनसुद्धा हा फार प्रामाणिक सोनार होता. त्यांचा व्यवहार फार चोख असे म्हणून पंढरपूरांतील तसेच आजूबाजूचे लोक आपले सुर्वणालंकार त्यांच्याकडून करून घेत.

श्री नरहरी महाराज हे लहानपणापासूनच श्री शंकराचे परम अुपासक होते. सकाळी अुठल्यानंतर शिवाची यथासांग पूजा केल्यानंतरच ते कामाला सुरुवात करीत. काम करीत असतानासुद्धा ते मुखाने शिवनामाचा जप करीत असत. अेका शिवशंकराशिवाय त्यांना दुसरे दैवत वर्ज्य असे.

पंढरपुरात अितकी वर्षे काढली तरी त्यांनी विठ्ठल मंदिराच्या पायरीचेसुद्धा दर्शन घेतले नव्हते. मग श्री विठ्ठलाचे दर्शन दूरच! अेकदा काय झाले की अेका सावकाराला पांडूरंगाच्या कृपेने २० वर्षानंतर पुत्ररत्नाचा लाभ झाला. त्याआधी त्याने पांडूरंगाला नवस केला होता की जर मला मुलगा झाला तर मी तुला सोन्याचा कटिदोडा वाहीन. सावकाराला मुलगा झाल्यानंतर नवस फेडण्यासाठी त्याने सोनाराची चवकशी केली. त्याला असे आढळून आले की हे काम करण्यासाठी नरहरी सोनाराशिवाय दुसरा योग्य कलाकार नाही.

सावकार मूळातच खूप श्रीमंत होता व त्यात श्री विठ्ठलच त्याच्या नवसाला पावलेला! त्याला पैशाची पर्वा नव्हती. तसेच नरहरी महाराजांच्या प्रामाणिकपणाची ख्याती त्यालाही कळली होती. म्हणून तो लगबगीने महाराजांच्या दुकानावर गेला. सावकाराने महाराजांना कटिदोडयाच्या बाबत पूर्वपिठीका कथन केली. तसेच त्याला कितीही खर्च आला तरी तो देण्याचे मान्य करून त्यांना कटिदोडा बनविण्यासाठी विनंती केली.

नरहरी महाराजांनी त्याची विनंती अैकून घेतली व नंतर त्या सावकाराला शांतपणे कटिदोडा बनविण्यास असमर्थ असल्याचे सांगितले. त्यांनी सदरील काम

दुसऱ्या सोनाराकडून करवून घ्या असे सांगितले. सावकार मनातून दु:खीकष्टी झाला. श्री विठ्ठलाचे हे काम कसबी कारागिराकडूनच करून घ्यावयाचे हा त्याचा संकल्प! नरहरी महाराजांच्या नकारामुळे त्याच्यापुढे मोठा पेच निर्माण झाला. तरीही सदरील काम नरहरी सोनाराकडूनच करून घेण्याचा त्याने मनाशी संकल्प केला. मनातल्या मनात त्याने श्री विठ्ठलाचे स्मरण केले व श्री नरहरी सोनारानेच हे काम करावे व त्याप्रमाणे त्यांचे मन वळवावे अशी मनोमन प्रार्थना केली.

श्री नरहरी महाराजांना सावकाराने सांगितले की आपण म्हणता त्याप्रमाणे मी आता दुसऱ्या सोनाराकडे जातो, पण तत्पूर्वी मी आपणास अशी विनंती करतो की हे काम आपण का बरे नाकारता? आपल्या कौशल्याला सुयोग्य असलेले हे काम आपल्याशिवाय दुसरा कोणीही करू शकणार नाही हे आपणासही माहीत आहे. आपण नकाराचे कारण सांगितल्यानंतर मी दुसरीकडे प्रयत्न करीन. सावकाराचे हे कळकळीचे बोलणे अैकल्यानंतर नरहरी महाराजांनी सांगितले की मी श्री शिवशंकरांचा निस्सीम अुपासक आहे. श्री शंकराच्या दर्शनाशिवाय अितर कोणत्याहि देव देवतांचे दर्शन या आयुष्यात मी आतापर्यंत घेतलेले नाही. कटिदोडयाचे माप घेण्याकरिता मला विठ्ठलाचे मंदिरात यावे लागणार व मला ते शक्य नाही.

सावकाराने नरहरी सोनाराचे म्हणणे शांतपणे अैकून घेतले नंतर त्याने त्यावर अेक तोड सुचविली. सावकार म्हणाला, तुमची अडचण योग्यच आहे. पण मी स्वत:च देवळात जाअून विठ्ठलाच्या कंबरेचे माप आपणास आणून देतो. मग तर आपली अडचण असणार नाही.

नरहरी महाराजानी या तोडग्यास मान्यता दिली. सावकार मोठ्या हर्षाने मंदिरात गेला व योग्य ते माप घेअून नरहरी महाराजांच्या स्वाधीन केले. कटिदोडयास लागणारे सोने व अितर रत्ने नरहरी सोनाराकडे सूपूर्द करून तो कटिदोडा पूर्ण होण्याची वाट पाहू लागला.

आठवडयातच कटिदोडा पूर्ण झाला. सर्व कौशल्य पणाला लावून बनविलेला तो कटिदोडा फारच सुंदर झाला होता. त्याचे कलापूर्ण व नाजूक नक्षीकाम व सोन्याची झळाली पाहून त्या सावकारास अत्यानंद झाला. केव्हा अेकदा हा कटिदोडा घालून श्री विठ्ठलाचे मनोहर रूप पहातो असे सावकारास होअून गेले. त्याने योग्य ती मजूरी देअून व वर मोठे बक्षिस देअून सोनाराच्या कामाचा यथायोग्य गौरव केला.

तो कटिदोडा घेअून सावकार विठ्ठलाच्या मंदिरात गेला व कटिदोडा घालून पाहू लागला. पण आश्चर्य! कटिदोडा घट्ट होअू लागला. परत नरहरी सोनाराने तो युक्तीने थोडा मोठा करून दिला परंतु नंतर घालून पहाताच तो सैल झाल्याचे

आढळले. अेकंदर पाच सहा वेळ हा प्रकार झाला. कधी घट्ट तर कधी सैल. सावकार दुःखी अंतःकरणाने नरहरी महाराजांकडे आला व स्वतः येअून योग्य त्या मापाचा कटिदोडा करून देण्याची विनंती केली.

सावकाराच्या दुःखी चेहऱ्याकडे पाहिल्यानंतर नरहरी महाराजांना वाईट वाटले व ते म्हणाले, तू माझे डोळे बांधून जर मंदिरात नेशील तर मी तुझ्याबरोबर येईन. सावकाराने सांगितल्याप्रमाणे डोळे बांधून त्यांना मंदिरात नेले. त्याच स्थितीत माप घेण्यासाठी विठ्ठलाच्या कंबरेस त्यांनी चाचपले. मुर्तीच्या कंबरेस त्यांनी अंदाजाने हात लाविला पण काय आश्चर्य! त्याना त्या ठिकाणी नागाचा फणा हातास लागला. नंतर त्यांचा हात खाली आल्यावर त्याच्या हातास शंकरांच्या पिंडीचा स्पर्श जाणवू लागला. आपल्या परम प्रिय दैवताचा हा स्पर्श जाणवताच त्यांनी ताडकन् आपल्या डोळ्यावरची पट्टी काढली. मनात म्हणाले की, मी किती हतभागी आहे. माझ्या देवासमोर मी काय आंधळा होअून बसलो आहे. झटकन् त्यांनी डोळे अुघडताच त्यांना श्री विठ्ठलांच्या मूर्तीचे दर्शन झाले! लगेच त्यांनी डोळे मिटून घेतले व चाचपण्यास सुरुवात केली. परत हातास शंकराची पिंडी लागली. तीन चार वेळा हा प्रकार झाल्यानंतर मात्र त्यांनी श्री विठ्ठलाच्या पायावर डोके ठेविले. श्री विठ्ठल प्रसन्न झाले व त्यांनी दर्शन देअून म्हणाले, अरे वेडया! शिवशंकर व पांडूरंग हे अेकच आहेत! आम्ही कोणी वेगळे का आहोत? तुझा भ्रमनिरास झाला हे चांगलेच झाले. तू तर माझा परमप्रिय भक्त आहेस!

नरहरी सोनाराने वर पहाताच त्यांचा द्वैतभाव कोठल्या कोठे पळाला. त्याच क्षणी कधी सैल तर कधी आवळ होणारा कटिदोडा देवाला बरोबर बसला.

●

# – बाबा पाठी त्याला कशाची भीती –

**कुंदा कृ. संत**
"यशोदा" रामवाडी नौपाडा ठाणे २

अनेक वेळा संकटे येतात पण त्यावेळी पू. साईबाबा धावून येतात असा आमच्या घरचा अनुभव आहे. आम्ही घरात सर्वजण पू. साईबाबा यांचे नामस्मरण करीत असतो.

अेक प्रसंग सांगावासा वाटलो तो असा.– मे महिन्यातल्या अेका गुरूवारी दुपारच्या वेळी मी व माझी मैत्रीण स्मिता घरात उकडत असल्याने अंगणात झाडाखाली पलंगावर बसून गप्पा मारीत होतो. ते झाड आंब्याचे होते. आम्ही गप्पात इतके रंगून गेलो होतो की माझा दोन वर्षे वयाचा मामेभाऊ व त्याची

थोरली सात वर्षाची बहीण केव्हा आले व आमचे शेजारी बसले कळलेच नाही. त्यात ती छोटी मुलगी तेथून कुठेतरी पळाली. शेजारी खेळत असावी. माझा तो छोटा भाऊ मात्र पलंगावरच बसून होता.

शेजारी दत्तमंदिरात श्री साईबाबांची मूर्ती स्थापन केलेली आहे. आम्ही रोज दर्शन घेतो.

थोडा वेळ गप्पा झाल्यावर कंटाळा आला म्हणून मी व स्मिता जरा थोडे फिरावे म्हणून उठलो व चारच पावले मी चालत गेले असता 'कडाड कड' असा भयंकर आवाज झाला आणि मागे पाहिले तो आंब्यांचा सात आठ सेंटिमीटर लांबीच्या गर्द पानांनी डवरलेल्या फांद्या खाली आल्या होत्या. माझी मैत्रीण तर फांद्यामध्ये पानांच्या खाली झाकून गेलेली होती. माझा मामेभाऊ स्वप्नीलही तेथेच होता. फांद्या पलंगावर पडल्यामुळे मी तर घाबरून गेले. ती संध्याकाळ फार कठीण अशी मला वाटली. धावत जाऊन मी फांद्या जरा बाजूला ओढू लागले तर स्वप्नीलच्या दोन बाजूला फांद्या पडलेल्या पण तो अगदी मजेत लोळत पडला होता. तेवढयात घरातून सर्वजण बाहेर आले व त्यांनी सर्व फांद्या अलगत वर उचलून बाजूला टाकल्या आणि काय आश्चर्य त्याखाली स्मिता दिसली. तिला थोडेसे खरचटले होते तेवढेच. तीही हसत उठून बाहेर आली. सर्वांचे डोळे आनंदाश्रूनी भरून आले. माझे बाबानी हात जोडून प्रार्थना केली ''हे साईबाबा, आजचा प्रसंग तुमचेमुळे टळला.

फांद्यांच्या कडकडाटामुळे तर आम्ही घाबरून गेलो होतो. तुम्ही पाठीशी आहात म्हणून बरे नाहीतर काय झाले असते कल्पनाच करवत नाही.

'साईनाथ तारी त्याला कोण मारी' भारावलेल्या स्थितीत श्री साईबाबांची मूर्ती दृष्टीसमोर आली. त्यांचीच ही सारी कृपा. मला तर बाबांचे वचन आठवले.

**जरी हे शरीर गेलो मी टाकून ।**
**तरीमी धावेन भक्तासांठी ।।**

आमचे घरात आम्ही रोज श्री साईबाबांचे स्मरण व नामजप करतो. त्यांची उदी लावतो त्यावेळी आठवते बाबांचे रूप. ते सांगतात 'भिऊ नकोस मी पाठीशी आहे'.

# ''नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य''

**श्री. चंद्रकांत पोतदार**
८१/सी. चंद्रलोक सोसायटी
मांजलपूर - बडोदा - ११.

आजच्या ह्या धावपळीच्या जीवनांत कधी कुठे केव्हा काय होईल हे सांगता येत नाही. जीवनात असे काही दुख:द प्रसंग, अडचणी येतात. त्यावेळी सामान्य माणसाला फक्त परमेश्वर त्याला त्या प्रसंगातून निभावून नेतो. श्री साईबाबा आज देहानें जरी नसले तरी कुठल्या ना कुठल्या तरी रुपाने त्यांची भक्तांवर कृपा आहे, आशिर्वाद आहेत.

श्री साईबाबांचा मला आलेला अनुभव असा — ता. ३० एप्रील १९८५ रोजी मी माझ्या मित्राबरोबर स्कूटरवरून नोकरीस जात असतांना रस्त्यांत एस्.टी. बसने पुढून स्कूटरला धडक दिल्याने अपघात झाला. अपघात सकाळी साडे आठ ते पावणे नऊच्या सुमारास झाला. श्री साईच्या कृपेने आम्हास जास्त दुखापत झाली नव्हती. खरोखर साईबाबांनी आम्हाला मोठया अपघातातून वाचविले होते. स्कूटरचा चेंदामेंदा झाला होता. मला हॉस्पीटलमध्ये दाखल केले होते. सर्व तपासणी झाल्यानंतर कळलें की माझा उजवा पाय सांध्यातून सुटा झाला होता. हॉस्पीटलमध्ये मला आणीपर्यंत मी बेशुद्ध झालो होतो. शुद्धीवर आल्यानंतर समजले की पाय हालत नाही, व उचलता पण येत नाही. डॉक्टरानी पाय सांध्यामध्ये बसवून मला कॉटवर पडून राहण्यास सांगितले. मला उठून बसावयाचे नाहीं म्हणून डॉक्टरांनी सक्त ताकीद दिली होती. पायास घट्ट पट्टी बांधली होती. त्यामुळे पाय बराच दुखत होता. मी वेदनेने तळमळत होतो. मी साईबाबांचा धावा केला. मुखाने फक्त साईबाबा साईबाबा म्हणत होतो. पहाटे साधारण ४ ते पांच वाजता मला माझ्या कॉट शेजारी असलेल्या भितीवर श्री साईबाबांचे चित्र असलेले कॅलेंडर दिसले. मी मनोमन साईबाबांना नमस्कार केला. अखेर साईबाबा माझ्या हाकेला धावून आले होते व मला दर्शन देऊन धीर दिला. सकाळी मी उठून प्रथम त्या भितीकडे पाहिले. मला तेथे साईबाबांचे कॅलेंडर दिसले नाही. आश्चर्य म्हणजे कुठल्याच भितीकडे एकही कॅलेंडर नव्हते.

असा अनुभव आल्यानंतर वाटते की श्री साईबाबांच्या वचनाची ''नित्य मी जिवंत । जाणा हेची सत्य'', याची प्रचिती येते. श्री साईंच्या कृपेने आज मी पूर्ण बरा झालो आहे. श्री साईबाबा अशा प्रकारे दु:खात, संकटात असलेल्या आपल्या भक्तांना धीर देऊन त्यांतून तारून नेतात.

**''करतां साईबाबांचा धांवा**
**धावून येती भक्तांच्या गांवा**
**देऊनी आपुले दर्शन**
**करती सर्व दु:ख हरण''.**

# बाबां समोरचे विडीचे बंडल गायब

**श्री. रामचंद्र गोविंद कोयंडे,**
अ/५, सबर्बन सोसायटी, शिवसृष्टी,
कुर्ला (पूर्व), मुंबई ४०० ०२४.

"साईलीला" मधून प्रसिद्ध होणारे भक्तांचे अनुभव वाचून बाबांच्या अगाध लीलांची आठवण वारंवार मनांत उमटते आणि मन अक्षरशः ऊचंबळून येते.

सन १९६५ मध्ये "साईसमाधी" दर्शनाचा प्रथमतः योग आला. त्यावेळी मी नासिकला पोलीस ट्रेनिंग कॉलेज मध्ये 'उपनिरीक्षकाच्या अभ्यासक्रमा'साठी आलेलो होतो. परंतु त्यावेळी "साईबाबा" हे परमदैवत आहे हे मानण्यास माझे मन तयार नव्हते कारण असे की सन १९६२-६३ साली (साल नक्की आठवत नाही) शिरडी येथे भिंत कोसळून त्याखाली २२ माणसे ठार झाली अशी वर्तमानपत्रात बातमी प्रसिद्ध झाली होती, आणि त्यामुळे मनात एकच विचार यायचा आणि तो म्हणजे जर "साईबाबा" हे देवाप्रमाणे आहेत तर त्यांनी हया २२ माणसांना का वाचविले नाही? अर्थात पुष्कळशा "साईभक्ताना" मी हा प्रश्न विचारला परंतु एकही जण समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. परंतु सन १९७७ मध्ये स्वतः "साईबाबांनी" स्वप्नदर्शन देऊन त्याचे उत्तर दिले, तीच हकीगत पुढे देत आहे.

कित्येक दिवस वाटत होते की हा आपला अनुभव साईदृष्टांत - साईलीलामध्ये प्रसिद्ध करावा. परंतु तशी आज्ञा मिळत नव्हती. परंतु "साईलीला" ऑगस्ट १९८५ चा अंक हाती आला आणि बाबांनी आज्ञा दिली.

१९६५ नंतर १९७७ पर्यंत २ ते ३ वेळ शिरडीला जाण्याचा योग आला परंतु जोपर्यंत माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळत नव्हते तोपर्यंत साईबाबांना (समाधीला) मी पुन्हा पुन्हा तोच तोच प्रश्न विचारीत असे.

सन १९७२ साली साईबाबांचे छायाचित्र कॅलेंडर रूपाने - जे आमच्या राजाध्यक्ष साहेबांच्या (सध्या पोलीस उपायुक्त) कुंचल्यातून साकार झालेले हाती आले. बाबांचे छायाचित्र अप्रतिम असल्यामुळे आमच्या सौभाग्यवतीने ते फ्रेम करून घेऊन घरामध्ये ठेवले. मी तर कधी त्याची पूजासुद्धा केली नाही. मात्र बाबांकडे लक्ष गेल्यास एकच प्रश्न ?.....

सन १९७७ साली मी, सौ., माझे ३ मुलगे, सासुबाई, साडू व त्यांची पत्नी आणि त्यांची २ मुले असे आम्ही श्रीत्रिंबकेश्वर, नाशिक, मुक्तीधाम, शिरडी, पुणे, आळंदी, देहु रोड अशी दोन दिवसांची यात्रा केली. योगायोग असा की शिरडीला ज्या दिवशी आम्ही पोचलो त्याच दिवशी गुरूवार होता. साईबाबांची

पालखी निघालेली. एकंदरीत सर्व सोहळा पाहून मन तल्लीन झाले. देहभान विसरून गेलो आम्ही. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही पुणे, आळंदी मार्गे मुंबईला परत आलो.

त्याच्या पुढच्याच गुरूवारी सकाळी ५/५।। वाजता (बाबांच्या आरतीच्या वेळी) बाबांनी मला स्वप्नात दर्शन दिले - जे बाबांचे छायचित्र फ्रेम करून घेतले होते - त्यातून बाबांनी उजवा हात बाहेर काढला आणि खुंटीला अडकवलेल्या माझ्या शर्टाच्या खिशात घातला आणि बीडी काढून ते ओढू लागले. मला म्हणाले ''बेटा, तू शिरडी तक आया, लेकिन मेरी जो दुसरी जगह है ''साकोरी'' वहाँ तक क्यों नहीं आया?'' मी म्हणालो, ''बाबा, मला ते ठिकाण माहित नव्हते.

बाबा मला पुन्हा म्हणाले - बेटा, तेरा एक सवाल है। जो २२ आदमी मर गये उन्हें मैंने क्यों नहीं बचाया?

मी म्हणालो : अजूनही माझा तोच प्रश्न आहे. कित्येक साईभक्तांना मी हा प्रश्न विचारला. परंतु कोणीच समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही.

बाबा : बेटा, - रुपयाच्या नाण्याला दोन बाजू असतात आणि तू तर एकच पहातोस.

मी : बाबा, हयाचा अर्थ मला समजलेला नाही.

बाबा : बेटा, जन्माला आलेला प्रत्येक मनुष्य हा मरणार हे नक्की ना?

मी : होय.

बाबा : मग तो कोठेही असला, स्वतःच्या घरी असला आणि त्याची वेळ आली मग तो मरणार हे निश्चित ना?

मी : होय.

बाबा : ही जी २२ माणसे मरण पावली त्यांची 'मृत्यू वेळ' एकच होती आणि ते जरी स्वतःच्या घरी असले तरी त्याचवेळी ते मरण पावले असते हे तुला मान्य आहे ना?

मी : होय.

बाबा : मग तू रुपयाच्या नाण्याची दुसरी बाजू का पहात नाहीस?

मी : बाबा, मला अजूनही अर्थ समजलेला नाही.

बाबा : बेटा, जी मरण पावलेली माणस स्वतःच्या घरी असली तरी मेलीच असती ना? मग ती माझ्या पायाजवळ येऊन मरण पावली हयाचा अर्थ ती सर्वबंधनांतून मुक्त होऊन स्वर्गात गेली असे नाही कां तुला वाटत?

आणि ताबडतोब मी जागा झालो. रुपयाच्या नाण्याची दुसरी बाजू मला समजली होती. परंतु एक आश्चर्य आणि ते म्हणजे बाबांनी माझ्या शर्टाच्या खिशातून बीडी काढून ओढली होती. मी स्वतः अजून सुद्धा बीडी किंवा सिगरेटस

पीत नाही. बाबांचा फोटो एकीकडे तर माझे शर्ट दुसरीकडे! हे कसे शक्य आहे? मी तर साफ भांबावून गेलो. बस ठरले! पुढच्या गुरूवारी शिरडीला जाऊन प्रत्यक्ष बाबांकडेच याचा न्याय करू!

पुढच्या गुरूवारी मी दुपारी २ वाजता सहकुटुंब शिरडीला पोचलो. (ती हकीगत सुद्धा मोठी चमत्कारीक आहे परंतु जागेअभावी निवेदन करीत नाही.) रहाण्याची व्यवस्था झाल्यावर पहिल्या प्रथम काय केले असेल तर, सरळ 'साकोरी' गांठली. उपासनी महाराजांचे दर्शन घेतले आणि संध्याकाळी - सुर्यास्तावेळच्या आरतीला, साईमंदिरांत हजर झालो. कारण 'बीडीचा' प्रश्न सोडवावयाचा होता ना?

एक बीडीचे बंडल खरेदी केले. संध्याकाळी सुर्यास्तावेळची - आरती चालू झाली. मी बाबांच्या पादुका आणि बाबांनी वापरलेल्या वस्तू ज्या ठिकाणी ठेवतात. तेथे ऊभा राहिलो. खिशातून बीडीचे बंडल काढले आणि पादुका ठेवतात त्या समोरील खिडकीवर ते ठेवले. बाबांच्या दोन्ही हातांना अंतःकरणापासून नमस्कार केला. डोळे आपोआपच मिटले गेले आणि बाबांना म्हणालो, "बाबा, आपण मला दर्शन देऊन बीडी ओढलीत, तरी आता मी 'बीडी' आणून आपल्या चरणांवर (पादुकासमोर) ठेवली आहे ती मान्य करून घ्या आणि आम्हा सर्व भक्तगणांना सुखी ठेवा. बस्स्, मी पुन्हा डोळे उघडले आणि ज्या ठिकाणी बीडीचे बंडल ठेवले होते तेथे पाहिले तर काय आश्चर्य! बंडलच गायब!

असा आहे बाबांचा साक्षात्कार!

**जया मनी जैसा भाव ।**
**तया तैसा अनुभव ।।**

●●●

# ही श्रींची साईकृपा

**श्री. सुर्यकांत विठ्ठल वराडकर**
१/३८ 'भरत' बिल्डींग,
मांगलवाडी, गिरगाव, मुंबई ४०० ००४.

शनिवार ता. ७ एप्रिल रोजी मी कामानिमित्त बाहेरगावी गेलो होतो. घरातील इतर मंडळी रविवार ता. ८ एप्रिल १९८४ रोजी सकाळीच माझ्या बहिणीच्या घरी गेली होती. खोलीला कुलूप होते. त्याच दिवशी दुपारी, माझ्या खोलीच्या व्हेंटीलेशवर वरील मजल्यावरून कुणीतरी सिगारेटचे जळते थोटूक टाकले, व्हेंटीलेशनला पुठ्ठा लावलेला होता, तो जळून खिडकीला असलेला पडता पूर्ण जळला. शेजाऱ्यांनी खिडकीतून आग विझविण्याचा प्रयत्न केला. आतील

बाजूस खिडकीच्या एका बाजूस श्री दत्तगुरुंचा फोटो व दुसऱ्या बाजूस श्री साईमाऊलीचा फोटो होता. खिडकीजवळच टी. व्ही., रेडीओ, स्टीरीओ सेट, रेकॉर्डस टेबलावर होते व त्याच्या खाली प्लास्टीकचे कापड घातलेले होते. टी. व्ही. चे कव्हर अर्धे पाऊण जळले. स्टीरीओ स्पीकर्सच्या वायर्स जळाल्या, टी. व्ही. ची अेरीयल थोडी जळली. पण साईकृपेने टी. व्ही., रेडीओ, स्टीरीओ त्याच्या खालील कपाटातील मुलांचे कपडे व लागूनच दोरीवरील टांगलेले कपडे, साडया जशाच्या तसे राहीले, सांगायचे म्हणजे खोलीतील संसार पूर्णपणे अग्नीभक्षण होणार होता. केवढा मोठा अनर्थ होणार होता, पण तो टळला. बाहेरगावी असताना श्री साईबाबांना मी अगरबत्ती दाखवताना ती हातातून पडली होती व बोटाला चटका बसला होता. म्हणजे या टळलेल्या अनर्थाची जाणीव बाबांनी आधीच करून दिली होती.

याला काय म्हणावं 'श्री साईकृपा' दुसरे काय? सदैव त्यांची कृपा आम्हावर राहो.

●

# कृपावंत साई माऊली

**श्रीमती प्रमिला कृ. सप्ताळकर**
मु. सप्ताळे, विरार पो. आगाशी,
ता. वसई, जि. ठाणे

साई बाबांची लीला अगाध आहे. आणि त्यांनी दिलेल्या.... वचनांची प्रचिती भक्तांना पदोपदी येत आहे. माझाच अनुभव पहा ना!

दिनांक ५ एप्रील ८५; हनुमान जयंतीच्या दिवशी आमचकडे माझ्या मुलीच्या मुलाचे बारसे होते. आम्ही नेहमीप्रमाणे देवांच्या फोटोंना हार घातले, मला नेहमी फुलांनी; हारांनी सुशोभित देवांचे फोटो पाहण्यास फार आनंद वाटतो.

दुसऱ्या दिवशी माझा मोठा मुलगा प्रविण देवांचे हार काढत असता मला म्हणाला, ''आई आपल्या बाबांच्या फोटोचा हार वाढलेला दिसतो''. मग मी सुद्धा पाहिले तर मलाही तो हार वाढलेला दिसला. म्हणून मी म्हणाले बाबांचा हार तसाच राहू दे.

असा हा बाबांचा हार सतत तीन दिवस पर्यंत थोडा थोडा वाढला. आमच्या शेजारी हे कळताच सर्वजण हार पाहून गेले. आता मी तो हार काढून जपून ठेवला आहे.

शेवटी बाबांना अशी प्रार्थना करते की अशीच कृपादृष्टी सदैव आमच्या कुटुंबावर ठेवा.

# "दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती"

**श्री. विजयकुमार ग. फडणीस**
ए/४३, नवबहार को. ऑप. सोसायटी.
लल्लुभाई पार्क रोड (विस्तार), इर्ला नाला,
विलेपार्ले (पश्चिम) मुंबई ५६.

माझे दि. ३ जुलै १९८३ ला डॉ. बावडेकरांचे हॉस्पिटलमध्ये पाठीच्या कण्याचे ऑपरेशन झाले व मी जवळजवळ १।। महिना अंथरूणावर झोपून होतो. सर्व विधी अंथरूणातच करावे लागत. उठून बसणे शक्य नव्हते. घरी भौक्तिकोपचार तज्ञ यावयाची व काही व्यायामाचे प्रकार करून घ्यायची. ती आठवडयातून एक दिवस यायची. हळूहळू उठवून बसण्याची परवानगी मिळाली. माझे सारखे श्री साईबाबांना गाऱ्हाणे चालू होते. मला हया दुखण्यातून लवकर उठवा.

दि. १५ ऑगस्ट १९८३ रोजी भौक्तिकोपचारतज्ञ यावयाची होती. त्या दिवशी ती चालावयास शिकवणार होती. दि. १४ ऑगष्ट १९८३ रोजीची सबंध रात्र मी श्री साईबाबांचे चिंतनात घालविली व श्री साईबाबांना गाऱ्हाणे घातले की, उद्या (दि. १५-८-१९८३) मला व्यवस्थित चालावयाला येऊ दे. त्याचा चमत्कार म्हणून काय, दि. १५-८-८३ रोजी दुपारी भौक्तिकोपचारतज्ञ आली व तिने हाताला धरून उभे केले व आधार देऊन एक एक पाऊल उचलण्यास सांगितले. मी श्री साईबाबांचे नाव घेत घेत एक एक पाऊल उचलत बेडरुम मधून हॉल पर्यंत चालू शकलो. मला काय आनंद झाला श्री साईबाबांचा महिमा अगाध आहे. पुढे हळूहळू रोज प्रॅक्टीस करत होतो. पायाच्या मुंग्या कमी होत होत्या.

मी चांगला बरा झालो. बाहेर हिंडावयास जावू लागलो. परंतु मी बोललेल्या गाऱ्हाण्याची मला विसर पडली. माझ्या मुलीला (सौ. माधुरीला) सांगितले की, श्री साईलीला मासिकाचा पत्ता मिळाल्यास आणून दे. मला अनुभव पाठवावयाचा आहे. पुढे माझे जावई व सौ. माधुरी शिरडीला गेले. तेथे त्यांनी श्री साईलीला अंक मासिकाची वर्गणी माझ्या नावे भरून दर महिन्याचा श्री साईलीला अंक चालू केला. मे १९८४ च्या अंकात काही अनुभवात एक अनुभव वाचताना आढळून आले की, लेखकाने बोलल्या प्रमाणे आपला अनुभव लिहिण्यास विसरला आहे. त्यामुळे त्याच्यावर काय प्रसंग ओढवला. माझी स्थिती पण तशीच झाली व मे १९८४ चा अंक वाचून जाग आली. पण काही ना काही कारणामुळे लिखाण मागे पडत राहिले. मध्यंतरी वर्षभर माझ्या नोकरीवर गंडांतर आले. त्यामुळे परत वर्षभर लिखाण झाले नाही. मला वाटले हे गंडांतर केवळ आपण बोललेले गाऱ्हाणे पुरे केले नाही म्हणूनच आले असावे व आज योगायोग आला व लिहिण्यास बसलो व लेख पुरा केला.

# ग्रंथ अभिप्राय

## श्री साईबाबा

[ मूळ लेखक श्री स्वामी साईशरणानंद, अनुवादक श्री. वि. बा. खेर, प्रकाशक - दिनपुष्प, प्रकाशन - 'कृष्णा', १२ वी- डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई ४०० ००४, किंमत ६० रु., पुष्ठे ४७२, उपोदघात् –श्री. पु.रा. बेहेरे, संपादक 'नवशक्ति' ]

भगवान श्री साईबाबांवर आज अनेक पुस्तके, ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत व होत आहेत. बाबांचे भक्त जगभर झालेले आहेत व आपल्या भक्तांना बाबा भेटतात, त्यांच्या अडी अडचणीला, संकटाना धावून येतात या बद्दलचे असंख्य पुरावे देता येतील. निर्जिव व सजीव अशा वस्तूवर दिव्य शक्तिमान पुरुष सत्ता चालवू शकतो, अशी मान्यता या देशात प्रथम पासूनच होती. परंतु ती कालाच्या प्रवाहात लुप्त झालेली होती ती आता भारतातील जनतेत पुन्हा प्रकट झाली आहे. या मान्यतेचा ज्वलंत जिवंत पुरावा दृष्टांत म्हणजे पूर्ण परब्रम्ह अवस्थेस पोचलेली साईबाबा या नावाने ओळखली जाणारी दिव्य विभूती होय. अशा या विभूती बद्दल अमदाबादचे वयोवृद्ध सुविद्य श्री साईभक्त कै. वापनरावजी पटेल उर्फ श्री साईशरणानंद यांनी आपल्या हयातीत गुजरातीतून एक छानदार पुस्तक १९४६ साली लिहिले. त्याची सुधारून वाढविलेली सातवी आवृत्ती १९६६ साली प्रकाशित झाली. श्री शरणानंदजीनी श्री बाबांना चर्मचक्षूंनी पाहिलेले होते. स्वामीजींनी मूळ गुजरातीतून लिहिलेल्या बाबांच्या वरील ग्रंथाचा सुरस मराठी अनुवाद श्री. खेर यांनी या ग्रंथात केला आहे.

पूर्ण परब्रम्ह अवस्थेत पोचलेली श्री साईबाबा ही विभूती वैज्ञानिकांचे संशोधनात प्रतिपादन केलेल्या सिद्धांताच्या एक पायरी पुढे जाऊ शकते हे सिद्ध करण्याचा यत्न या पुस्तकात केलेला आहे. या दशेस पोचलेली दिव्य विभूती कधीच नष्ट तर होत नाही. उलट दृढ श्रद्धावान तसेच अनन्य शरण आलेल्या आर्त, जिज्ञासू, अर्थीथी व ज्ञानी यांच्यासाठी वेळोवेळी प्रकट होऊन जरूर ते सहाय्य देते हे आवर्जून सांगण्याचा यत्न या ग्रंथात केलेला आहे; व ते सत्य आहे असा आमचाही निर्वाळा आहे.

या पुस्तकात बाबांची जन्म, जात, कूळ, शिरडीत त्यांचे अवतरण, सद्गुरुभक्ती, अवतार कार्य, त्यांची उदी व त्या उदीचे चमत्कार, साईवाणी इ. अशी १७ माहितीपूर्ण प्रकरणे असून ती वाचता वाचता श्रद्धावान भाविकाचे अंत:करण बाबांच्या बद्दलच्या भावनेने अक्षरश: भरून येते व त्याच्या नेत्रातून घळघळा अश्रूधारा वाहू लागतात.

ग्रंथामध्ये दहा प्रसंगोचित अशी छायाचित्रे पण आर्ट पेपर वर छापलेली असून ती ग्रंथाच्या मौलिकतेत भर आणखीन टाकतात. ग्रंथाला नवशक्तिचे संपादक श्री

पु.रा. बेहेरे यांनी प्रस्तावना दाखल साजेसेच चार शब्द लिहिलेले असून ग्रंथात श्री शरणानंदजींचा सचित्र परिचय पण दिलेला आहे. ठिकठिकाणी लिहिलेल्या मजकूरात साईबाबा संस्थानचे मुखपत्र असलेल्या श्रीसाईलीला मासिकातील लेखांचा पण आधार म्हणून भक्कम पुरावा दिलेला आहे.

या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभापूर्वीच साधू वेषातील एका अज्ञात व्यक्तीने या ग्रंथाची पहिली प्रत आपल्या कार्यालयात येऊन रोख रक्कम रुपये साठ देऊन नेल्याचा चमत्कार प्रकाशक सांगतात. आज या ग्रंथाची प्रत पंचेचाळीस रुपये या सवलतीचे दरांत भक्तांसाठी देण्यात येत आहे.

प्रत्येक साईभक्ताने हा अमोल ग्रंथ आपल्या संग्रही ठेवण्यालायक आहे. मात्र या ग्रंथाच्या छपाईतील शुद्ध लेखनाच्या चुका पुढील आवृत्तीत सुधारून त्या राहू नयेत अशी खबरदारी घेण्यात यावी.

–साईनंद

## निर्वाणीचा सखा

(लेखक श्री. वामन एकनाथ गोखले, प्रकाशक श्री. नेमीचंद एम. शहा, शिरडी, जि. अहमदनगर पृष्ठे १०६, किमत ६ रुपये.)

शिरडीतील एक नामवंत उद्योगी भाविक, श्रीसाईलीला स्टोअर्स, दुकानदार, व मालक श्री. नेमीचंद शहा यांनी शिरडी संत श्री साईबाबांचे चरित्र श्री. गोखले यांचेकडून मुद्दाम लिहवून घेऊन ते प्रसिद्ध केले या चरित्रात्मक पुस्तकाची चौथी आवृत्ती प्रकाशित झाली आहे. या पुस्तकात श्री बाबांच्या शिरडी आगमनापासून तो त्यांच्या अंतीम क्षणापर्यंतची बरीचशी बारीक सारीक माहिती देण्यात आलेली आहे. तसेच बाबांच्या सहवासातील शामा, भाऊ महाराज, अबदुल बाबा, सगुणमेरू नाईक, तात्या बाबा पाटील इ. च्या त्रोटक व्यक्ती रेखा पण रेखाटलेल्या आहेत. पुस्तकात काही भक्तांचे त्रोटक पण ज्वलंत अनुभव देऊन बाबांना आजही सर्वकाही दिसते व समजते असा भक्तांचा ठाम विश्वास त्यातून प्रगट केले आहे. पुस्तकात साईबाबांची १०८ नामावली, भजने, आरत्या इ. दिल्याने हे पुस्तक भक्तांना संग्राहय झालेले आहे. या पुस्तकाला साईशरणानंद यांनी चार शब्द प्रस्तावने दाखल लिहिले असून सुप्रिम कोर्टाचे न्यायाधिश श्री. जे.आर. मुधोळकर यांनीही शुभाशिष दिलेले आहेत.

### श्री. बोबडे यांची ३ नवी पुस्तके

श्री साईलीलाचे एक लेखक, कवी व जि. अमरावती अंजनसिंगी येथील हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. हरिभाऊ बोबडे एम.ए.बी.एड. यांनी १) नमो पुंडलिका २१ नमस्कार व २) परमहंस पुंडलिक महात्म्य अशी दोन पुस्तके परमहंस पुंडलिक महाराजांवर लिहिली आहेत. तिसरे परमहंस मुंर्गेसाजी महाराज स्तवन हे पण त्यांनी लिहिले असून भक्तांना ही पुस्तके संग्राहय अशीच आहेत. तिन्ही पुस्तकांच्या किमती ४०.४० पैसे आहेत. श्री. बोबडे यांचे या कार्याबद्दल आम्ही कौतुक करतो.

–साईनंद

# शिरडी वृत्त माहे सप्टेंबर ८५

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. रविवार, गुरूवार व सणाची सुट्टीचे दिवशी बरीच गर्दी होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे—

**कीर्तन** - १) ह.भ.प. मधुकर गणेश सुर्यवंशी, संस्थान गवई - कीर्तनकार - प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

२) ह.भ.प. नामदेव नारायण पाटील. दादर

**प्रवचन** - १) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी,
२) ह.भ.प. विश्वनाथ महाराज, सुराळा तालुका - वैजापूर

**भजन, गायन, वादन वगैरे** - १) श्री. शैलेश भागवत, ठाणे २) सौ. अलका भा. रिसवडकर, अंधेरी ३) श्रीमती इंदिरा गोखले, मुंबई ४) सौ. मीना जोशी, हवेली ५) शाहीर गहिनीनाथ देशमुख, मालेवाडी, जि. सांगली ६) श्री. जयवंत दुबळे, सांगली ७) श्री. विठ्ठल भोंडवे, सांगली ७) श्री. सुरेश आवळे, ८) श्री. रामदास रणदिवे, ९) श्री. दगडू गोळे १०) श्री. कैलासबाबू काबाकवाल, नागपूर ११) श्रीमती आसावरी वायकूळ, मुंबई १२) श्री. सुदर्शन पर्वतवार, आदिलाबाद, १३) श्री. गोविंद प्रसाद, जयपूरवाले, मुंबई, १४) श्रीमती निर्मला देवी, मुंबई, १५) रंजना जाधव, फलटण.

*** गोकुळ अष्टमी कार्यक्रम :**

सालाबाद प्रमाणे यंदाही गोकुळ अष्टमी कार्यक्रम दि. ७-९-८५ व ८-९-८५ रोजी साजरा करण्यात आला. शनिवार दि. ७-९-८५ रोजी रात्रौ ९ ते १० कलाकारांची हजेरी १० ते १२-०० श्री. मधूकर गणेश सुर्यवंशी, संस्थानगवई यांचे कृष्ण जन्म कीर्तन झाले. १२ वा. कृष्णजन्म झाल्यानंतर शेजारती झाली.

रविवार दि. ८-९-८५ रोजी सकाळी १०-३० ते १२-०० गोपाळकाला व दहीहंडी कार्यक्रम झाला. रात्रौ ९-१५ ते ११-०० श्रींच्या रथाची गांवातून मिरवणूक निघाली. मिरवणूक परत आल्यानंतर शेजारती झाली.

# रेल्वे बुकिंग औट एजन्सी :

श्री क्षेत्र शिरडी येथे भारताचे कानाकोपऱ्यातून श्री साईबाबांचे दर्शनासाठी हजारोंच्या संख्येने साईभक्त नियमितपणे येत असतात. साधारणपणे प्रवासा साठी सुलभ साधन रेल्वे शिवाय दुसरे नाही. शिरडी हे रेल्व स्टेशन नसल्याने भक्तांना

मनमाड अगर कोपरगाव या सारख्या रेल्व स्टेशनचा आधार घ्यावा लागतो. ऐनवेळी रेल्वे हुकणे अगर तिकीट न मिळणे यामुळे मुक्काम पडणे या सारख्या गैरसोयींना तोंड द्यावे लागल्याने भक्तांच्या या अडचणींचा विचार करून साईबाबा संस्थान व मध्य रेल्वेचे अधिकारी यांच्या संयुक्त प्रयत्नाने साईबाबा संस्थानचे चौकशी कार्यालयात मध्य रेल्वेचे बुकिंग कौंटर दि. ६.९.८५ पासून सुरु करण्यात आलेले असून त्या ठिकाणी पंचवटी एक्सप्रेस करिता १० सीटस (द्वितीय वर्ग) व भुसावळ पॅसेंजर करिता ४ बर्थ (द्वितीय वर्ग) सुविधा भक्तांकरिता उपलब्ध झालेली आहे. तसेच नागपूर, सिकंदरबाद, जालना, नांदेड, निझामाबाद, ठाणे वगैरे प्रमुख ठिकाणी जाणारे रेल्वे गाडयांची तिकीटेही मिळू लागलेली आहेत. तसेच इतर स्टेशनसाठी कोटा मिळणेबाबत संस्थान प्रयत्नशील आहे. साईभक्तांची मूलभूत गरज लक्षात घेऊन संस्थानने सुरु केलेल्या या उपक्रमाबद्दल भक्तांमध्ये समाधान पसरलेले आहे.

सदरची आऊट एजन्सी ही मनमाड रेल्वे स्थानकाशी संलग्न असून भुसावळ विभागाचे अखत्यारित आहे. हया आऊट एजन्सीचे उद्घाटन मा. श्री. राजकुमार जैन, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई यांचे शुभहस्ते दि. ८.९.१९८५ रोजी संपन्न झालेले आहे.

# साई बाबा माझे दैवत

चाल – तीन शिरे सहा हात / तथा माझा दंडवत ।।

साई बाबा, माझे दैवत ।  
तयां चरणी माझा, दंडवत ।।धृ.।।  
दिनदुबळ्यांचेच, बाबाना ध्यान ।  
ऐसे आहे माझे, दैवत महान ।।१।।  
माथा शोभे, वस्त्र शुभ्र ।  
अंगी कफनी, लाल सुंदर ।।२।।  
सदा धुनीतील, विभुती हाती ।  
प्रसाद म्हणून, भक्तांना देती ।।३।।  
बाबांचा मंत्र, श्रद्धा - सबुरी ।  
रंजल्यागांजल्याना तोच तारी ।।४।।  
बंडा म्हणे, साई विश्वंभर ।  
तयां चरणी, माझा नमस्कार ।।५।।

**– बी. डि. औरवाडकर**  
**गुरूजी**  
१/३७३/१ब "श्री दत्त निवास" इचलकरंजी जि. कोल्हापूर

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|
| १. श्री साई चरित्र | मराठी | ३४-५० | ६-०० |
| २. —"— | इंग्रजी | २०-०० | ४-२५ |
| ३. —"— | हिन्दी | १६-०० | ४-२५ |
| ४. —"— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ५. —"— | तेलगू | १४-५० | ५-२५ |
| ६. —"— | तामीळ | १२-०० | ४-५० |
| ७. —"— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ८. गुजराथी पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-०० |
| ९. श्री साईलिलामृत | मराठी | ७-५० | ४-०० |
| १०. —"— | गुजराथी | ४-२५ | ४-०० |
| ११. अवतार व कार्य | मराठी | ६-५० | ४-०० |
| १२. स्तवन मंजिरी | मराठी | ०-३० | ३-५० |
| १३. —"— | गुजराथी | ०-३० | ३-५० |
| १४. सगूणोपासना | मराठी | ०-७० | ३-५० |
| १५. चार अध्याय | मराठी | १-२५ | ३-५० |
| १६. सगूणोपासना | सिंधी | १-२५ | ३-५० |
| १७. सचित्र साईबाबा | इंग्रजी | ३-४० | ३-५० |
| १८. मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | ३-५० |
| १९. —"— | इंग्रजी | २-०० | ३-५० |
| २०. —"— | तेलगू | २-५० | ३-५० |
| २१. —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २२. गाईड टू होली शिरडी | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| २३. —"— | मराठी | १-५० | ३-५० |
| २४. —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २५. तेलगु पुजाविधी | तेलगु | — | — |
| २६. रूद्राध्याय | मराठी | ०-९० | ३-५० |
| २७. साईबाबा ऑफ शिरडी बाय प्रधान | इंग्रजी | ३-०० | ३-५० |
| २८. साईबाबा ऑफ शिरडी वाय. पी. भरूचा | इंग्रजी | ६-५० | ४-०० |

Regd. No. MH BYE 26
LICENCE No. 19
Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|
| १. आशिर्वाद फोटो | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| २. –"– | १०" × १४" | १-१५ | ३-५० |
| ३. –"– | १०" × १२" | १-५० | ३-५० |
| ४. –"– | ७" × २०" | ०-६० | ३-५० |
| ५. –"– | ५½" × ६½" | ०-३५ | ३-५० |
| ६. –"– | ४" × ५" | ०-३० | ३-५० |
| ७. –"– | २" × ३" | ०-२० | ३-५० |
| ८. दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| ९. " " (काळापांढरा) | १४" × २०" | ०-८५ | ३-५० |
| १०. दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | ३½ × ५½ | ०-६० | ३-५० |
| ११. द्वारका माई (रंगीत) | १७" × २२" | ५-७५ | ३-५० |
| १२. –"– | १४" × २०" | १-६० | ३-५० |
| १३. –"– | १०" × १४" | १-२५ | ३-५० |
| १४. समाधी फोटो | १३" × ९" | १-१५ | ३-५० |
| १५. –"– | ८" × ६" | ०-७५ | ३-५० |
| १६. –"– | ४" × २½" | ०-१० | ३-५० |
| १७. कॅमेरा फोटो (रंगीत) | ९" × १२" | १-६५ | ३-५० |
| १८. ऑफसेट फोटो | ९" × १३" | १-५० | ३-५० |
| १९. –"– | ५" × ७" | ०-४० | ३-५० |
| २०. दगडावर बसलेले बाबा (निळा) | ९" × १२" | ०-७५ | ३-५० |
| २१. मूर्ती फोटो (बस्ट) | ३¾ × ४½" | ०-३५ | ३-५० |

श्री. रा. द. बन्ने, संपादक यांनी श्री साईबाबा संस्थान, साई निकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई - ४०० ०१४, यांचे करिता गिता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगाव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१ येथे छापून प्रकाशित केले.